# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ४२

## सभावृत्तांत

दिनांक - २०.३.२०१५ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मार्च - २०१५ ची मासिक मा. महापालिका सभा शुक्रवार दि.२०.३.२०१५ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१७. मा.जगदीश शेट्टी
१८. मा.बाबर शारदा प्रकाश
१९. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
२०. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

२१. मा.उल्हास शेट्टी

२२. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२३. मा.पवार संगीता शाम

२४. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२५. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२६. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२७. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२८. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२९. मा.भारती फरांदे

३०. मा.आर.एस.कुमार

३१. मा.जावेद रमजान शेख

३२. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

३३. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३४. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३५. मा.राजू मिसाळ

३६. मा.नंदा विकास ताकवणे

३७. मा.नेटके सुमन राजेंद्र

३८. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३९. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४०. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४१. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

४२. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

४३. मा.लोंढे गणेश नारायण

४४. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४५. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे

४६. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४७. मा.अपर्णा निलेश डोके

४८. मा.अनंत सुभाष को-हाळे

४९. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५०. मा.जयश्री वसंत गावडे

५१. मा.पवार मनीषा काळूराम

५२. मा.अविनाश (दादा) टेकावडे

५३. मा.काळभोर वैशाली जालिंदर

५४. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

५५. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५६. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५७. मा.वाबळे संजय मल्हारराव

५८. मा.मडिगेरी वर्षा विलास

५९. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

६०. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

६१. मा.सुपे आशा रविंद्र

६२. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

६३. मा.मोहिनीताई विलास लांडे

६४. मा.अजित दामोदर गव्हाणे

६५. मा.गोफणे अनुराधा देविदास

६६. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६७. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६८. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६९. मा.लोंढे शुभांगी संतोष

७०. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

७१. मा.ननवरे जितेंद्र बाबा

७२. मा.सावळे सिमा रविंद्र

७३. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

७४. मा.भोसले राहूल हनुमंतराव

७५. मा.बहल योगेश मंगलसेन

७६. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७७. मा.कदम सदगुरु महादेव

७८. मा.गिता सुशील मंचरकर

७९. मा.कैलास महादेव कदम

८०. मा.छाया जगन्नाथ साबळे

८१. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

८२. मा.टाक अरुण मदन

८३. मा.आसवाणी सविता धनराज

८४. मा.वाघेरे सुनिता राजेश

८५. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

८६. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८७. मा .ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८८. मा.काळे विमल रमेश

८९. मा.पाडाळे निता विलास

९०. मा.विनोद जयवंत नढे

९१. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

९२. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

९३. मा.विमलताई सुरेश जगताप

९४. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

९५. मा.बारणे निलेश हिरामण

९६. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९७. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

९८. मा.बारणे माया संतोष

९९. मा.ओव्हाळ शेखर अशोक

१००. मा.यमुनाताई रमणनाना पवार

१०१. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

१०२. मा.कलाटे स्वाती मयुर

१०३. मा.नांदगुडे विलास एकनाथ

१०४. मा.चौंधे आरती सुरेश

१०५. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०६. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१०७. मा.बोकड रामदास गेणभाऊ

१०८. मा.जवळकर वैशाली राहुल

१०९. मा.जगताप राजेंद्र गणपत

११०. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१११. मा.जगताप नवनाथ दत्तु

११२. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

११३. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

११४. मा.जम सोनाली पोपट

११५. मा.प्रशांत शितोळे

११६. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

११७. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

११८. मा.गायकवाड संध्या सुरदास

११९. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१२०. मा.शेंडगे आशा सुखदेव

१२१. मा.मोटे किरण बाळासाहेब

१२२. मा.संजय केशवराव काटे

१२३. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१२४. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१२५. मा.पाटील सुजित वसंत

१२६. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१२७. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.गावडे-सहआयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे- प्र.शहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.पाटील, मा.चव्हाण-सह शहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडुसकर, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे-सहा.आयुक्त, मा.पवार- कायदा सल्लागार, मा.दुधेकर, मा.साळवी, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, मा.कांबळे, मा.गद्रूवार, मा.सोनवणे-कार्य.अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, कृष्णा कल्ले-ज्येष्ठ पार्श्वगायिका, दत्ताराम आबाजीराव भोसले, प्रविण दत्ताराम भोसले, रिद्धी प्रविण भोसले, कुमार शौर्य प्रविण भोसले, सौ.शिंदे, किसनराव काळभोर, वेणूबाई गजानन काळभोर यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर** - श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, सभा सोमवार दि. ६/४/२०१५ रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर -** सन्मा.सभागृह, नगरसेवक, नगरसेविका, आयुक्त साहेब, सर्व अधिकारी वर्ग, पत्रकार व नागरीक या सर्वांना गुढीपाडव्याच्या शुभेच्छा देवून सर्वांच्या संमतीप्रमाणे सोमवार दिनांक ६/४/२०१५ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

--------

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ४२.**

**सभावृत्तांत**

**(दिनांक २०/३/२०१५ ची तहकूब सभा)**

दिनांक - ६.४.२०१५ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची (माहे मार्च-२०१५) दिनांक २०.३.२०१५ ची तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दि.६.४.२०१५ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१६. मा.बाबर शारदा प्रकाश
१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

१९. मा.उल्हास शेट्टी

२०. मा.पवार संगीता शाम

२१. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२२. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२३. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२४. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२५. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२६. मा.भारती फरांदे

२७. मा.आर.एस.कुमार

२८. मा.जावेद रमजान शेख

२९. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

३०. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३१. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३२. मा.राजू मिसाळ

३३. मा.नंदा विकास ताकवणे

३४. मा.नेटके सुमन राजेंद्र

३५. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३६. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३७. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३८. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३९. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

४०. मा.लोंढे गणेश नारायण

४१. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४२. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे

४३. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४४. मा.अपर्णा निलेश डोके

४५. मा.अनंत सुभाष को-हाळे

४६. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४७. मा.जयश्री वसंत गावडे

४८. मा.प्रसाद शेट्टी

४९. मा.अविनाश (दादा) टेकावडे

५०. मा.काळभोर वैशाली जालिंदर

५१. मा.शेख अस्लम शैकत

५२. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५३. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५४. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५५. मा.सुपे आशा रविंद्र

५६. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५७. मा.अजित दामोदर गव्हाणे

५८. मा.गोफणे अनुराधा देविदास

५९. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६०. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६१. मा.महेशदादा किसन लांडगे

६२. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६३. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६४. मा.लोंढे शुभांगी संतोष

६५. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६६. मा.सावळे सिमा रविंद्र

६७. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६८. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६९. मा.पालांडे सुजाता सुनिल

७०. मा.बहल योगेश मंगलसेन

७१. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७२. मा.कदम सदगुरु महादेव

७३. मा.गिता सुशील मंचरकर

७४. मा.कैलास महादेव कदम

७५. मा.छाया जगन्नाथ साबळे

७६. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७७. मा.टाक अरुण मदन

७८. मा.आसवाणी सविता धनराज

७९. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

८०. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८१. मा .ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८२. मा.काळे विमल रमेश

८३. मा.पाडाळे निता विलास

८४. मा.विनोद जयवंत नढे

८५. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८६. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८७. मा.विमलताई सुरेश जगताप

८८. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८९. मा.बारणे निलेश हिरामण

९०. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९१. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९२. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९३. मा.कलाटे स्वाती मयुर

९४. मा.चौंधे आरती सुरेश

९५. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९६. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९७. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९८. मा.जवळकर वैशाली राहु ल

९९. मा.जगताप राजेंद्र गणपत

१००. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०१. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०२. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१०३. मा.प्रशांत शितोळे

१०४. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१०५. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०६. मा.गायकवाड संध्या सुरदास

१०७. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०८. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०९. मा.मोटे किरण बाळासाहेब

११०. मा.संजय केशवराव काटे

१११. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

११२. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

११३. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे- प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकुर- उपसंचालक नगररचना, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील, मा.चव्हाण-सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडुसकर, मा.गायकवाड, मा.खांडकेकर, मा.दंडवते, मा.फुंदे, मा.दुरगुडे-सहा.आयुक्त, मा.सातव- प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.दुधेकर, मा.सवणे, मा.तांबे, मा.साळवी, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.दांगट, मा.कांबळे, मा.ओंबासे, मा.गद्धूवार-कार्य.अभियंता, मा.पाटील-प्रशासन अधिकारी व मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

अ) मा.महापालिका सभा क्रमांक - ३३ दिनांक १९/८/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ब) मा.महापालिका सभा क्रमांक - ३५ दिनांक २०/०९/२०१४ व १०/११/२०१४ (दु.२.०० व २.२० वा.)चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

क) मा.महापालिका सभा क्रमांक - ३७ दिनांक २०/११/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, सूरज सर्जेराव मोहिते-दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले जवान, सा.रे. पाटील - माजी आमदार, कृष्णराव साबळे-ज्येष्ठ शाहिर, जयंत बेंद्रे -ज्येष्ठ रंगकर्मी, लेखक यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा. मंदाकिनी ठाकरे** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर** - श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.नगरसचिव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माहे मार्च-२०१५ चे मा.महापालिका सभेमध्ये मा.सौ.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील यांना विचारावयाचे प्रश्न.

**मा.महापौर -** मा.अश्विनी चिंचवडे यांना विचारावयाचे प्रश्न घेणेत यावेत.

**मा.अश्विनी चिंचवडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार बंधु भगिनी. शहर सुधारणा समितीच्या माध्यमातून झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प गुंडाळून प्रकल्पासाठी केंद्रशासन व राज्यशासनाकडून प्राप्त झालेल्या निधी पैकी न वापरलेला निधी व्याजासह परत करण्यात यावा या मान्यतेसाठी सर्वसाधारण सभेपुढे विषय आहे व त्यास अनुसरुन माझे प्रश्नोत्तरे आहेत कारण माझ्या प्रभागातील वेताळनगरमध्ये हा प्रकल्प सुरु आहे. हा प्रकल्प समाजातील जो वर्ग आर्थिकदृष्टया दुर्बल आहे झोपडपट्टीत राहतो, मोलमजुरी करुन उदरनिर्वाह करतो अशा बांधवासाठी आहे. सदरचा हा विषय शहर सुधारणा समिती पुढे आल्यानंतर माझ्या पुढे अनेक प्रश्न उभे राहिले. कारण शहरातील १००८० पात्र लाभार्थींना घरे मिळू शकणार नाहीत व ११५२ सदनिकांचे काम सुरु आहे त्या पुर्ण कशा होणार? याचा खुलासा व्हावा. ज्या झोपडपट्टीधारकांना महापालिकेनी सात वर्षापुर्वी घराचे स्वप्न दाखवले त्यांनी पुढच्या लॉटमध्ये घरे मिळणार म्हणून प्रत्येक दिवाळी, दसरा, आषाढी साजरी केली. त्यांचे स्वप्न धुळीस मिळतात की काय असा प्रश्न उपलब्ध झालेला आहे. त्या नागरीकांना न्याय मिळवून देणे नगरसेवक म्हणून आमचे कर्तव्य आहे. मी असेल, संदीप चिंचवडे असतील, उल्हास शेट्टी, तानाजी खाडे, पठाणताई, ठोंबरेताई, सुलभाताई आणि छायाताई यांच्या वॉर्डात हा प्रकल्प आहे. त्याच्यामुळे नगरसेवकांपुढे हा प्रश्न उभा आहे. शहरातील एखादया नागरीकांनी बांधकाम परवानगीसाठी अर्ज केलातर सर्व कागदपत्रांची पुर्तता महापालिका करते सर्व एनओसी घेते त्यानंतर प्लॅन मंजूर करते व बांधकाम सुरु करण्यास सांगते मग अशा महत्वकांक्षी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पामध्ये काम करणारे जबाबदार अधिकारी, कोटयावधी रुपये मेहनताना घेणारे सल्लागार यांना या जागा कुठे आहेत, रेडझोनमध्ये आहेत का ग्रीन झोनमध्ये आहेत, आरक्षण कुठले आहे, मैलाशुध्दीकरण आहे, भाजीमंडई आहे, निवासी आहे का क्रीडांगण आहे, कोणत्या कोणत्या एनओसी घ्याव्या लागतात हे माहित होते का? सर्व प्रकल्पासाठी सल्ला देण्यासाठी सल्लागारांना कोटयावधीचा मेहनताना दिला जातो. सल्लागारांची नियुक्ती कशासाठी केली जाते हा प्रश्न मोठा आहे. प्रकल्प सुरु करण्यापुर्वी त्रुटी निदर्शनास आल्या नव्हत्या असे बेजबाबदार उत्तर मला दिले, मग या सल्लागारांना २३ कोटी कशाला दिले. कन्सलटन्टने एकाच ईमारतीचे तीच तीच डिझाईन्स कॉपी पेस्ट करायची. कोटेशन, मटेरीअल काय वापरायचे याचे एक सुंदर पुस्तक तयार करायच आणि मग गेले एक कोटी रुपये.

त्यामुळे या प्रकल्पाचे तीन तेरा वाजले आहेत. सल्लागार ओंकार असोसिएटचा करारनामा तपासला आहे त्यांनी जी जी कामं केली नाहीत त्याबाबत त्यांना जाब विचारण्याचे धाडस महापालिकेनी फक्त एकदाच दाखविलेले आहे असे निदर्शनास येते. सल्लागाराच्या नेमणुकीची त्यावेळेस वर्तमानपत्रामध्ये बातमी पण आलेली होती की तीन ठिकाणी प्रकल्प सुरु आहेत म्हणून. आप्पा बारणे यांनी त्यावेळेस प्रश्न उपस्थित केलेला होता. सल्लागाराची नेमणुक २४/११/२००६ ला झालेली आहे. सल्लागाराला कारणे दाखवा नोटीस मिळण्यासाठी दि.१६/६/२०१४ उजाडले असे उत्तरात सांगीतलेले आहे. ही नोटीस देण्यामागे महापालिकेनी उशिर का केला? तसेच सल्लागाराने या नोटीसीचा कोणता खुलासा केला तो लेखी स्वरुपात दयावा व सभागृहास त्याची परिपुर्ण माहिती दयावी, सभागृहाला पुर्णपणे अंधारात ठेवले जाते. ही कारणे दाखवा नोटीस उत्तरात आलेली आहे त्याचे पुढे काय झाले याचा खुलासा व्हावा विशेष म्हणजे सात वर्षापुर्वी हा प्रकल्प सुरू झाल्यापासून प्रकल्पांबाबत तत्कालीन सर्वपक्षीय नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ता संघटना, लोकशाहीचा चौथा स्तंभ पत्रकार बंधु वर्तमानपत्रामधुन अनेकवेळेस अग्रलेख वाचलेले आहेत परंतु या प्रकल्पावर काम करणारे अधिकारी वर्ग सल्ला देणारे सल्लागार, ठेकेदार या निगरगट्ट व्यक्तीने यामध्ये सोईस्कर दुर्लक्ष केलेले दिसते. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने २५/८/२००९ रोजी नोटीस दिलेली होती त्यानंतर तब्बल आकरा महिन्यानी पर्यावरण दाखला मिळवण्यासाठी १५/७/२०१० ला आपण अर्ज केला असे उत्तरात सांगीतले. यास जबाबदार कोण आहे. २००९ साली नोटीस पाठवलेली आहे आणि २०१० साली आपण तीकडे प्रस्ताव पाठवितो. केंद्रशासनाने, राज्यशासनाने, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या मार्फत लेखापरीक्षण केले आहे परंतु त्यामध्ये जे आक्षेप घेतलेले आहेत त्यांची पुर्तता केल्यानंतर आक्षेप निरस्त करण्यात आलेले आहेत का या बाबतीत माहिती दिलेली नाही त्याचा पण खुलासा करावा. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील काही इमारती बांधुन तयार होत्या परंतु प्रदुषण नियंत्रण मंडळातील consent to operate मिळण्यास विलंब झाल्यामुळे इमारतीचे हस्तांतरण करण्यास उशिर झाला. ही चुक सल्लागारांची का अधिका-यांची त्याची जबाबदारी निश्चित केली गेली पाहिजे. सह शहर अभियंता यांच्याकडे झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पा बरोबर घरकुल योजना, बीआरटीएस प्रकल्पाचे देखील काम आहे या तीन्ही प्रकल्पाचे तीन तेरा वाजलेले आहेत त्यामुळे त्यांच्या अधिकार कक्षेतील या तीन्ही प्रकल्पाची चौकशी व्हावी. २००७ साली झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील कामाचे टेंडर झाले तेव्हा निवीदेतील मुळ दरापेक्षा जवळ जवळ ३० टक्के अबोव्हने ही कामे केली गेली, त्यामुळे ठेकेदाराला परवडले नाही असे म्हणताच येणार नाही. उलट मुदतवाढ दरवाढ दिली गेलेली आहे. या महत्वकांक्षी प्रकल्पामध्ये शहर झोपडपट्टीमुक्त करण्याचा संकल्प होता परंतु मनमानी, नियोजनशुन्य आणि गलथान कारभारामुळे असे झालेले आहे. प्रकल्प गुंडाळणार आहोत, केंद्रशासन व राज्यशासनाला व्याजासह किती रक्कम परत देणार मग अर्धवट राहीलेल्या ईमारती कशा पुर्ण करणार

त्यासाठी महापालिकेच्या बजेटमध्ये तरतूद आहे का? ऑगष्टपासून एलबीटी बंद होणार आहे, यावर प्रशासनाची भुमिका काय हे सांगावे. मी प्रथमच निवडून आलेली आहे परंतु झोपडपट्टीतील बांधवाच्या तोंडातील घास कोणीतरी हिरावून घेते हे समाजासमोर आलेच पाहिजे. मला संबंधीत अधिकारी वर्गाने सागीतले की हि कामे पुर्ण होतील परंतु त्याचे नियोजन त्यांच्याकडे अजीबात नाही. त्या पात्र लाभार्थ्यांना भविष्यात घर मिळणार की नाहीत. विचारलेल्या प्रश्नांना गोलगोल उत्तर दिली आहेत. वेळ मारुन नेण्याचा प्रयत्न केलेला आहे, सभागृहाची दिशाभूल केलेली आहे व मुख्य माहिती लपवली जाणार हे काही नवीन नाही. काही प्रकल्प न्यायालयीन निर्णयावर प्रलंबीत आहेत परंतु वेताळनगर प्रकल्पाला तशी कुठलीच अडचण नव्हती. ज्येष्ठ सदस्य आर.एस.कुमार यांना सभागृहातील प्रश्नोत्तरामध्ये वेताळनगर प्रकल्प काम वेळेत पुर्ण न झाल्याबद्दल दिलेली कारणे आणि आज जे डॉकेट मध्ये आहे ते पुर्णत: वेगवेगळे आहे याचाच अर्थ कुठेतरी चुकांवर पांघरुण घालण्याचे काम केल्याचे निदर्शनास येते. झोपडपट्टीतील झोपडपट्टीधारकांचे सर्वेक्षण करणे, बायोमेट्रीक करणे, पात्र लाभार्थी ठरविणे, ही कारणे दिलेली आहेत परंतु ती न पटणारी आहेत. कित्येक पात्र लाभार्थ्यांना काहीतरी कागद कमी आहे म्हणून अपात्र केलेले आहे व नंतर दलाला मार्फत पात्र ठरलेले आहेत. यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन विभाग दलालांचा अड्डा झालेला आहे प्रत्येक पात्र लाभार्थ्यांची जर नस्ती तपासलीतर अनेक प्रकरण उघडकीस येतील. उदा.वेताळनगरमध्ये सदनिकेसाठी लाच मागीतल्यामुळे झोपडपट्टीधारकांनी आत्महात्या केली अशी त्यावेळच्या वृत्तपत्रामध्ये बातमी आलेली आहे आणि सिमाताईनी सुध्दा त्याबाबतीत आयुक्तांकडे सगळी माहिती मागविलेली होती. झोपडपट्टी प्रशासन विभागाने खोटी व अर्धवट माहिती दिली आहे. काही अधिका-यांची नाव पण लपवलेली आहेत. आपल्याच सहीने दिलेली माहिती आहे. सर्व दिलेली माहिती खोटी व अर्धवट असल्यामुळे सभागृहाचा अपमान झालेला आहे. तरी संबंधित अधिका-यावर कारवाई करावी अन्यत: राज्यशासनाकडे याबाबत तक्रार केली जाणार आहे. या प्रकल्पातील ढिसाळ नियोजनास जवाबदार कोण आहे याचा शोध भविष्यात आम्ही घेणार आहोत. त्यामुळे दिनदुबळया, गोरगरीब सामान्य नागरीकांना, पात्र लाभार्थ्यांना न्याय मिळेपर्यंत आम्ही लढणार आहोत. प्रकल्प वेळेत पुर्ण न होण्याची जी कारणे दिलेली आहेत त्यांच्या मुळाशी जाणे गरजेचे आहे. त्याकरिता या प्रकल्पाची सविस्तर चौकशी व्हावी व हा प्रकल्प सिमीत न करता महापालिकेनी पुर्ण करुन दयावा अशी मी मागणी करते. सल्लागाराची नेमणुक २४/११/२००६ रोजी करण्यात आलेली आहे. प्रकल्पामध्ये अनेक अडचणी, त्रुटी तब्बल सात वर्षा नंतरही २०१४ रोजी कारणे दाखवा नोटीस याबाबत खुलासा, केंद्रशासनाच्या कॅग, राज्यशासन, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या मार्फत लेखापरिक्षण झालेले आहे. परंतु त्यामध्ये जे आक्षेप घेतले आहेत त्यांची पुर्तता आणि ते निरस्त झालेले आहेत का, त्याबाबतीत पुर्ण झालेला पत्रव्यवहार याची माहिती सभागृहाला मिळावी. २००९ रोजी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण

मंडळाने नोटीस दिलेली आहे. त्याच्यानंतर आकरा महिन्यानी पर्यावरण दाखला मिळण्यासाठी १५/७/२०१० रोजी अर्ज दाखल केल्याचे निदर्शनास येते व त्याचा खुलासा झोपडपट्टी पुनर्वसन विभागाने चुकीची माहिती दिली व अधिका-यांनी नावे लपवली त्याबाबत खुलासा, सदर प्रकल्प पुर्ण करण्यासाठी नियोजना बाबतीत माहिती दयावी, धन्यवाद.

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह, सर्व ज्येष्ठ सदस्य, पत्रकार मित्र. आताच आमच्या भगिनी यांनी पुनर्वसन प्रकल्पा संदर्भात विचारणा केली आणि प्रशासनाने त्यांना गोल गोल व नेहमीप्रमाणे उत्तर देवून समाधान करण्याचा प्रयत्न केला त्यामुळे पहिल्यांदा प्रशासनाचा निषेध करतो. साहेब, झोपडीत कोणी हौसेनी रहायला जात नाही हो. हे वाढते शहर वाढत्या शहराच्या वाढत्या गरजा, उदयोगधंदे म्हणून माणसं या शहरात आली, हाताला काम मिळालं पण संध्याकाळच्या निवा-याच काय? म्हणून पुलाखाली, दिसेल त्या मोकळया जागेत कुठेतरी निवारा शोधून माणसं राहू लागली हि माणसं राहत असताना ती अधिकृत होती, अनधिकृत होती ते कायदयाच्या नियमात बसत होते कायदयाच्या नियमात बसत नव्हते हा वेगळा मुद्दा. पण हळूहळू आम्हांला हाक्काचे घर मिळावं, आमच्या डोक्यावर हाक्काच छप्पर असावं म्हणून बायका मुलां सारखी गरीब माणस मिळेल तिथे राहू लागली पर्यायाने कायदयाचे संरक्षण मिळालं. दि. १/१/१९९५ चा जीआर युतीच्या त्यावेळेसच्या शासनाने जाहीर केला आणि राहत घर त्या माणसाचे हाटवलं जाणार नाही असा शासन नर्णय १९९५ च्या जीआरनं गरीब माणसाला सौरक्षण मिळालं, त्याच घर हाक्काचं झालं. पुढे त्याला बळकटी आली. २००० च्या जी.आर.ने पुन्हा त्याला बळकटी आली. त्याला घर हाक्काच मिळालं. साहेब, हौसेन रहायचंतर आम्ही त्या प्राधिकरणात राहायला जाऊ, त्या घाणीच्या साम्राज्यात आम्ही नाही राहणार. आमचा नाईलाज आहे, पाचपंचवीस वर्षापुर्वी हे कुटूंब स्थलांतरीत तिथं होतं मला मुलं झाली, माझ्या मुलांच्या मुलांना मुल झाली, मला नात्रुंड आली, पत्रुंड आली त्या १०x१० च्या खुराडयात नरक यातना भोगताना आम्हांलाही जीव नकोसा होतो पण कुठेतरी पाठ टेकायला रात्रीची जागा असते म्हणून आम्ही झोपडपट्टयात राहू लागलो. साहेब, झोपडपट्टयातही माणसच राहतातहो गुर, ढोर, जनावर नाहीत राहत. पण झोपडपट्टीच्या पुनर्वसनाचा आणि त्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रश्न आला की, का आपल्या आणि प्रशासनाच्या पोटात दुखायला लागतहो. आम्हीही माणसच आहोत हो, आम्हांलाही वाटतहो चांगले कपडे घालवे, गोडधोड करावं, आमचीही मुलं कॉन्व्हेन्टच्या शाळेत जावी, का नाही वाटायचं. मी पालिकेच्या शाळेत शिकलो, माझी मुलं पालिकेच्या शाळेत शिकली पण ही सामाजीक विषमता जेव्हा दुर करायला कायदा पुढे येतो त्यावेळेला या माणसाना हाक्काच घर मिळावं असा कायदा सांगतो. बॉम्बे हायकोर्टाचं एक जज्मेंट आहे, त्या केसमधील ते अतीशय लॅण्डमार्क जज्मेंट आहे. ते असे सांगत आपण नाही वेगळ करु शकत कोणाला. पुनर्वसन या शब्दाची व्याख्याच समजावून घेतलेली नाही. प्रकल्प करायचे, टक्केवारी घ्यायची त्याच पुढं काय होतय हे कोणालाच काही

माहिती नसतं. ही बाहेर चर्चा आहे हो, वर्तमानपत्रातून रकानेची रकाने छापून येऊ लागले आहेत. साहेब, आपल्या काही अधिका-याच्या टक्केवारीवर लोक चौकात चर्चा करु लागलीत. आम्हांला ते ऐकायला लाज वाटते, माझ्या बहिनीने उल्लेख केला दलाल. आणि एका व्यक्तीनं वेताळनगरच्या पुनर्वसन प्रकल्पामध्ये केलेली आत्महात्या. साहेब, गंभीर गोष्टी आहेत, नवगुणे नावाचा एक क्लार्क आहे त्याची चौकशी करावी. काल अपात्र झालेलं आज दलाला मार्फत पात्र झालं कसं. साहेब, बायका मुलं जीव मुठीत घेवून राहत असताना माझ्या डोक्यावरच छप्पर जाणार आहे म्हणून माझ्या माईनं सुध्दा मंगळसुत्र मोडलेले आहे हो, कारण माझ घरं पात्र होणार आहे. साहेब, या पापाचे भागीदार आपण का होता. एक सोपी गोष्ट आहे. जरा लिगल डिपार्टमेंटला बोलवावं. साहेब, आपली नियमावली आपण तयार केलेली नाही. साहेब, तुम्ही महाराष्ट्र शासनाची नियमावली वापरानां, एसआरएची कशासाठी वापरता. आपल्याला माहिती नसेल एसआरएची नियमावली सुध्दा मॉडीफिकेशनसाठी नगरविकास खात्याकडे पडून आहे. त्याच्यावर निर्णय झालेला नाही. महापौर साहेब, यांना नगरविकास खात्याची नियमावली मागवायला लावा. हे अधिकारी सांगतात सभागृहाला एसआरएचा प्रोजेक्ट आहे, या सभागृहाला सांगतो हे अधिकारी खोटं सांगतात. आपल्या महापालिकेनी आतापर्यंत कुठलाही एसआरएचा प्रोजेक्ट केलेला नाही, एकही प्रोजेक्ट कार्यान्वित नाही. फक्त उत्तर देण्यासाठी आणि तुम्हांला, आम्हांला बेघर करण्यासाठी अधिकारी खोटारडेपणा करतात. आयुक्त साहेब, या सगळया गोष्टीची तपासणी करा. दहा हजार लोकांना आपल्याला पात्र करता येईल, आयुक्त साहेब ही तुमच्या अधिकारातील गोष्ट आहे. ज्यावेळेला दुर्बल घटकांसाठी योजना आपण केली, मला मान्य आहे. पण इतर पुनर्वसन प्रक्ल्पामध्ये जर एसआरएची तुम्ही नियमावली लावता पात्र करण्यासाठी, मग ७० टक्के लोकांची परमीशन घेतली आहे का? जर ७० टक्के लोकांची तुम्ही परमीशन घेतली नाहीतर वाढीव ऐरीया दिलेला आहे का? या जर दोन गोष्टी करत नसालतर त्यांना बेघर का करता. तुम्ही घराला घर देता. २५ वर्षापासून मी येथे राहत होतो, या घराचं पुनर्वसन करुन मला या बिल्डींगमध्ये घर मिळतयं. “हे घर माझ्या हाक्काचं, नाही कोणाच्या बापाचं”. १/१/१९९५ च्या जी.आर.ने मी मालक झालोय. २००० च्या जी.आर.ने मला बळकटी दिलीये, गव्हर्मेंटच्या जी.आर.ने मी घरात जातोय म्हणून मला बेघर करण्याच पाप तुम्ही करु शकत नाहीत. कायदा माझ्या बरोबर आहे, कायदा माझ्या पाठिशी उभा आहे. ज्यावेळेला कायदयाचे अनेक लॅण्डमार्क, जज्मेंट आपल्यासमोर येतील त्यावेळेला अधिका-यानां कळेल या बेघरा पासून आपण किती पैसे कमावलेत, दलाला मार्फत सुळसूळाट करुन घेतलाय, साहेब, बाजार मांडलाय हो, बाजार. एकीकडे चांगल शहर आपण निर्माण करतोय, बेस्ट सिटीच ॲवॉर्ड आपल्याला मिळालयं. स्मार्ट सिटीमध्ये आपला उदया सहभाग होणार आहे. आम्हांलाही वाटतय हो साहेब, या शहरात झोपडया नसाव्यात, सगळयांना छोटी मोठी का होत नाही पण चांगली घरे मिळावीत. झोप येत नाही, पालिकेचा बुलडोझर कधी येणार, कधी नोटीस येणार आहे,

सणासुदीला सुध्दा भयभीत होणारी माणसं आम्ही पाहिलीत साहेब, कारण माझा जन्म झोपडपट्टीत झालेला आहे. झोपडीतल्या गटारावर अभ्यास करताना नरकयातना आम्ही सहन केल्यात त्या झोपडपट्टीवासीयांचा प्रतिनीधी म्हणून बोलतोय साहेब. झोपडपट्टीमध्ये सुध्दा माणुसच राहतो. कोर्टाचे जज्मेंट वाचा साहेब, आपल्याला गरीबानां घरा पासून बेघर करता येणार नाही. दलालांचा सुळसूळाट झालेला आहे. पेपरमध्ये बातमी आलेली आहे. किती चुकीच्या गोष्टी आपण करतो. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प रखडण्यास सल्लागार जबाबदार असून त्याना काळया यादीत टाका आणि संबंधित पालिका अधिका-याची खातेनिहाय चौकशी करा साहेब. केंद्रशासनाच्या जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प क्र.२२ मिलींदनगर, अजंठानगर वेताळनगर, उदयोगनगर, पत्राशेड, लिंकरोड याठिकाणी राबविण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी मे.ओंकार असोसिएटस् यांची वास्तुविशारद म्हणून नियुक्ती केलेली आहे त्यांना आजपर्यंत आपण १३ कोटी २५ लाख रुपये मेहनताना म्हणून दिलेले आहेत. तसेच मे.ओंकार क्रिएशन्स जॉईंट व्हेन्चर यांची प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंट म्हणून नेमणूक केलेली आहे त्यांना सुध्दा १० कोटी ११ लाख आदा केलेले आहेत. दोन्ही मिळून २३ कोटी ३६ लाख रुपये आपण सल्लागार फि आकारलेली आहे. केंद्रसरकार बरोबर केलेल्या करारानुसार हे सर्व प्रकल्प ३१ मार्च २०१५ पर्यंत पुर्ण करणे अपेक्षीत होते प्रत्यक्षात ते अदयाप पुर्ण झालेले नाहीत. त्या प्रकल्पाच्या असलेल्या विवीध परवानग्या, पर्यावरण विषयक विवीध परवानग्या घेण्याची, त्याचा पाठपुरावा करण्याची गरज होती ती सल्लागाराने पुर्ण केलेली नाही. ९.५ टक्क्यांनी शासनाला पैसे दयायचे आहेत ही चुक कोणामुळे झालेली आहे मिलींदनगरमध्ये रिझर्व्हेशन माहित होतं, तिथं बिल्डींग बांधुन ठेवली, परवाना विभाग काय करतय, कन्सलटंट काय करतयं. आहो साहेब, "कुत्र दळतं आणि आंधळ पिठ खातं" असं झालेल आहे. या सगळया गोष्टीचा आपण सारासार विचार केला गेला पाहिजे. आयुक्त साहेब हेरींग तुम्ही घेता त्यावेळेला तुम्ही असता भारतीय संविधानामध्ये सक्षम अधिकारी म्हणून तुम्ही खुप काही करु शकता ७६ झोपडयापट्टया आपल्या शहरातच आहेत. आपल्या अधिका-यांना आपण थोडा वेळ दया. अधिका-यांना समजावुन सांगा. कायदयाच्या नॉर्म्सच्या पलीकडे काय मागणार, साहेब. आणि कायदयाच्या पलीकडे तुम्हाला-आम्हांला काहीच करता येणार नाही. फक्त आपली मानसीकता बदललेली आहे. एखादया प्रकल्पामध्ये पुर्णत्वाला जाईपर्यंत आयुक्त म्हणून, हातात रिंग मास्टर म्हणुन हाण्टर असायला पाहिजे. आहो साहेब, हे इतके गमतीशीर अधिकारी आहेतनां हे आण्णासाहेब मगर यांच्या काळात भरती झालेले अधिकारी आहेत. आम्ही त्यांच्याकडे गेलोनां की गोलगोल उत्तरे देतात. पाच वर्षे आम्ही बोलता बोलता निघुन जातात. जे नियम आहेत जे नॉर्म्स आहेत त्यात बसवून आपल्याला करता येण्यासारखं आहे. अधिकारी कामचुकार झालेले आहेत आणि बाकीच्या गोष्टीततर पटाईत आहेतच. ३१ मार्च २०१५ पर्यंत लोकांची अनेक संस्थे मध्ये पैसे नाहीत म्हणून बोंबाबोंब आहे. आपण खर्च करु शकलो नाहीत म्हणून आपले पैसे

परत चाललेत हो. ९.५ टक्क्यानी आपल्याला पैसे परत करायचे आहेत आणि परत नामुस्की आपल्यावर आहे. म्हणजे या सगळया गोष्टीमध्ये आपण सापडलेलो आहोत. ठिक आहे कोर्टाच्या काही गाईडलाईन्स आहेत पण उदा. वेताळनगर, विठ्ठलनगर यांना कोर्टाच्या काही अडचणी आलेल्या नाहीत पुर्णत्वाला जाऊ शकणार आहे पण वेळीच थोडीशी गती देण्याची गरज आहे. आणि पात्र अपात्रतेचा जो मुद्दा आहे. मला सांगा असं कुठं लिहीलेल आहे की एक घर घेतलेतर दुसरे देवू नका असे कुठे म्हणलेले आहे १०x१० च्या घरात ठेवता ९५ च्या जीआर नुसार मालक केलेले आहे, बँकेनी पैसे भरुन घेतलेले आहेत. २५ वर्षे १०x१० च्या घरात राहतात त्यांनी एक गुंठा जागा घेतलीतर तुम्ही अपात्र ठरवता. त्यांच्या घराला घर तुम्ही देता. एखादा कोर्टात गेलातर निर्णय आमच्याच बाजुने लागणार आहे. कोर्ट असा चुकीचा निर्णय देवूच शकणार नाही. याच्यासाठी तुम्ही स्वतंत्र नियोजन तयार करा. तुम्ही या नियमावलीचा आधार घेता, त्या नियमावलीचा आधार घेता. कायदा समोर घ्या, नियमावली समोर घ्या. स्वत:ची नियमावली तयार करा. आमच्याकडे विषय येवु दया आम्ही त्याला मान्यता देवू पण गरीब माणसाने कुठेतरी अर्धा गुंठा जागा घेतलेली आहे २५ माणस एका घरात राहतात आता ती २५ ची ५० झालेत तुम्ही कशाला काढताय. उदा. दयायच झालतर विठ्ठलनगरच्या प्रोजेक्टची आठ एक्कर जागा तुम्हांला अक्षरश: चांगल्या प्रोजेक्टसाठी मिळणार आहे. त्यातला एक जर अपात्र तुम्ही काढू शकला नाहीत तर आठ एक्करचा प्लॉट ताब्यात घेता येणार नाही. स.नं. १०० मध्ये फक्त ४ हजार स्कवे.फुट फायरब्रिगेडच रिझर्व्हेशन आहे आणि नंतरची जागा तुम्हांला हौसिंग साठी वापरता येणार आहे. चांगल हौसिंग तिथं तुम्ही करु शकता पुनर्वसन प्रकल्पाची ती जागा आहे, ऑलरेडी स्टेडीअममध्ये शिफ्ट केल्यामुळ तो प्लॉट रिकामा मिळतोय. त्याठिकाणी चांगला प्रोजेक्ट उभा राहु शकतो पण त्या घराला घर दयायच आहे. १९९५ च्या जीआरने घरमालक केलेल आहे. २००० च्या जी.आर.ने त्याला बळकटी दिलेली आहे आणि म्हणून आज या सगळया नॉर्म्सचा अभ्यास करुन पात्र अपात्र करणा-या या दलालापासून हा प्रकल्प वाचवा व आलेला निधी खर्च करा आणि झोपडपट्टीमुक्त शहर करा, आम्ही झोपडीतली लोक तुमच्या बरोबर आहेत हो, आम्हांला नाही आवडत हो, झोपडपट्टीत राहायला. कुणाला आवडणार आहेत झोपडया, आम्हांलाही वाटतेनां आम्ही सुध्दा रो-हौसेसमध्ये जावं, फाईव्ह स्टार हौसिंगमध्ये राहायला जावं, स्विमींग पुल असावा, गार्डन असाव, जॉगींग पार्क असावं, सगळं काही वाटतहो पण नशीबाने आम्ही झोपडपट्टीमध्ये आहोत. आमचे जीवनमान उंचावण्यासाठी तुम्ही पुढे या आणि या झोपडपट्टीचे अर्धवट राहीलेले प्रकल्प पुर्ण करा, त्याला निधी आणा तो कसा आणायचा कुठून आणायचा, काय आणायचा हे तुम्ही बघा आणि आम्हां झोपडपट्टीवासीयांना चांगल्या घरात राहण्यासाठी दया एवढीच मी कळकळीची विनंती करतो आणि थांबतो, जय हिंद, जय महाराष्ट्र !

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. चिंचवडे ताईनी याठिकाणी झोपडपट्टीचे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. लोखंडे यांनीही याठिकाणी सांगीतलेले आहे. आपल्या प्रशासनाला झोपडपट्टीत काम करण्याचा उत्साहच राहिलेला नाही. ज्यावेळेला हा प्रकल्प राबविण्याचे ठरले आज पंधरा वर्षाच्या कालावधीमध्ये मनात आले असतेतर हा सहज प्रकल्प पुर्ण झाला असता, हे पैसे परत पाठविण्याचा प्रश्नच राहिला नसता. कुठेतरी आपल्याकडून पाठपुरावा करायला कमी पडलेलो आहोत. नेहमीच या विषयावर झोपडपट्टीचा प्रतिनीधी म्हणून आम्ही बोलत असतो. आमची मागणी एवढीच असते की झोपडपट्टीतील लोकांच्यासाठी सर्व सुखसोई उपलब्ध व्हाव्या एवढी अपेक्षा असते. शासनाच्या माध्यमातून १९९५ ते २००० चा जी.आर.आलेला आहे त्या माध्यमातून तो हाक्क त्यांना मिळण्यासाठी सर्वजण प्रयत्न करत असतात. गेली तीन ते साडेतीन वर्षे झोपडपट्टीमधील प्रतिनिधीत्व करत असताना, पाठपुरावा करत असताना अधिका-यांमध्ये उल्हास राहिलेला नाही. आपण काम करण्यासाठी नेहमी प्रयत्न करत असतो. आपल्या बरोबर दोन-तीन वेळेला मिटींग झालेली आहे पण मला नाही वाटत हे लोक तुम्हांला रिस्पॉन्स देत असतील. तुमच्या ऑफीसमध्ये, केबीनमध्ये या गोष्टी हे सांगतात पण प्रॅक्टीकली तशी परिस्थिती नाही. अजंठानगरच्या संदर्भात बोलायच झालतर गेले दोन-तीन वर्षामध्ये चार-पाच बिल्डींग त्याठिकाणी असताना दोन बिल्डींग आपण ताब्यात दिल्या उरलेल्या अजूनही तीन बिल्डींग पेन्डींग आहेत हे काम कोणाचे आहे. त्याठिकाणी तीन बिल्डींग उभ्या राहून त्याला पण दोन चार वर्षे झाले त्या कधी पुर्ण झालेल्या नाहीत. त्याठिकाणी मेन्टेनन्स, त्याचे रिपेअर, त्याच ड्रेनेज त्याचा पाठपुरावा करणं या सगळया गोष्टीला प्रशासनच जबाबदार आहे. मी आपल्याला मागेही बोललो होतो की आपण ज्यावेळेस पुनर्वसन प्रकल्प करत असताना, झोपडपट्टी विरहीत शहर आपल्याला करायच असताना ज्यावेळेला आपण झोपडपट्टीमधल्या लोकांना घर देताना हे ट्रॅन्झीट कॅंपमध्ये घर आहे ते तुम्ही परत करा हे आपल्याकडून, अधिकारी वर्गाकडून ते होत नाही. पण आपल्याला जे करायचे आहे ते साध्य होणारच नाही. मी दोन तीन वर्षे पाठपुरावा करतो. तुम्ही पुनर्वसन प्रकल्पामध्ये जेव्हा त्यांना घर देता त्यावेळेस ज्याठिकाणी ट्रॅन्झिट कॅंपमध्ये घर असतील त्याच ठिकाणी मॅच केले पाहिजे. जेणेकरुन मोकळया जागेत त्या योजना राबवल्या जातील. त्यांच्या सुखसोईसाठी मोकळी जागा लागणार आहे. पण आपण कंटाळा करतो. सर्व्हे करतो, सर्व्हेक्षण करतो म्हणून आपण ढकलत असतो. गावडे साहेबांनी त्याठिकाणी रिस्पॉन्स दिला, चांगले काम करण्याचा प्रयत्न केला. आता तीन बिल्डींग आहेत. आपल्या बरोबर मिटींग झाली त्यावेळेस तो विषय झाला की आपण ताबडतोब दयावी म्हणून आणि दोन-तीन दिवसामध्ये केबीनमध्ये जावुन साहेबांशी बोललोतर ते म्हणाले १५ तारखेला एक बिल्डींग देणार आहेत. एक बिल्डींग

का, दोन बिल्डींग आपण का देत नाहीत. कारण काय आहे. बिल्डींग उभी आहे, लोक पात्र आहेत सर्व आहे मग आपण देण्यासाठी का कंटाळा करतो. काय अडचण आहे. याच एकच कारण आहे आपल्या प्रशासनाला झोपडपट्टीमध्ये काम करण्यासाठी बिलकूल इन्ट्रेस्ट नाही. कसे तरी तीन वर्षे काढायचे आणि नंतर दुसऱ्या विभागात जायचे एवढाच वेळकाढूपणा चाललेले आहे. पात्रता यादयामध्ये तफावत आहे. झोपडपट्टी तुमच्याकडे, तुम्हांला सर्व माहिती आहे, तुम्ही सर्व्हेक्षण केलेल आहे, पात्रता यादी तुमच्याकडे आहे. मग आता लोखंडे साहेबांनी सांगीतल्याप्रमाणे तुम्हांला त्याठिकाणी एखादयाला पंधरा वर्षापासून घर देता आले नाहीतर त्या माणसाने शहरात कुठं घरच घ्यायचे नाही का. १०x१० ची खोली त्याने घेतल्यानंतर त्यास तुम्ही त्याला घर आहे म्हणून घरच दयायच नाही हे चुकीच आहे. लोखंडे साहेबांनी सांगीतल की असे कुठेच लिहीलेले नाही की घर असेलतर घर देवू नये म्हणून. दहा-पंधरा वर्षापासून त्यांची कुटूंब वाढणार नाहीत का मग त्यांनी एखाद मुलांनी मोठ घर घेतलतर तुम्ही त्याला घर देणार नाहीत का. घराच्या बदल्यात घर दयायच असतांना या सगळया पळवाटा काढून तो प्रकल्प रखडलेला आहे. आम्हांला बाकीच काही म्हणायच नाही पण या झोपडपट्टीचा सर्व्हे केल्याप्रमाणे तुम्ही त्यांना घर देणार आहेत हे आम्हांला माहिती आहे त्याच घराची मागणी करतो. अजून नवीन काही मागतोय का २००० च्या नंतरच्या लोकांना घर दया असे आम्ही म्हणत नाहीत पण ते तुमच्या सर्व्हेमध्ये आलेलं आहे. १९९५ ला २००० ला शासनाने जी.आर. दिलेला आहे त्या माध्यमातून घर दयावे अशीच आमची अपेक्षा आहे. त्याकरिता या दिरंगाईला जबाबदार कोण? झोपडपट्टीधारक जबाबदार आहेत का लोकप्रतिनीधी जबाबदार आहेत. मग तुम्ही तसं सांगाव की आम्ही सर्व जबाबदार आहोत, तुम्ही पाठपुरावा केलेला नाही तुमच्यामुळे झाल नाही त्यामुळे हे रखडलं, सल्लागार लोकांनी सल्ला दिलेला आहे त्याच्या संदर्भात काय करायचे त्यांची जबाबदारी नाही का? बिल्डर लोकांची जबाबदारी नाही का? त्यांनी वेळेवर प्रकल्प पुर्ण करायला पाहिजे. तुम्ही त्यांना पैसे दिले नाहीत अशातलाही भाग नाही. या गोष्टी करत असताना झोपडपट्टी मधील नागरीकांवर का अन्याय करायचा. काय त्यांचा दोष आहे, काय त्यांच्या चुका आहेत. झोपडपट्टी विरहीत शहर करायचा असा तुमचा मानस आहे, शहराचा आहे, शासनाचा आहे आपल्या सर्वांचाच आहे. त्यासाठीच आमची मागणी आहे की या सर्वांना घर दिले पाहिजेत. त्यांची चुक नसताना, कारण आता काय होणार आहे झोपडपट्टीतले सर्वजण ज्यांना घर मिळालेले नाहीत ते सगळे आमच्या अंगावर येणार आहेत. उदया तुम्ही हात झटकून बसणार की शासनाकडून आलेले आहे त्यामुळे व्याजासहीत देणार किती देणार काय देणार याच्याशी आमचा काही संबंध नाही.आमची एवढीच मागणी आहे की झोपडपट्टीतील पात्र लोकांना घर देणार आहोत, ही जबाबदारी आपली नाही का? आपली जबाबदारी आहे. बाकी तुम्ही केलेले आहे. ५० ते ६० टक्के लोकांना घर दिलेले आहेत. उरलेल्या लोकांना घर नाही दिलेतर कसे होणार. आम्ही तुम्हांला विनंती करु शकतो की हे प्रकल्प पुर्ण करावा असे आम्ही

सांगातो. इतर ठिकाणचे प्रोजेक्ट असु देत पण मी व्यक्तीगत माझ्या अजंठानगर संदर्भात बोलतो. मागे सर्व्हेक्षण केल्याप्रमाणे काही एमआयडीसी मधील, काही प्राधिकरणामधील असेल त्या पात्र लोकांना घर दयावेत आणि तो अजंठानगरचा परिसर चांगला, सुशोभित करावा अशी विनंती करतो. माझी विनंती आहे की त्या तीन बिल्डींग आहेत आपण मिटींग घेतली होती पण अजूनही त्याच्यामध्ये जो स्पिड पाहिजे तो नाही. तुम्ही अधिका-यांना विनंती करा आणि त्या तीन बिल्डींग पण ताबडतोब दया जेणे करुन त्याठिकाणी ११२x३ केअर होईल व उरलेल्या जागेमध्ये झोपडपट्टीतील लोकांसाठी एक चांगल समाज मंदीर, गार्डन असू दयात आणि दुसर म्हणजे प्रत्येक बिल्डींगमध्ये त्याठिकाणी छोटेछोटे शॉप किराणा दुकानासाठी आपण प्रोव्हिजन केलेली आहे, पार्कींगमध्ये, बेसमेंटमध्ये. त्याठिकाणी असलेले किराणा दुकान तिथं तुम्ही पत्राशेडमध्ये, ट्रॅन्झिट कॅंपमध्ये गेले सात आठ वर्षे ते भीजत पडले तिथं सुखसोई नाहीत त्यांना त्याठिकाणी रेडी बिल्डींगमध्ये तुम्ही शॉप टाकुन देवू शकत नाहीत. हे सगळ पात्रता यादीमध्ये आहे, तुमच्या सर्व्हेमध्ये आहे केवळ तुमच्या प्रशासनाच्या लोकांना तिथं इन्ट्रेस्ट नसल्यामुळे त्याठिकाणी एक छोटेसे दुकान तुमच्या मंजूर प्लॅनमध्ये आहे, परंतु ते एकाही बिल्डींगला नाही. आपण त्याठिकाणी सॅंक्शन करत असताना नेहमीच्या युजेससाठी काही गोष्टी लागतात त्यासाठी त्याठिकाणी एका दुकानाची व्यवस्था प्रत्येक बिल्डींगमध्ये आपण केलेली आहे पण ते अजूनही ट्रॅन्झीट कॅंपमध्ये, पत्राशेडमध्ये इकडं तीकडंच पडलेलं आहे. त्यांना का देत नाहीत, काय प्रॉब्लेम आहे, आपण बिल्डर कडून ते सगळ करुन घेतलय, सॅंक्शन प्लॅनमध्ये आहे. ते करायला आम्ही कितीतरी वेळा मध्यंतरी राजन पाटील साहेबांना सांगीतल, तांबेसाहेब होते त्यांना सांगीतल, गावडे साहेबांनी सांगीतल, मंगलाताईनी त्यावेळेला कितीतरी वेळा त्या व्यापा-यासाठी भांडण आहे पण ते घर अजूनही देत नाहीत. माझी विनंती आहे की त्या लोकांसाठी दुर जायची जी व्यवस्था आहे ती जवळच व्हावी अशी मी विनंती करतो. व्यापा-यांना न्याय मिळावा अशी मी विनंती करतो, धन्यवाद.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी सर्व नगरसेवकांना आणि मा.महापौरांना विनंती करते की आमच्या सहकारी नगरसेवीका अश्विनी चिंचवडे यांनी त्यांचे काही स्वत:चे प्रश्न त्याच्यामध्ये असल्यामुळे हे प्रश्न विचारलेले आहेत. पुढे आपण वि.क्र.६ विषयावर वर चर्चा करणारच आहोत. अश्विनी चिंचवडे यांनी प्रश्न विचारलेला आहे वेताळनगर भागा मधील त्यांच्या वॉर्ड मधला तो प्रश्न आहे त्याच्यामध्ये त्यांनी जे उत्तर मागीतलेले आहेत ते आम्हांला सगळयांना अपेक्षीत आहे. तुम्ही एक तासाचा वेळ दिलेला आहे आणि नंतर ज्या त्यांच्या मुद्दयाकडे गांभीर्याने बघीतल गेल पाहिजे किंवा मा.आयुक्त साहेबांकडून आम्हांला जे उत्तर अपेक्षीत आहे त्या उत्तरासाठी मा.महापौरांना विनंती करते की वेताळनगरमधील त्यांनी जे प्रश्न विचारलेले आहेत. तेथे आत्महात्या झाली त्याच्या संदर्भामध्ये नंतर पात्र केल गेल आहे तो एक प्रश्न आहे. जे पात्र लाभार्थी आहेत त्यांना घर का नाही दिले

किंवा सर्व्हेक्षण का राहीलेलं आहे. वेताळनगरच्या कोर्टामध्ये बाकीच्या गोष्टीच्या काहीही अडचणी नसताना वेताळनगर प्रकल्प मागे का राहिलेला आहे याला जबाबदार कोण आहे. त्याच्यावर काय कारवाई करणार याचा खुलासा करावा, खुलासा झाल्यानंतर वेळ राहिलातर बाकीच्यांनी बोलावे अन्यत: ६ नंबर विषयावर आपण बोलावे. कारण प्रत्येकाच्या माझ्या सुध्दा वॉर्डमध्ये झोपडपट्टी आहे आम्हांला सगळयांनाच बोलायचे आहे. परंतु वेळेचे बंधन असताना आणि प्रश्न विचारणा-यांना उत्तर अपेक्षीत असताना आपण त्यांचा प्रथम खुलासा करावा. मा.आयुक्तांचा खुलासा आम्हांला अपेक्षीत आहे. आमच्या प्रश्नाचे उत्तर दयावे नंतर चर्चा करावी प्रथमत: खुलासा करणे आवश्यक आहे.

**मा.महापौर-** आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, मा.सभागृह. मा.चिंचवडे मॅडमचे पाच प्रश्न आहेत. सल्लागारांची नेमणुक दि.२४/११/२००६ रोजी करण्यात आलेली आहे. तब्बल सात वर्षानंतर दि.१६/६/२०१४ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे त्याचा खुलासा करावा म्हणून. त्याबद्दल आम्ही वस्तुस्थिती नमुद केलेली आहे, तरी सांगू इच्छितो की २००६ पासून २०१४ पर्यंत आता आपण म्हटल्याप्रमाणे, सर्वच सन्मा.सदस्यांनी सांगीतल्याप्रमाणे ब-याच त्रुटी होत्या. नोटीस देण्यासाठी का उशिर करण्यात आला आणि नोटीसी नंतर त्यांनी काय खुलासा दिलेला आहे तो समाधानकारक आहे का नाही यासर्वच बाबी आपल्याला लेखी स्वरुपात आमची देण्याची तयारी आहे. वेताळनगरमध्ये इन्सीटू प्रोजेक्ट म्हणजे पुर्वीच्या झोपडया बाजुला करणे आणि त्याठिकाणी इमारतीला जागा उपलब्ध झाल्यानंतर इमारती बांधणे. आणि आपले से. २२ सोडलेतर बाकी सगळया पुनर्वसनमध्ये हाच प्रश्न असल्यामुळे ख-या अर्थानं या झोपडया बाजूला करुन एक एक साईड देता आली नाही म्हणून या ब-याच गोष्टीमुळे याला उशिर झालेला दिसतो. आपला मुद्दा क्रमांक ६ जो आहे त्याच्यामध्ये आपण सर्वसाधारणपणे उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामध्ये प्रकल्प वेळेत पुर्ण न होण्याची कारण सर्वसाधारण देण्यात आलेली आहेत. त्याच्यामध्ये आपल्याला ऐनव्हारोन्मेंट क्लिअरन्स आणि कन्सेन्ट टू ऑपरेट हा जो आपल्याला एमपीसीबी कडून मिळायला पाहिजे तो मिळण्यासाठी कालावधी लागलेला आहे. प्रत्येक बिल्डींगची सोसायटी करायची असते त्यासाठी वेळ लागलेला दिसतो आहे. त्यानंतर लाभार्थ्याचे बँकेत खाते काढणे, लाभार्थ्यांचा स्वहिस्सा जमा करणे, बँकेकडून लोन घेणे हे काम राहिलेले आहेत. याच्यामध्ये कोण जिम्मेदार आहे, नोटीस का उशिरा देण्यात आली, कन्सलटन्सी यांनी काम केले का नाही याची माहिती सविस्तर देण्यात येईल. परंतु तूर्त आपण विचारता की सर्वसाधारण कामं काय आहेत ते मी सांगण्याचा प्रयत्न करतो आहे. त्यामध्ये वेताळनगर, अजंठानगर, विठ्ठलनगर, मिलिंदनगर, उदयोगनगर या ठिकाणी अशाप्रकारे डेव्हलपमेंट करायची होती त्याठिकाणी या विवीध कामामुळे लेट झालेले आहे. मी एक सांगू इच्छितो की हा विषय आम्ही आणलेला आहे. प्रश्नोत्तरावरतर बोलतो आहोतच तरी

पण मी विषय नंबर ६ बद्दलही थोडक्यात सांगू इच्छितो. हा प्रकल्प केंद्रशासनाने दिलेल्या जेएनएनयुआरएम अंतर्गत ३१ मार्च २०१५ पर्यंत त्याची मुदत होती त्याच्यानंतर केंद्रशासनाने मुदत वाढविलीतर महापालिका किंवा प्रशासन किंवा हे सभागृह सुध्दा कोणीही या मताचे नाही की हे बंद करावे. तथापि से-२२ मध्ये हायकोर्टाचा स्टे असेल, से.२२ सोडून बाकी इतर ज्या साईड आहेत त्या प्रत्येक ठिकाणी कमीत कमी एक बिल्डींग व जास्तीत जास्त तीन बिल्डींग अशा राहिलेल्या आहेत आणि त्यासाठी फार जास्त रक्कम लागणार नाही. प्रशासनाने हा प्रस्ताव याच्यासाठी ठेवलेला आहे की याच्यामध्ये स्टेट लेव्हलवर जे आहे ते सारखे मागे लागलेले आहेत.

**मा.अश्विनी चिंचवडे-** मा.महापौर साहेब, परवानग्या कोणी घ्यायच्या आहेत.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह आपला दुसरा प्रश्न विचारला गेला त्यामध्ये केंद्र शासनाचे कॅग, राज्यशासन, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या मार्फत लेखापरिक्षण झालेले आहे. परंतु त्यामध्ये जे आक्षेप घेतले आहेत त्यांची पुर्तता केल्यानंतर आक्षेप निरस्त झालेले आहेत का याबाबत माहिती दयावी असा आहे. कॅगचा मुळ रिपोर्ट त्याच्यामध्ये आलेले आक्षेप, त्यावर आम्ही दिलेलं उत्तर, कॅगन ते ऍक्सेप्ट केलं किंवा नाही केल. ही सर्व माहिती आपल्याला मी देतो. आपण प्रश्न क्र. ३ उपस्थित केलेला आहे की महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दि.२५/८/२००९ ला नोटीस दिली होती ही वस्तुस्थिती आहे. त्यानंतर तब्बल आकरा महिन्यानी पर्यावरण दाखला मिळण्यासाठी १५/७/२०१० रोजी महानगरपालिकेनं महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण बोर्डाकडे अर्ज केल्याचे आपण नमुद केलेल आहे हे आमच्या उत्तारतून आम्ही म्हणलेल आहे. ११ महिन्याचा उशिर का झाला असा प्रश्न आपण उपस्थित केलेला आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण बोर्डाकडून नोटीस आलेली असतानाही ११ महिने उशिर का केला याचे उत्तर आपल्याला ती मुळ फाईल बघुनच दयाव लागणार आहे. वेताळनगरमध्ये जेथे जेथे डिले झालेला आहे त्याबद्दल सविस्तर चौकशी करण्यासाठी प्रशासन तयार आहे. दक्षता विभागामार्फत चौकशी करु किंवा थर्ड पार्टिमार्फत म्हणजे तो विभाग सोडून इतर विभाग जो आहे, त्यातला एखादा जबाबदार अधिकारी किंवा ऍडीशनल कमीशनर, आमच्याकड ऍडीशनल कमीशर टेक्निकल बाबी मधले आहेत आणि दक्षता विभागही आहे. दोन्ही पण इन्डेपेन्डंट आहेत टेक्निकली लोक आहेत. हे दोन्ही आयुक्तांच्या अखत्यारीत आहेत त्यामुळे या दोन्ही पैकी एका अधिका-या मार्फत या वेताळनगर प्रकल्पाची सुरवात कशी झाली आणि आता पर्यंत उशिर कसा कसा झाला, त्यामध्ये कोण दोषी आहे याची माहिती घ्यायची आमची तयारी आहे. पुढच्या प्रश्नाकडे जातो झोपडपट्टी पुनर्वसन प्रशासन विभागाने चुकीची व खोटी माहिती दिली व काही अधिका-यांचे नावाचाही खुलासा करावा. याबद्दलही प्रशासनाकडून त्या कालावधीमध्ये हा प्रकल्प राबविणारे अधिकारी कोण होते, कोणाचे नाव लपवले, ती का लपवले याची पण चौकशी करु. वेताळनगरमध्ये तीन इमारती आपल्याला पुर्ण करायच्या आहेत.

**मा.अश्विनी चिंचवडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मेन म्हणजे चाफेकर चौकातला तो प्रकल्प होता आणि चाफेकर चौकातले त्याच्यामुळे सुशोभिकरण राहिलेले आहे. आणि जे पात्र आहेत तिथला अगोदर विषय सोडवायचा आहे. जे अधिकारी दोषी असतील त्यांची चौकशी झाली पाहिजे. जे पात्र आहेत त्यांना लाभ हा मिळालाच पाहिजे.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह आपला शेवटचा प्रश्न असा आहे की हा प्रोजेक्ट पुर्ण करण्यासाठी पुढील माहिती देण्यात यावी त्यासाठीच आपण हा विषय ठेवलेला आहे. यामध्ये मी सभागृहाला सांगू इच्छितो की केंद्रशासनाने हि स्किम ३१ मार्च २०१५ ला बंद करायचे ठरविल्यामुळे आम्ही आपल्याकडे आलेलो आहोत. परंतु केंद्रशासन नवीन योजना घेवून येत आहे. राज्यशासन सुध्दा नवीन हौसिंग धोरण घेवून येत आहे आणि त्याव्यतिरीक्त ज्या एक, दोन, तीन इमारती राहीलेल्या आहेत त्यासाठी काही जास्त पैसे लागणार नाहीत महापालिकेच्या फंडातून सुध्दा ते होवू शकेल, तो धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आपण ज्यावेळेस तो विषय चर्चेला येईल त्यावेळेस ठरवावं अशी माझी सभागृहाला विनंती आहे. वेताळनगर प्रकल्पाबाबत सविस्तर चौकशी करण्यात येईल.

**मा.अश्विनी चिंचवडे -** मा.महापौर साहेब, पात्र सर्व लोकांना वेताळनगरमध्ये घरे मिळाले पाहिजेत. आपल्या अधिका-याची चुक होती परवा पाऊस पडला नवीन बिल्डींगच्या टेरेसच काम करायच म्हणून तिथली भींत पाडली त्यादिवशी खुप पाऊस झाला आणि लोकांच्या घरात पाणी घुसलं याचे सर्व मी तुम्हांला व्हॉटसऍपवर फोटो पाठविते. त्या अधिका-यांवर सुध्दा कारवाई व्हावी अशी माझी मागणी आहे.

**मा.महापौर -** प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे विषय क्रमांक १ घ्यावा.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - ६५७ | विषय क्रमांक - १ |
| दिनांक - ६/४/२०१५ | विभाग- मा.आयुक्त |

संदर्भ :- १) मा.संध्या गायकवाड, मा.अतुल शितोळे यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१०८१९ दि.२१/२/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट, पिंपरी या ट्रस्टद्वारे हृदयरोग, कॅन्सर, किडनी, मेंदूचे आजार, दुर्धर आजार, गंभीर अपघातग्रस्त आणि दुर्धर आजारांनी ग्रासलेल्या रुग्णांना तसेच नैसर्गिक आपत्ती पीडितांना मदत महापालिकेकडून प्रतिवर्षी मिळणा-या रक्कम रु.२५,००,०००/- या अनुदानातून अर्थसहाय्य केले जाते. शासन निर्णय क्रमांक पीसीसी ३००६/१९९७ प्र.क्र.३९७/नवि२२ मंत्रालय, मुंबई-४०००३२ दिनांक १८.१२.२००७ नुसार या ट्रस्टला दरवर्षी र.रु.२५,००,०००/- एवढे अनुदान

देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरिता र.रु.२५,००,०००/- इतके अनुदान ट्रस्टला मंजूर करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २

दिनांक - ६/४/२०१५ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.आशा सुर्यवंशी, मा.उल्हास शेट्टी यांचा प्रस्ताव.

२) मा.शहरसुधारणा समिती सभा ठराव. क्र.४२ दि.४/३/२०१५

पिंपरी, काळेवाडी (पवनानगर) परिसरामध्ये स.नं.८८, ९०, ९१, ९५ व ९६ (आरक्षण क्र.६३९) सन १९८४ पासून नागरिक वास्तव्य करीत आहे. येथील नागरिक सर्वसामान्य व कामगार वर्गातील असून सदरचे आरक्षण विकसित केल्यास येथील नागरिकांवर विस्थापित (बेघर) होण्याची वेळ येईल. सदरचे नागरिक सन १९८४ पासून राहत असून महापालिकेचा विकास आराखडा सन १९९५ मध्ये केलेला असून त्या मध्ये आ.क्र.६३९ हे उद्यानासाठी आरक्षित केलेले आहे. त्यानुसार स.नं.८८ मधील क्षेत्रावर महानगरपालिकेने उद्यान विकसित केलेले आहे. परंतु येथील नागरिकांचा विचार करुन उर्वरित स.नं.९०, ९१, ९५ व ९६ या स.नं. आ.क्र.६३९ (उद्यान) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करुन आरक्षणातील क्षेत्र निवासी भागात समाविष्ट करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची विकास योजना (आराखडा) सन २००९ साली मंजूर केलेली आहे. त्यामध्ये प्रभाग क्र. १८ किवळे विकासनगर मधील स.न. ४६ अ आरक्षण क्र. पी.एस.४/१०९ (प्राथमिक शाळा) आरक्षण क्र.पी.जी. ४/११० (खेळाचे मैदान) तसेच स.नं. ४२ अ मधील आरक्षण क्र. पी.एस. ४/११३ (प्राथमिक शाळा) स.नं. ६६ आरक्षण क्र. ४/१०३ (एस.डब्ल्यू.टी) अशी विविध प्रकारची आरक्षणे दर्शविलेली आहेत. या आरक्षणाच्या जागेवर ग्रामपंचायतीपासून म्हणजेच सन १९९७-९८ पूर्वी पासून नागरिक वास्तव्य करीत आहेत तेथील

नागरिक सर्वसामान्य, कामगार व सेवानिवृत्ती वर्गातील असून सदरचे आरक्षण विकसित केल्यास तेथील नागरिकांवर बेघर होण्याची वेळ येईल.

सदर बाबींचा विचार करुन स.नं. ४६ मधील पी.एस. ४/१०९, पी.जी.४/११० हि आरक्षणे पूर्णत: वगळण्यात यावीत व स.नं. ४२ अ पी.एस. ४/११३ स.नं.६६ मधील ४/१०३ अंशत: म्हणजेच निवासी क्षेत्र वगळून आरक्षण विकसित करावी. सदर आरक्षण महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करुन आरक्षणातील क्षेत्र निवासी भागात समाविष्ट करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ६५८ विषय क्रमांक - २

दिनांक - ६/४/२०१५ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.आशा सुर्यवंशी, मा.उल्हास शेट्टी यांचा प्रस्ताव.

२) मा.शहरसुधारणा समिती सभा ठराव. क्र.४२ दि.४/३/२०१५

पिंपरी, काळेवाडी (पवनानगर) परिसरामध्ये स.नं.८८, ९०, ९१, ९५ व ९६ (आरक्षण क्र.६३९) सन १९८४ पासून नागरिक वास्तव्य करीत आहे. येथील नागरिक सर्वसामान्य व कामगार वर्गातील असून सदरचे आरक्षण विकसित केल्यास येथील नागरिकांवर विस्थापित (बेघर) होण्याची वेळ येईल. सदरचे नागरिक सन १९८४ पासून राहत असून महापालिकेचा विकास आराखडा सन १९९५ मध्ये केलेला असून त्या मध्ये आ.क्र.६३९ हे उद्यानासाठी आरक्षित केलेले आहे. त्यानुसार स.नं.८८ मधील क्षेत्रावर महानगरपालिकेने उद्यान विकसित केलेले आहे. परंतु येथील नागरिकांचा विचार करुन उर्वरित स.नं.९०, ९१, ९५ व ९६ या स.नं. आ.क्र.६३९ (उद्यान) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करुन आरक्षणातील क्षेत्र निवासी भागात समाविष्ट करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची विकास योजना (आराखडा) सन २००९ साली मंजूर केलेली आहे. त्यामध्ये प्रभाग क्र. १८ किवळे विकासनगर मधील स.न. ४६ अ आरक्षण क्र. पी.एस.४/१०९ (प्राथमिक शाळा) आरक्षण क्र.पी.जी. ४/११० (खेळाचे मैदान) तसेच स.नं. ४२ अ मधील आरक्षण क्र. पी.एस. ४/११३ (प्राथमिक शाळा) स.नं. ६६ आरक्षण क्र. ४/१०३ (एस.डब्ल्यू.टी) अशी विविध प्रकारची आरक्षणे दर्शविलेली आहेत. या आरक्षणाच्या जागेवर ग्रामपंचायतीपासून म्हणजेच सन १९९७-९८ पूर्वी पासून नागरिक वास्तव्य करीत आहेत. तेथील नागरिक सर्वसामान्य, कामगार व सेवानिवृत्ती वर्गातील असून सदरचे आरक्षण विकसित केल्यास तेथील नागरिकांवर बेघर होण्याची वेळ येईल.

सदर बाबींचा विचार करुन स.नं. ४६ मधील पी.एस. ४/१०९, पी.जी.४/११० हि आरक्षणे पूर्णत: वगळण्यात यावीत व स.नं. ४२ अ पी.एस. ४/११३ स.नं.६६ मधील ४/१०३ अंशत: म्हणजेच निवासी क्षेत्र वगळून आरक्षण विकसित करावी. सदर आरक्षण महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करुन आरक्षणातील क्षेत्र निवासी भागात समाविष्ट करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ३

दिनांक - ६/४/२०१५ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/वाकड/६६३/२०१४, दि.१७/१२/१४

२) मा.शहरसुधारणा समिती सभा ठराव. क्र.४३ दि.४/३/२०१५

मौजे वाकड जगताप डेअरी ते बालेवाडी बाणेर या दोन्ही ठिकाणांसाठी जोडणा-या पुलाकरीता वाकड येथील स.नं.२६० पैकी जमिनीवर मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये ३५ मी.रुंद रस्ता दिनांक २४/१०/२०१३ अन्वये घोषित केलेला आहे. सदर मुळा नदीवरील पुलाचे काम चालू केलेले असल्यामुळे मौजे वाकड येथील कलम २०५ अन्वये घोषित केलेल्या ३५ मी.रुंद रस्त्याकरीता जमीन संपादन करणे आवश्यक आहे. मौजे वाकड येथील स.नं.२६० पैकी मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये घोषित केलेल्या ३५ मी.रुंद रस्त्याखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ तातडीचे कलम १७ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.अनंत को-हाळे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मौजे चिंचवड महापालिकेच्या विकास आराखडयामध्ये असलेल्या मोरया हॉस्पिटलसमोरुन केशवनगरमार्गे चिंचवड-काळेवाडी पुलाकडे जाणा-या रस्त्याला रहदारी / वाहतुक खुप वाढली असून बरेच अपघात या रोडला होत असतात. याच रस्त्याला समांतर असणारा महानगरपालिकेच्या विकास

आराखडयामध्ये असलेला तालेरा हॉस्पिटल समोरुन काकडे टाऊनशिप मधुन मोरया गोसावी क्रिडांगणासमोरुन चिंचवड काळेवाडी पुलाला जाणारा रस्ता ८० टक्के पुर्ण झालेला असून २० टक्के रस्त्याची जागा ताब्यात आली नसल्याने त्या रस्त्याने वाहतुक होवू शकत नाही केशवनगर मार्गे चिंचवड-काळेवाडी पुलाकडे जाणा-या रस्त्याची रहदारी वाहतुक कमी होण्यासाठी हा रस्ता पुर्ण होणे गरजेचे आहे तरी या रस्त्याचे भूसंपादन अधिनियम १८९४ तातडीचे कलम १७ अन्वये भुसंपादन करणे कामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडे पाठविण्याकामी मान्यता देणेत यावी.

**मा.सदगुरु कदम** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.धनंजय आल्हाट -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मौजे मोशी प्रभाग क्र. ६ मधील आरक्षण क्र. १/२०२ ट्रक टर्मिनलचे आरक्षण असून सदर आरक्षणामध्ये १९९५ पासून नागरीक वास्तव्य करीत असून तेथील सर्वसामान्य नागरीक व कामगार वर्ग मोठयाप्रमाणावर असून सदर ठिकाणचे आरक्षण विकसित केल्यास तेथील नागरिकांना विस्थापित (बेघर) होण्याची वेळ येईल. त्यामुळे सदर आरक्षण क्र. १/२०२ ट्रक टर्मिनल रद्द करुन रहिवास विभागात समाविष्ठ करावे. अथवा सदर आरक्षण याच प्रभागातील आरक्षण क्र. १/१७० जकात नाका या ठिकाणी त्यातील दक्षिणेकडील २० गुंठे सोडून उर्वरीत क्षेत्रावर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये स्थलांतराची कार्यवाही करुन सदर आरक्षण क्र. १/२०२ ट्रक टर्मिनल निवासी विभागात समाविष्ठ करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

**मा.किरण मोटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार मित्र. मी एका गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो की, माझ्या प्रभागातील आरक्षण क्र. २० बेघरासाठी घरे. आता ज्यापध्दतीने आरक्षणाचा विषय झाला ३७ (२) अन्वये विषय झाला असा विषय २००७ ला झालेला आहे. त्याच्यानंतर हे पत्र पुढे शासनाकडे गेले त्यानंतर शासनाने सांगीतले बेघरासाठी घरे म्हणून हे आरक्षण आहे परंतु सदर आरक्षणाच्या ठिकाणी जवळ जवळ ६० टक्के आरक्षण अनधिकृत बांधकामाने बाधीत आहे. शासनाने असं सांगीतल की तुम्ही आमच्याकडे पाठविलेले आहे, तुम्ही हे तुमच्या लेव्हलला करा परंतु आपल्याकडून याच्यावर निर्णय झालेला नाही. शासनाने असं सांगीतलं आहे की गुंठेवारी कायदयान्वये ही घरे रेग्युलराईज केलीतर ऍटोमॅटीक कलम ३७ ची आवश्यकता न राहता ऍटोमॅटीक सदर आरक्षण हे रद्द केले जाईल. आज पण तुम्ही सांगीतलेल आहे की अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात राज्यशासनाने आपल्याला न्यायालयामध्ये भूमिका मांडायला लावलेली आहे. फिरुन फिरुन महापालिकेकडे येतात मग आपण का निर्णय नाही घ्यायचे. २००९ ला पत्र आले आ.क्र.२०

संदर्भात योग्य तो निर्णय महापालिका प्रशासनाने घ्यावा. तो विषय एक स्पेशिफीक विषय होता, आरक्षणापुरता होता आज सुध्दा आपण पत्रकारा समोर बोललात की आता जे चाललेल आहे ते न्यायालयाच्या आदेशानुसार बांधकाम पाडण्याचे आपल्याला आदेश आलेले आहेत, शासनाने सांगीतले आहे की महापालिकेनी बाजू मांडायची म्हणून. आयुक्त साहेबांचच पेपरमध्ये स्पिच आहे. मग असं कधीपर्यंत चालणार. महापालिकेच्या प्रशासनाने काही निर्णय घेतला का नाही. तुमच्या, न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे परत एकदा तेथील रहिवाशांना घर पाडण्याची नोटीस आलेल्या आहेत. आम्ही न्याय कोणाला मागायचा. आयुक्त साहेब, या विषयावर संबंधित अधिका-यांनी खुलासा करावा. याच्यामध्ये बाकीच्याच्या भागामध्ये गाईडलाईन्स मिळणार आहेत तरी खुलासा करावा म्हणजे या विषयामुळे आपल्याला ब-याचशा ठिकाणी मदत होणार आहे. आपण या सभागृहात नागरीकांना न्याय देण्यासाठी निवडून आलेलो आहोत. परंतु आपल्या कुठल्याही निर्णयाचा फुटबॉल कसा केला जातो हे याच्यातून कळणार आहे. महापौर साहेब, आपण पण एक लोकप्रतिनीधी आहात, त्यामुळे या विषयाकडे गांभीर्याने बघावे. फक्त आरक्षण २० चा विषय नाही, असे बरेचसे विषय झालेले आहेत. त्याच्या पुढे जावुन काय होते. ही फाईल कशी ट्रॅक झाली कशी महापालिकेकडे परत आलेली आहे त्याची स्टोरी समजलीतरी कोणच या सभागृहात थांबणार नाहीत सगळे निषेध करुन निघुन जातील, तरी खुलासा करावा.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. सन्मा.सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे ते पुर्वीचे आरक्षण असेल त्यावरती काही अनधिकृत बांधकाम असेलतर त्या अनुषंगाने या सभागृहात ३७ चा प्रस्ताव मान्य करुन राज्यशासनाला पाठवला असेलतर त्याचे काय असा प्रश्न आहे. त्यांचे आरक्षण क्र. २० कासारवाडीचे आहे त्याबाबतीत आता माहिती देता येणार नाही परंतु यामध्ये ३७ प्रमाणे पुर्ण कारवाई झाली असेल त्यावेळी सभागृह काय करतं अशा एखादया आरक्षणाच्या बाबतीत ठराव मंजूर करताना त्यावर सुनावणी घेणे, सुनावणीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार करुन तो प्रस्ताव राज्यशासनाला पाठविणे यासाठी आयुक्तांनाच अधिकार आहेत त्याप्रमाणे आयुक्त त्या प्रकरणाची सुनावणी घेवून नंतर तो प्रस्ताव राज्यशासनाला पाठवत असतात. आरक्षण क्रं. २० संदर्भात नेमक काय झालेल आहे हे आपण बघुयात आणि या आरक्षणा बाबतीत शासनाचे काय आरक्षण आहेत, त्याप्रमाणे पुढची कारवाई का नाही झाली याची माहिती आपल्याला देता येईल परंतु ती फाईल बघीतल्या नंतर आपल्याला कळेल काय करता येईल.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ६५९ विषय क्रमांक - ३

दिनांक - ६/४/२०१५ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/वाकड/६६३/२०१४, दि.१७/१२/१४

२) मा.शहरसुधारणा समिती सभा ठराव. क्र.४३ दि.४/३/२०१५

मौजे वाकड जगताप डेअरी ते बालेवाडी बाणेर या दोन्ही ठिकाणांसाठी जोडणा-या पुलाकरीता वाकड येथील स.नं.२६० पैकी जमिनीवर मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये ३५ मी.रुंद रस्ता दिनांक २४/१०/२०१३ अन्वये घोषित केलेला आहे. सदर मुळा नदीवरील पुलाचे काम चालू केलेले असल्यामुळे मौजे वाकड येथील कलम २०५ अन्वये घोषित केलेल्या ३५ मी.रुंद रस्त्याकरीता जमीन संपादन करणे आवश्यक आहे. मौजे वाकड येथील स.नं.२६० पैकी मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये घोषित केलेल्या ३५ मी.रुंद रस्त्याखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ तातडीचे कलम १७ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे चिंचवड महापालिकेच्या विकास आराखडयामध्ये असलेल्या मोरया हॉस्पिटलसमोरुन केशवनगरमार्गे चिंचवड-काळेवाडी पुलाकडे जाणा-या रस्त्याला रहदारी / वाहतुक खुप वाढली असून बरेच अपघात या रोडला होत असतात याच रस्त्याला समांतर असणारा महानगरपालिकेच्या विकास आराखडयामध्ये असलेला तालेरा हॉस्पिटल समोरुन काकडे टाऊनशिप मधुन मोरया गोसावी क्रिडांगणासमोरुन चिंचवड काळेवाडी पुलाला जाणारा रस्ता ८० टक्के पुर्ण झालेला असून २० टक्के रस्त्याची जागा ताब्यात आली नसल्याने त्या रस्त्याने वाहतुक होवू शकत नाही. केशवनगर मार्गे चिंचवड-काळेवाडी पुलाकडे जाणा-या रस्त्याची रहदारी वाहतुक कमी होण्यासाठी हा रस्ता पुर्ण होणे गरजेचे आहे. तरी या रस्त्याचे भूसंपादन अधिनियम १८९४ तातडीचे कलम १७ अन्वये भुसंपादन करणे कामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडे पाठविण्याकामी मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे मोशी प्रभाग क्र. ६ मधील आरक्षण क्र. १/२०२ ट्रक टर्मिनलचे आरक्षण असून सदर आरक्षणामध्ये १९९५ पासून नागरीक वास्तव्य करीत असून तेथील सर्वसामान्य नागरीक व कामगार वर्ग मोठयाप्रमाणावर असून सदर ठिकाणचे आरक्षण विकसित केल्यास तेथील नागरिकांना विस्थापित (बेघर) होण्याची वेळ येईल. त्यामुळे सदर आरक्षण क्र. १/२०२ ट्रक टर्मिनल रद्द करुन रहिवास विभागात समाविष्ठ करावे. अथवा सदर आरक्षण याच प्रभागातील आरक्षण क्र. १/१७० जकात नाका या ठिकाणी त्यातील दक्षिणेकडील २० गुंठे सोडून उर्वरीत क्षेत्रावर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये

स्थलांतराची कार्यवाही करुन सदर आरक्षण क्र. १/२०२ ट्रक टर्मिनल निवासी विभागात समाविष्ठ करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ४

दिनांक - ६/४/२०१५ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.आशा सुर्यवंशी, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.
२) मा.शहरसुधारणा समिती सभा ठराव. क्र.४४ दि.४/३/२०१५

विकास नियंत्रण नियमावलीस अधिन राहून इमारतीचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. त्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत आहे आणि त्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार अगोदर मंजूर कलेल्या आराखडयामधील पुर्नविकास करता येत नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आराखडयातील सोसायटी स्थापन झालेनंतर एकत्रित जागेमध्ये कोणत्याही प्रकारची विभागणी, बदल एकत्रित जागेवर करता येणार नाही आणि तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून लेखी परवानगी प्राप्त करुन घेतल्याखेरीज करता येणार नाही. आणि ज्याअर्थी आराखडयात विविध प्रकारच्या इमारती उदा.सदनिकांच्या इमारती/रोहाऊसेस/दुहेरी बंगला/सुखसुविधा इमारत इ.चा समावेश आहे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून लेखी परवानगी घेण्यापूर्वी सोसायटी/संस्थेची/दालनाची/सभासदांची (बहुमत/ठराव) लेखी संमती घेणे आवश्यक आहे. आणि मंजूर आराखडयातील समाविष्ट उपलब्ध कोणत्याही सोयी-सुविधा दर्शविलेल्या संबंधित जागेवर अथवा इमारतीमध्ये सर्व सभासदांस उपभोगासाठी वापरता येतील. याप्रमाणे धोरण निश्चित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार बंधुनो. वि.क्र.४ मध्ये विकास कामासाठी विकास आराखडा मंजुर केला जातो. त्या वेगवेगळया इमारतीच्या उंच रो हौसेस व उंच इमारती इत्यादीसाठी सामायीक मोकळी जागा व सुविधा या सर्व सभासदांच्या वापरण्यासाठी असतात परंतु आयुक्त साहेब, अशा मोठया सोसायटीमध्ये विकास कामाबाबत मनपाची पुर्वपरवानगी न घेता अनधिकृत मागणी केली जाते. रहिवाशाना

सामायीक सुविधा वापरण्यास मज्जाव केला जातो. याशिवाय भविष्यात अशा सोसायटयामध्ये रिडेव्हलपमेंट पुनर्वविकास करण्याचे झालेतरच कुठल्याही इमारतीच्या जागा मालकाने गाळेधारकांना किती चटई क्षेत्र वापरावे हे निश्चित होणार नाही याची आपण दक्षता घेतली पाहिजे. आयुक्त साहेब, आपण बेकायदेशिर बांधकाम असेल, गुठेवारीचे बांधकाम असेल या बांधकामाना ज्या सुविधा पुरविल्या जातात त्यांचा टॅक्स घेतलेला आहे आणि शास्तीकरही घेतलेला आहे पण असे घेत असताना ऑथोराईज बिल्डींग बेकायदेशिर असतात पण ऑथोराईज बिल्डींग केल्या जातात त्याचा डेव्हलपमेंट चार्ज घेतला जातो, अशा बिल्डींगला सुविधा देत नाही फक्त ड्रेनेजलाईन महापालिका देते. डांबरी रस्ता करायचा असेलतर किंवा इतर सुविधा त्यांना देत नाहीत. तरी अशा सोसायटयांना सुध्दा दयावे, कारण आपण त्यांच्याकडून पाणीबील घेतो, त्यांच्याकडून टॅक्स घेतला जातो असे आपण घेतलेतर निश्चितपणे उत्पन्नामध्ये वाढ होवू शकते. त्यांना सुविधा पुरविल्या पाहिजेत. कारण आपण सांगतो की त्यांना सुविधा देवू शकत नाहीत असे सांगीतले जाते. इतर बांधकाम कायदेशिर करण्यासाठी प्रयत्न करत असतो. त्यांना सुविधा दयायच्या झाल्यातर माझ्या माहितीप्रमाणे पुर्वी आपण १०० रुपयाच्या स्टॅम्पपेपरवर मालकांकडून आम्ही पत्र लिहून घेतले तेव्हा तो रोड केलेला आहे तो रोड कशा पध्दतीने केलेला आहे, महापालिका त्या बिल्डींगचा ज्यावेळेस त्यांच्याकडून डेव्हलपमेंट चार्ज घेते त्यावेळेस त्यांना त्या सुविधा महापालिकेनी दयाव्यात अशी विनंती आहे.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मौजे ताथवडे या गावाचा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत समावेश झाला असून सदर गावात सनं.९२ पैकी मे.संघवी मुव्हर्स लिमिटेड यांच्या मालकीची जागा पुणे जिल्हाच्या प्रादेशिक योजनेनुसार निवासी विभागात समाविष्ट आहे. सदर जागेवर ट्रान्झीट गोडावूनसाठी मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचे मार्फत PRA/NA/SR/140/III/2002 दि.२५/२/२००३ अन्वये NA Permission प्राप्त आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत सदर गावाचा समावेश झाल्यानंतर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेत स.नं.९२ पैकी मे. संघवी मुव्हर्स लिमिटेड यांचे मालकीची मिळकत औद्योगिक विभागात दर्शविलेली आहे. याबाबत पैकी मे. संघवी मुव्हर्स लिमिटेड यांनी हरकत अर्ज महानगरपालिकेस सादर केला. तथापि गठीत नियोजन समिती वा मा.महापालिका सभेने विकास योजना शासनास मंजुरीस्तव सादर करताना त्यांनी दाखल केलेल्या हरकत अर्जाचा विचार झालेला नाही. वास्तविक पाहता प्रस्तुत मिळकतीवर यापूर्वी दिलेले NA Permission पुणे प्रादेशिक योजनेत निवासी वापर, औदयोगिक विभागात दाखवणे हे अन्यायकारक आहे. सबब ताथवडे गावाची विकास योजना शासनस्तरावर मंजुरीची कार्यवाही करताना मे. संघवी मुव्हर्स लिमिटेड यांची स.नं. ९२ मधील मिळकत औदयोगिक विभागाऐवजी निवासी विभागात दर्शविणेबाबत मा.महापालिका सभा या ठरावान्वये शिफारस करीत आहे. याप्रमाणे ताथवडे

गावाची विकास योजना मंजुर करताना उक्त प्रमाणे फेरबदल करुन शासन मंजुरी मिळणेबाबत प्रस्ताव शासनास सादर करणेकामी मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना या ठरावान्वये प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ६६० विषय क्रमांक - ४

दिनांक - ६/४/२०१५ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.आशा सुर्यवंशी, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

२) मा.शहरसुधारणा समिती सभा ठराव. क्र.४४ दि.४/३/२०१५

विकास नियंत्रण नियमावलीस अधिन राहून इमारतीचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. त्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत आहे आणि त्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार अगोदर मंजूर कलेल्या आराखडयामधील पुर्नविकास करता येत नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आराखडयातील सोसायटी स्थापन झालेनंतर एकत्रित जागेमध्ये कोणत्याही प्रकारची विभागणी, बदल एकत्रित जागेवर करता येणार नाही आणि तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून लेखी परवानगी प्राप्त करुन घेतल्याखेरीज करता येणार नाही. आणि ज्याअर्थी आराखडयात विविध प्रकारच्या इमारती उदा.सदनिकांच्या इमारती/रोहाऊसेस/दुहेरी बंगला/सुखसुविधा इमारत इ.चा समावेश आहे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून लेखी परवानगी घेण्यापूर्वी सोसायटी/संस्थेची/दालनाची/सभासदांची (बहुमत/ठराव) लेखी संमती घेणे आवश्यक आहे. आणि मंजूर आराखडयातील समाविष्ट उपलब्ध कोणत्याही सोयी-सुविधा दर्शविलेल्या संबंधित जागेवर अथवा इमारतीमध्ये सर्व सभासदांस उपभोगासाठी वापरता येतील. याप्रमाणे धोरण निश्चित करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे ताथवडे या गावाचा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत समावेश झाला असून सदर गावात स.नं.९२ पैकी मे.संघवी मुव्हर्स लिमिटेड यांच्या मालकीची जागा पुणे जिल्हाच्या प्रादेशिक योजनेनुसार निवासी विभागात समाविष्ट आहे. सदर जागेवर ट्रान्झीट गोडावूनसाठी मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचे मार्फत PRA/NA/SR/140/III/2002 दि.२५/२/२००३ अन्वये NA Permission प्राप्त आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत सदर गावाचा समावेश झाल्यानंतर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेत स.नं.९२ पैकी मे. संघवी मुव्हर्स लिमिटेड यांचे मालकीची मिळकत औद्योगिक विभागात दर्शविलेली आहे. याबाबत पैकी मे. संघवी मुव्हर्स लिमिटेड यांनी हरकत अर्ज महानगरपालिकेस

सादर केला. तथापि गठीत नियोजन समिती वा मा.महापालिका सभेने विकास योजना शासनास मंजुरीस्तव सादर करताना त्यांनी दाखल केलेल्या हरकत अर्जाचा विचार झालेला नाही. वास्तविक पाहता प्रस्तुत मिळकतीवर यापूर्वी दिलेले NA Permission पुणे प्रादेशिक योजनेत निवासी वापर, औदयोगिक विभागात दाखवणे हे अन्यायकारक आहे. सबब ताथवडे गावाची विकास योजना शासनस्तरावर मंजुरीची कार्यवाही करताना मे. संघवी मुव्हर्स लिमिटेड यांची स.नं. ९२ मधील मिळकत औदयोगिक विभागाऐवजी निवासी विभागात दर्शविणेबाबत मा.महापालिका सभा या ठरावान्वये शिफारस करीत आहे. याप्रमाणे ताथवडे गावाची विकास योजना मंजुर करताना उक्त प्रमाणे फेरबदल करुन शासन मंजुरी मिळणेबाबत प्रस्ताव शासनास सादर करणेकामी मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना या ठरावान्वये प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६६१ विषय क्रमांक - ५

दिनांक - ६/४/२०१५ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) प्रशासन अधिकारी यांचे पत्र क्र.फक्षेका/सभा/कावि/२६/२०१५,
दिनांक - १२/०२/२०१५

२) मा.शहरसुधारणा समिती सभा ठराव. क्र.४५ दि.४/३/२०१५

मा. फ प्रभाग समिती ठराव क्रमांक ५४ दिनांक ११/०२/२०१५ अन्वये मौजे चिखली येथील गट क्र.१६५५ (१) व १६५५ (२) यामध्ये १८ मीटर रस्त्याचे आरक्षण टाकण्यात आले असून त्यामुळे या गटातील श्री.शिवाजी बबन मोरे या शेतक-याच्या हिश्श्यातील ७ एकर क्षेत्रापैकी ६.५ एकर क्षेत्र आरक्षणात येत असलेने त्यांचेवर भूमीहिन होण्याची वेळ आलेली असून त्यांचे कुटूंब हवालदिल झाले आहेत. त्यांना भूमीहिन होऊ नयेत या करिता १६५५(१) व १६५५ (२) या गटातील १८ मीटर रस्त्याचे आरक्षण रद्द करुन ते गट क्र.१६५४ या सरकारी गायरानाचे क्षेत्रावर स्थलांतरीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.स्वाती साने -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ६

दिनांक - ६/४/२०१५ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. स्थापत्य BSUP प्र/७१/२०१५, दिनांक - २४/०२/२०१५

२) मा.शहरसुधारणा समिती सभा ठराव. क्र.४६ दि.४/३/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत JnNURM – BSUP अंतर्गत शहरात खालील ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविण्यात येत आहेत. १) से.क्र. २२ निगडी, २)अजंठानगर, ३) मिलिंदनगर, ४) वेताळनगर, ५) उद्योगनगर व ६) पत्राशेड, लिंक रोड उपरोक्त प्रकल्पांची माहिती खालीलप्रमाणे.

**अ) सेक्टर क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प**

से.क्र.२२ निगडी येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प हा संरक्षण खात्याच्या रेड झोन च्या हद्दीमध्ये येत असल्याने सदरबाबत मा. उच्च न्यायालयमुंबई येथे क्र. १८०६/२०११ अन्वये याचिका दाखल करण्यात आलेली आहे. सदर याचिकेस अनुसरुन मा. उच्च न्यायालय, यांनी सेक्टर क्र.२२ निगडी येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पास दि. १२/०४/२०१२ रोजी स्थगिती दिलेली असून सदरच्या स्थगिती आदेशापासुन प्रकल्पाचे काम आहे त्या स्थितीत बंद करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पाबाबत वेळोवेळी सुनावणी झालेली असून अद्यापपर्यंत निर्णय झालेला नाही.

सुनावणीच्या तारखा :- १०/०३/२०११,०२/०२/२०१२, १९/०३/२०१२, ३०/०३/२०१२, १२/०४/२०१२, १८/१०/२०१२, २१/११/२०१२, २३/११/२०१२, १४/०१/२०१३, २५/०२/२०१३, १६/०४/२०१३, ०८/०७/२०१३, ०२/१२/२०१३, १३/०२/२०१४, ११/०६/२०१४, ११/०९/२०१४, ०२/१२/२०१४.

दरम्यान, विषयांकित प्रकल्पाचे ठेकेदार यांनी प्रकल्प आहे त्या स्थितीत बंद करण्याची मागणी करुन विविध Claims सादर केलेले आहेत (सोबत ठेकेदारांची पत्रे अवलोकनार्थ). सदर याचिकेवर निर्णय झाल्यानंतर याबाबत विचार करता येईल असे वेळोवेळीच्या बैठकीत ठेकेदारांना सांगण्यात येत होते. तथापि, सदर दाव्याची न्यायालयामध्ये सुनावणी होऊन दाव्याचा अंतिम निर्णय कधी लागेल याबाबत निश्चित अशी कालमर्यादा नाही. स्थगिती आदेशापासून प्रक्ल्पाची कामे पूर्णतः बंद आहे. सदरची कामे बंद असल्याने ठेकेदारांचे Claims मध्ये वाढच होत आहे.या पार्श्वभुमीवर सेक्टर क्र.२२ निगडी येथील प्रकल्प आहे त्या स्थितीत सिमीत (Curtailment) करणे योग्य राहील. प्रकल्पसिमीत करणे याकामी खालील बाबींचा विचार व्हावा.

१) मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, MHADA यांनी त्यांचे पत्र क्र.एमएच/ मुअ-१/परीपत्रके/नक्र.१४८/२०१३ दि.१८/०६/२०१३ नुसार मनपाकडे अखर्चित पडून असलेल्या निधीवर ९.५ % दराने व्याज आकारुन ते केंद्रशासनाकडे परत करणे

आवश्यक आहे असे कळविले आहे. सदर पत्राची छायांकित प्रत सादर करण्यात आलेली आहे.

२) से.क्र.२२ निगडी येथील प्रकल्पाच्या कामास मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी मनाई आदेश दिलेला असून सदरबाबत वारंवार सुनावण्या झालेल्या असून अद्यापपर्यंत कोणताही निर्णय झालेला नाही. सदर प्रकल्पाचे ठेकेदार Claims मागणीबाबत पत्रव्यवहार करत असून त्यांच्या Claims मध्ये दिवसेंदिवस वाढच होत आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता से.क्र.२२ निगडी येथील प्रकल्प आहे त्या स्थितीत थांबविणेत यावा किंवा कसे याबाबत मा.डॉ. श्री. ए.के. मिश्रा, सचिव, Ministry of Housing & Urban Poverty Alleviation, Government of India यांना क्र.CivilBSUP/56/2014 दि.१५/०२/२०१४ रोजी पत्र पाठविण्यात आलेले असून सदरबाबत अभिप्राय मागविणेत आलेला होता.

३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत सेक्र.२२ निगडी येथील प्रकल्प सिमीत करण्याबाबत क्र.CivilBSUP/56/2014 दि.१५/०२/२०१४ च्या पत्रान्वये मागविलेल्या अभिप्रायास अनुसरुन मा. श्री जॉयदेव प्रामाणिक, समन्वयक JnNURM& RAY Government Of India यांनी JnNURM अंतर्गत राबविण्यात येत असलेले प्रकल्प दि. ३१/०३/२०१५ पूर्वी पुर्ण करावयाचे आहेत. प्रकल्पासाठीची जागा, न्यायालयाची स्थगिती, लाभार्थ्यांचे प्रश्न इ. कारणांसाठी रखडलेला अथवा बंद असलेला प्रकल्प आहे त्या स्थितीत सिमीत करण्यात यावा. तसेच प्रकल्पासाठी देण्यात आलेल्या निधीपैकी न वापरलेला निधी Government Of India यांच्याकडे जमा करणेबाबत त्याचे दि. २४/०३/२०१४ चे पत्रानुसार कळविलेले असून सदर पत्राची प्रत सोबत जोडलेली आहे. JnNURMयोजनेअंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पासाठी केंद्रशासन व राज्यशासन यांच्यामार्फत मनपास निधी प्राप्त झालेला आहे. सदर निधी मनपाच्या खात्यावर जमा असून त्यावरील व्याज मनपाच्या खात्यावर जमा होत आहे.

४) Central sanctioning & Monitoring Committee of Ministry of Housing and Urban Poverty Alleviation (CSMC) कडील दि. ११/११/२०१४ रोजी झालेल्या १५८ व्या मिटींगमध्ये मिलिंदनगर, वेताळनगर, अजंठानगर, उद्योगनगर, लिंक रोड पत्राशेड व से.क्र.२२ निगडी येथील प्रकल्पामधील बांधकामास सुरुवात न केलेल्या सदनिका सिमीत करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला असल्याबाबत उप मुख्य अभियंता, JnNURM, MHADA यांनी दि.०८/१२/२०१४ च्या email द्वारेकळविलेले आहे. सदरच्या Minutes of Meeting व email ची प्रत सोबतअवलोकनार्थ जोडलेली आहे.

५) मा. मुख्य अभियंता -२, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांनी बीसएसयुपी / आयएचएसडीपी अंतर्गत अद्यापही काम सुरु न झालेली घरकुले प्रकल्पातून वगळून सिमीत करण्याचा प्रस्तावसादर करणेविषयी त्यांचेकडील पत्र क्र. एमएच/मुअ-२/उमुअ/काअ-२/जे/प्रा./न.क्र.२४/१५७२/१४ दि.१५/१२/२०१४ च्या पत्रान्वये कळविलेले आहे. सदर पत्राची प्रत सोबत अवलोकनार्थ जोडली आहे.

६) से.क्र.२२ निगडी येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील ठेकेदार मे. बी.जी.शिर्के व इतर यांनी सदरचा प्रकल्प सिमीत करण्याबाबत मागणी केलेली आहे. सदरची कामे बंद

असल्याने ठेकेदाराच्या Claims मध्ये दिवसेंदिवस वाढच होत आहे. त्यामुळे "निविदा अटी व शर्ती CSD Volume – I Clause No.59 Pg. No. 53 &54 नुसार प्रकल्प आहे त्या स्थितीत सिमीत करणेबाबत प्रकल्पाचे सल्लागार श्री. मोहन साखळकर, मे. ओमकार क्रिएशन्स JVयांनी त्यांचेकडील पत्र क्र. OC/PCMC/14-15/50 दि.२७/०५/२०१४ च्या पत्रान्वये अभिप्राय दिलेला आहे. सदर पत्राची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे.

७) से.क्र.२२ निगडी येथील प्रकल्प आहे त्या स्थितीत सिमीत करणे आवश्यक असून यात फक्त सर्वार्थाने पुर्ण झालेल्या इमारतींचाच अंतर्भाव करणे योग्य राहील. सदर प्रकल्पातील अर्धवट बांधकाम अवस्थेत असलेल्या इमारती अपुर्ण इमारती मार्च २०१५ पूर्वी पुर्ण करणे अवघड आहे तसेच मा. उच्च न्यायालयाकडे सदर प्रकल्पाबाबत दाखल केलेल्या याचिकेवर निर्णय नंतर कधी लागेल याबाबतही सद्यस्थितीत निश्चित असा कालावधीचा अंदाज करता येत नाही.

८) भविष्यात अपुर्ण इमारतीसह उर्वरीत राहिलेल्या इमारतींचे बांधकाम करावयाचे झाल्यास म.न.पा.स केंद्रशासन (GOI) व राज्यशासन (GOM) कडून हिस्सा मिळणार नाही. बांधकाम साहित्यामध्ये भाववाढ होणार, त्यामुळे सदर इमारतींचे बांधकाम पूर्ण करणेसाठी नव्याने निविदा काढाव्या लागतील. नव्याने काढण्यात आलेल्या निविदांचे दरही त्यावेळच्या प्रचलित D.S.R. नुसार दर जास्त येतील व हा सर्व भार मनपास उचलावा लागेल.

वरील सर्व बाबींचा विचार करता सदरचा प्रकल्प आहे त्या स्थितीत सिमीत करण्यात यावा व केंद्रशासन व राज्यशासन यांचेकडून प्रकल्पासाठी प्राप्त झालेला निधी पैकी न वापरलेला निधी व्याजासह परत करणेत यावे असे या विभागाचे मत आहे.

**ब) लिंक रोड पत्राशेड ६७२ सदनिका**

लिंक रोड पत्राशेड चिंचवड येथे JnNURM – BSUP योजनेअतंर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविणेत येत असून सदर प्रकल्पांतर्गत ६ इमारतींचे बांधकाम प्रस्तावित आहेत. सदर ६ इमारतींपैकी ५ इमारतींची बांधकाम पूर्ण झालेली असून १ इमारतीचे बांधकाम होणे बाकी आहे. सदर प्रकल्पाच्या जागेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे क्र. ७४/२०१३ अन्वये जनहित याचिका दाखल करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पास मा. उच्च न्यायालयाने दि. ०९/०७/२०१४ रोजी लिंक रोड पत्राशेड येथील बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतीमधील सदनिकांचे लाभार्थ्यांना वाटप न करण्याचे आदेश दिलेले असून प्रकल्पास स्थगिती दिलेली आहे. सद्यस्थितीत ५ इमारतींचे बांधकाम पूर्ण असून न्यायालयाच्या आदेशामुळे सदर इमारतींचा लाभार्थ्यांना ताबा देता येत नाही. उर्वरित एका इमारतीचे बांधकामासाठी स्वतंत्र निविदा काढून इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. सदर कामाबाबत मनपामार्फत निविदा प्रसिध्द करण्यात आलेली असून निविदा प्रक्रिया चालू आहे. JnNURMकामांचा Mission Period मार्च २०१५ अखेर संपत असल्यामुळे सदर इमारतीचे काम Mission Period च्या निर्धारीत कालावधीमध्ये होणार नाही. सदर प्रकल्पातील एका इमारतीचे बांधकाम केल्यास उर्वरित पात्र लाभार्थ्यांना इमारतीचा ताबा देता येणार आहे. प्रकल्प पूर्ण

करण्याच्या दृष्टीने सदर इमारतीचे काम होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर इमारतीसाठी लागणारा खर्च हा महानगरपालिकेच्या निधीमधून करावा लागणार आहे.

**क) मिलिंदनगर, वेताळनगर, अजंठानगर, विठ्ठलनगर व उद्योगनगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प**

JnNURM – BSUP योजनेअंतर्गत महापालिकेमार्फत मिलिंदनगर, वेताळनगर, अजंठानगर, विठ्ठलनगर व उद्योगनगर येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविण्यात येत आहे. झोपडपट्टीतील झोपडी धारकांचे सर्वेक्षण करणे, बायोमेट्रीक करणे, पात्र लाभार्थी ठरविणे, सोसायट्यांचे सोडत काढणे, पात्र लाभार्थ्यांचे रजिस्ट्रेशन करणे, बँक लोन प्रकरणे मंजूर करणे तसेच इतर प्रशासकीय कामे महानगरपालिकेच्या झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागामार्फत करण्यात येतात. सदरचे सर्व प्रकल्प हे Insituप्रकल्प असून इमारतीचे बांधकाम करावयाच्या जागेवरील झोपड्या काढून सदर जागेवरील झोपडी धारकास मनपामार्फत बांधलेल्या पत्राशेड (Transit Camp) मध्ये हलविण्यात येते. सदरच्या झोपड्या काढून मोकळ्या झालेल्या जागेवर इमारती बांधून पात्र झोपडपट्टी धारकांना बांधण्यात आलेल्या इमारतींमध्ये ताबा देण्यात येतो.

मिलिंदनगर, वेताळनगर, अजंठानगर, विठ्ठलनगर,उद्योगनगर, से.क्र.२२ निगडी व लिंक रोड पत्राशेड या प्रकल्पांच्या ठेकेदारास कामाचे आदेश दिलेले आहेत. सदर प्रोजेक्टनुसार संबंधित ठेकेदारांना दिलेल्या कामाचे आदेशाची माहिती पुढीलप्रमाणे...

| अ. क्र. | ठेकेदाराचे नांव | प्रकल्पाचे नांव | कामाचा आदेश दिनांक | बांधकाम करावयाच्या एकूण इमारती | एकूण सदनिका |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे.इंदु प्रोजेक्टस् लि. | विठ्ठलनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १४/१२/२००७ | १३ | १४५६ |
| | | अजंठानगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १४/१२/२००७ | १३ | १४५६ |
| | | वेताळनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १४/१२/२००७ | १२ | १३४४ |
| | | उद्योगनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १४/१२/२००७ | ०४ | ४४८ |
| २ | मे. बी.जी. शिर्के | लिंक रोड पत्राशेड झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १८/०२/२०१० | ०६ | ६७२ |
| ३ | मे. IVRCL | मिलिंदनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | ११/१२/२००७ | ११ | १२३२ |
| ४ | मे.प्रतिभा कन्स्ट्रक्शन | से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प (पॅकेज ५ व ६) | १४/१२/२००७ | ५७ | ४५६० |
| ५ | मे. बी.जी. शिर्के | से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प (पॅकेज क्र. ७ व ८) | ११/१२/२००७ | ६१ | ४८८० |
| ६ | मे. IVRCL | से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प(पॅकेज क्र. ९) | ११/१२/२००७ | २९ | २३२० |
| | | | **एकुण** | २०६ | १८३६८ |

सदर प्रकल्पासाठी D.P.R रकमेवर GOI कडून ५०% व GOM कडून ३०% याप्रमाणे मंजूर निधी व प्राप्त निधीची माहिती पुढील प्रमाणे...

| **अ.क्र.** | **प्रकल्पाचे नांव** | **प्रकल्पासाठी GOI कडील निधी** | | **प्रकल्पासाठी GOM कडील निधी** | | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर निधी | प्राप्त निधी | मंजूर निधी | प्राप्त निधी | |
| १ | विठ्ठलनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १६.३० | १६.४४ | ९.१४ | ९.४८ | |
| २ | अजंठानगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १६.०५ | १२.१५ | ९.०३ | ७.०५ | |
| ३ | वेताळनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १५.१५ | १६.३९ | ८.४२ | ९.४४ | |
| ४ | उद्योगनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | ५.१२ | ६.८४ | २.८३ | ३.९६ | |
| ५ | लिंक रोड पत्राशेड झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १२.८९ | ९.६६ | ७.७३ | ५.६१ | |
| ६ | मिलिंदनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १३.६९ | १४.३७ | ७.६४ | ८.३१ | |
| ७ | से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प (पॅकेज५ व ६) | ४५.२२ | ३३.९२ | २९.८५ | २०.२७ | |
| ८ | से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प (पॅकेज क्र.७व ८) | ४५.२२ | ४५.२२ | २९.८५ | २७.०३ | |
| ९ | से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प (पॅकेज क्र. ९) | १६.७७ | १६.७७ | ११.०७ | १०.०३ | |
| | **एकुण** | १८६.४१ | १७१.७६ | ११५.५६ | १०१.१८ | |

सदर प्रकल्पांतर्गत प्रोजेक्टप्रमाणे सद्यस्थिती खालील प्रमाणे.....

| **प्रकल्पाचे नांव** | **प्रकल्पानुसार मंजूर सदनिका (Revised D.P.R.)(इमारती)** | **लाभार्थ्यांना हस्तांतरित सदनिका (इमारती)** | **हस्तांतरणासाठी तयार सदनिका (इमारती)** | **प्रगतिपथावरील सदनिका (इमारती)** | **सिमीत करावयाच्या सदनिका** |
|---|---|---|---|---|---|
| विठ्ठलनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १४५६ (१३) | ११२० (१०) | ३३६ (०३) | ० | ० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अजंठानगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १४५६ (१३) | ४४८ (०४) | ३३६ (०३) | ० | ६७२ (०६) |
| वेताळनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १३४४ (१२) | ४४८ (०४) | ११२ (०१) | ४४८ (०४) | ३३६ (०३) |
| उद्योगनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | ४४८ (०४) | ० | ० | ० | ४४८ (०४) |
| लिंक रोड पत्राशेड झोपडपट्टी पुनर्वसनप्रकल्प | ६७२ (०६) | ० | ५६० (०५) | ० | ११२ (०१) |
| मिलिंदनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १२३२ (११) | २२४ (०२) | ११२ (०१) | २२४ (०२) | ६७२ (०६) |
| से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प (पॅकेज ५ व ६) | ४९६० (६२) | १०४० (१३) | २४० (०३) | ० | ३६८०(४६) |
| से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प(पॅकेज क्र. ७ व ८) | ४९६० (६२) | १२८० (१६) | १६० (०२) | ४८० (०६) | ३०४० (३८) |
| से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसनप्रकल्प (पॅकेज क्र. ९) | १८४० (२३) | ४८० (०६) | २४० (०३) | ० | ११२० (१४) |
| **एकुण** | १८३६८ | ५०४० | २०९६ | ११५२ | १००८० |

**टिप -** १) से.क्र.२२ निगडी येथील प्रकल्पामध्ये एका इमारतीत (G+4) ८० सदनिका आहेत.

२) मिलिंदनगर, विठ्ठलनगर, अजंठानगर, वेताळनगर, उद्योगनगर, लिंक रोड पत्राशेड येथील प्रकल्पामध्ये एका इमारतीत (P+7) ११२ सदनिका आहेत.

सदरच्या आदेशानुसार त्या त्या झोपडपट्ट्यांच्या जागेवर ठेकेदारांमार्फत इमारतींचे बांधकाम सुरु करण्यात आले व काही इमारतींचे बांधकाम पूर्णही झाले परंतु झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाकडील पात्र लाभार्थी ठरविणे व इतर प्रशासकीय बाबी पूर्ण करणेसाठी बराच कालावधी लागला. त्यामुळे नियोजित वेळेमध्ये बांधण्यात आलेल्या इमारतींचा पात्र लाभार्थ्यांना ताबा देता आला नाही. सदरच्या कारणांमुळे वरील प्रकल्पांचे काम पूर्ण करणेस विलंब झाला

उद्योगनगर प्रकल्पातील इमारतींचे बांधकाम करणेसाठी जागा उपलब्ध झाली नसल्यामुळे सदर प्रकल्पातील इमारतींचे बांधकाम सुरु करता आलेले नाही.

JnNURMकामांचा Mission Period मार्च २०१५ अखेर संपत असल्यामुळे सदर प्रकल्पातील राहिलेल्या इमारतींचे काम Mission Period च्या निर्धारीत कालावधीमध्ये पूर्ण होणे शक्य नाही.त्यामुळे सदर प्रकल्पातील राहिलेल्या इमारतींचे बांधकाम हाती न घेण्याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे. प्रकल्पांचे काम सुरु होऊन ७ वर्ष कालावधी झालेला असून वेळोवेळी ठेकेदारास मुदतवाढ दिलेली असल्याने भाववाढीच्या खर्चातही (Escalation Cost) दिवसेंदिवस वाढत आहे.

- सदर प्रकल्पासाठी आतापर्यंत झालेल्या खर्चाची माहिती पुढीलप्रमाणे...

| प्रकल्पाचे नांव | R.A Bills | Escalation | एकुण |
|---|---|---|---|
| विठ्ठलनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | ५९.१९६ | ८.६१६ | ६७.८१२ |
| अजंठानगर व उद्योगनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १७.८७६ | २.९६९ | २०.८४५ |
| वेताळनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | ३१.३९४ | ७.७७१ | ३९.१६५ |
| लिंक रोड पत्राशेड झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | २१.०७ | ५.६३६ | २६.७०६ |
| मिलिंदनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | २४.७६९ | ६.४२५ | ३१.१९४ |
| से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प (पॅकेज ५ व ६) | ४६.३५५ | ७.१२३ | ५३.४७८ |
| से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प(पॅकेज क्र. ७ व ८) | ५७.९०२ | ८.२३१ | ६६.१३३ |
| से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प(पॅकेज क्र. ९) | २८.९९६ | ४.२५५ | ३३.२५१ |
| **एकुण** | २८७.५५८ | ५१.०२६ | ३३८.५८४ |

**प्रकल्प वेळेत पूर्ण न होण्याची कारणे पुढील प्रमाणे -**

१) से.क्र.२२ निगडी येथील प्रकल्पाचे बांधकाम संरक्षण खात्याच्या Red Zone हद्दीमध्ये येत असल्याने सदर बाबत मा. उच्च न्यायालयामध्ये दावा दाखल करण्यात आलेला आहे. सदर दाव्याबाबत न्यायालयाकडील निर्णय प्रलंबित आहे.

२) लिंक रोड पत्राशेड येथील प्रकल्पाच्या जागेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका दाखल करण्यात आलेली असून सदर याचिकेवर न्यायालयाकडील निर्णय प्रलंबित आहे.

३) JnNURM – BSUP या योजनेअंतर्गत राबविण्यात येत असलेल्यामिलिंदनगर, विठ्ठलनगर, अजंठानगर, वेताळनगर, उद्योगनगर व से.क्र.२२ निगडी येथील प्रकल्पांसाठी Environment Clearance व Consent to Operate मिळणेसाठी बराच कालावधी लागला.

४) इमारतीतील पात्र ११२ लाभार्थ्यांची सोसायटी करण्यास होणारा विलंब.

५) सोसायटी तयार झालेनंतर लाभार्थ्यांचे बँक खाते काढणे, लाभार्थींना स्वहिस्सा भरणेकरिता बँक लोन करणे तसेच बँक लोन मंजूर होणेकामी संबंधित बँकांकडून होणारा विलंब.

६) कामाचे आदेशानुसार नियोजित कालावधीमध्ये इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले परंतु पात्र लाभार्थ्यांना इमारतीचा ताबा देण्याबाबत महानगरपालिकेच्या झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाकडून प्रशासकीय बाबींची पूर्तता विहित मुदतीत झाली नसल्याने बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतींचा ताबा लाभार्थ्यांना वेळेत देता आला नाही.

७) इमारतींचा ताबा वेळेत न दिल्या गेल्याने पुढील इमारतींचे बांधकामासाठी जागा (Site) उपलब्ध झाली नाही त्यामुळे पुढील इमारतींचे बांधकाम करता आलेले नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करता मिलिंदनगर, वेताळनगर, अजंठानगर व लिंक रोड पत्राशेड येथील प्रकल्पातील सुरु असलेल्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करुन उर्वरित इमारतींचे बांधकाम न करता तसेच से.क्र.२२ निगडी येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील अपूर्ण अवस्थेत असलेल्या इमारतींचे बांधकाम आहे त्या स्थितीत सिमीत (Curtailment) करणेत यावा असे या विभागाचे मत आहे.सदरबाबत याप्रमाणे निर्णय झाल्यास केंद्रशासन (GOI) व राज्यशासन (GOM) यांचेकडून प्रकल्पासाठी प्राप्त झालेल्या निधीची उर्वरीत रक्कम व्याजासह परतावा करणे आवश्यक आहे.

| **प्रकल्पाचे नांव** | **प्रकल्पानुसार मंजूर सदनिकांची संख्या** | **लाभार्थ्यांना हस्तांतरित सदनिका (इमारती)** | **हस्तांतरणा साठी तयार सदनिका (इमारती)** | **प्रगतिपथा वरील सदनिका (इमारती)** | **सिमीत करावयाच्या सदनिका** |
|---|---|---|---|---|---|
| विठ्ठलनगर, अजंठानगर, वेताळनगर, उद्योगनगर, लिंक रोड पत्राशेड, मिलिंदनगर, से.क्र.२२ निगडी (पॅकेज ५, ६,७,८ व ९), झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १८३६८ | ५०४० | ११५२ | १४७२ | १००८०** |
| **एकुण** | १८३६८ | ५०४० | ११५२ | १४७२ | १००८० |

****टिप -** सिमीत करावयाच्या एकूण १००८० सदनिकांपैकी ७८४० सदनिका ह्या से.क्र.२२, निगडी येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील आहेत.

तरी उपरोक्त सर्व बाबी लक्षात घेता से.क्र.२२ निगडी, मिलिंदनगर, वेताळनगर, अजंठानगर व उद्योगनगर व लिंक रोड पत्राशेड येथील प्रकल्प आहे त्या स्थितीत सिमीत करणे योग्य राहील तसेच केंद्रशासन व राज्यशासन यांना प्रकल्पासाठी प्राप्त झालेल्या निधीची उर्वरीत रक्कम नियमानुसार परतावा करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार व नागरीक. से.नं.२२ चा प्रोजेक्ट जेएनएनयूआरएम मार्फत जो केंद्रशासनाने मंजूर करुन याठिकाणी पाठविला होता त्याचे पैसे केंद्रशासनास परत करण्याबाबत पत्र आलेले आहे. सुरवातीला काँग्रेस शासनाने हे मंजुर केलेले होते. आता बीजेपीचे शासन साडेनऊ टक्क्यांच्या व्याजासहीत निधी परत मागतात. हा प्रोजेक्ट पुर्ण बंद करायचा आहे, त्याचे कारण दिलेले आहेत. रेडझोनसारखे कारणं दिलेली आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अखत्यारीत शहरामध्ये ज्या झोपडपट्टया आहेत त्या झोपडपट्टया काही प्रशासकीय जागेवर झालेल्या आहेत, काही गायरानावर झालेल्या आहेत. गायरानामध्ये झालेल्या झोपडपट्टयांचे पुनर्वसन महापालिकेनी करण्याचे धोरण आहे. एमआयडीसीच्या ज्या जागेवर झोपडपट्टया झालेल्या असतील त्याच पुनर्वसन करण्याचं एमआयडीसीच काम आहे, प्राधिकरणाच्या जागेमध्ये झोपडपट्टया झालेल्या असतीलतर त्या प्राधिकरणाने पुनर्वसन करायचं आहे. आपणच त्यांची जबाबदारी घेतो. आयुक्त साहेब, भारतीय संविधानाने दिलेले मुलभूत हक्क, आर्थीक दुर्बल घटकातील असलेल्या गोरगरीब जनतेसाठी काही योजना असतील, झोपडपट्टयांच पुनर्वसन असेल, गरीबांना न्याय देण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी काही घटना लिहीलेल्या होत्या आणि त्याच्या आधारे त्या परिसरात असणा-या झोपडपट्टीमध्ये राहणारा माणूस, मगाशीच सांगीतल की तो काही हौस म्हणून झोपडपट्टीत राहत नाही. आपली सुरवातीच्या काळात ग्रामपंचायत होती, नगरपालिका झाली, नगरपालिका माझ्या डोळयासमोर झालेली आहे. नगरपालिकेची बिल्डींग व त्याच्या बाजुला असलेली ही झोपडपट्टी त्या झोपडपट्टीमध्ये माझा जन्म झालेला आहे. झोपडपट्टी मधील काही अडचणी असतीलतर त्यांच्या अडचणी सभागृहात सुटल्या पाहिजेत म्हणून त्या त्या भागातील लोकांनी त्या त्या परिसरातील लोकांना निवडून दिलेलं असते. त्या परिसरामध्ये असलेल्या नागरीकांना न्याय देण्यासाठी त्यांनी निवडून दिले म्हणून आम्ही याठिकाणी उभा आहेत. माझे लहानपण झोपडपट्टीमध्ये गेलेले आहे. झोपडपट्टीच्या अडचणी पाहिलेल्या आहेत. पिंपरीमध्ये असलेली झोपडपट्टी त्याठिकाणी असलेला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धवट पुतळा तो पुर्ण करण्यासाठी चोवीस तासाची नोटीस दिलेली होती. संध्या. ५ वाजता महापालिका बंद झाल्यानंतर नोटीस वाटायला सुरवात झाली आणि दुस-या दिवशी सकाळी ७ वाजता गाडया उभ्या राहील्या त्यावेळेला वाडेकर साहेब असतील, गराडेसाहेब असतील आणि कै.शंकर गावडे हे त्यावेळेस प्रशासन अधिकारी होते त्यावेळेला नगरसेवक सुरेशभाई सोनवणे होते. झोपडपट्टीमध्ये असलेल्या नागरीकांचा कुठल्याही गोष्टीचा विचार न करता से.२२ याठिकाणी सुरवातीच्या काळात माझ्या अंदाजाने त्यावेळेला गावडे साहेब नगरसेवक असतील. दि. २६/१०/१९८९ चा ठराव आहे. से.२२ येथील ओटयावर तळमजला व पहिला मजला, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत ३५४० गाळे बांधणेकामी येणारे र.रु. १० कोटी ५४ लाख या खर्चास प्रशासकीय

मान्यता होती. वि.क्र.३६ ठ.क्र.१३१७ तो ठराव त्यावेळेसचा आहे त्यावेळेसचे नगरसेवक अशोक पारखी, जमालभाई सिद्दीकी हे नगरसेवक सुचक आणि अनुमोदक होते. से.२२ येथील ओटयावर तळमजला व पहिला मजला झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत ३५४० गाळे बांधणे कामी येणारे र.रु. १० कोटी ५४ लाखाच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा ठराव झालेला होता. हा झोपडपट्टीमार्फत जी.बी.ला विषय पाठविलेला होता. त्याकाळामध्ये से.२२ याठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन झाले, तुम्ही म्हणता त्याठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन झाल मग ती जागा कोणाची होती. ती जागा शेतक-यांची होती. काळभोर यांच्या जमिनी प्राधिकरणाने ॲक्वॉयर केल्या त्यानंतर त्याठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसनाचे रिझर्व्हेशन त्याच्यावर टाकलं आणि त्या रिझर्व्हेशनसहीतची १०० एक्कर जागा महापालिकेला विकलेली आहे आणि महानगरपालिकेनी ती जागा विकत घेतलेली आहे. महापालिकेनी ती जागा विकत घेवून ३५५४ गाळे त्याठिकाणी ओटे बांधले गेले. त्यावेळेस कटारिया यांनी ओटे बांधलेले आहेत. ओटे बांधल्यानंतर प्राधिकरणामध्ये असलेली झोपडपट्टी त्यावेळेस आर.एस.कुमार, मधुकर आण्णा पवळे नगरसेवक होते. त्याठिकाणची झोपडपट्टी प्राधिकरणाने काढली आणि आपल्या महापालिकेच्या जागेवर, ओटयावर पाठविली. त्यावेळेसच धोरण होतं शहराच्या बाहेर झोपडपट्टी म्हणजे गावाच्या बाहेर महारवाडा. मागे मागासवर्गीयांना घराच्या बाहेर, गावाच्या बाहेर ठेवायचं तो दिवस आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्यावेळेस या घटनामध्ये लिहील्यानंतर आज आम्हांला माणसामध्ये घेतल. आज आम्ही माणसामध्ये आल्यानंतर त्या परिसरामध्ये आमच्यासाठी गावाच्या बाहेर ओटे बांधले त्यावेळेस जे कोणी प्रशासन असेल त्या प्रशासनाची बुध्दी. झोपडपट्टी शिफ्ट करायची वास्तविक पाहता हे प्राधिकरणाचे षडयंत्र होतं की प्राधिकरणाच्या जागेमध्ये ज्या काही झोपडपट्टया आहेत त्याठिकाणी प्राधिकरणाला जागा विकून शहरातील राहणा-या कामगारांना त्या जागा दयायच्या होत्या त्या काळात तेथील असलेल्या झोपडपट्टया असतील तिथं संत तुकाराम व्यापारी संकुलन आहे, आरटीओच्या तिथं दोन झोपडपट्टया आहेत त्यांठिकाणी पाठविले त्यांना अँगल, पत्रे आणि ओटा हा प्रत्येकाला दिला गेला. त्याठिकाणी लोकांनी आपआपल्या पध्दतीने घरे बांधली आणि राहण्यासाठी गेले. त्याठिकाणी रहात असताना त्या काळामध्ये १९८६-८७ ला त्यांना त्याठिकाणी घर दिली. मी ज्यावेळेस लहान होतो त्यावेळेला माझ्या बरोबर आई-वडील आणि तीन भाऊ होते, या तीन्ही भावांची लग्न झाली त्यांना मुलं आहेत. माझ वैयक्तीक सांगतो मला अजुन घर मिळालेले नाही. म्हणून मी एक झोपडपट्टीधारक म्हणून याठिकाणी बोलतो. मी माझ्या अंतकरणापासून बोलतो त्याच कारण या झोपडपट्टीमध्ये असलेल्या लोकांचे याठिकाणी फक्त राजकारण केले जाते, नुसतं युज ॲण्ड थ्रो. कोणीही यायच आणि टिकली मारुन जायचं आणि राजकारण करायचे आणि आपले पोट भरुन घ्यायचे. त्या काळामध्ये कासारवाडीचं आनंदनगर त्याठिकाणी शिफ्ट केलं आणि त्याठिकाणी ओटे बांधले गेले. ३५०० ओटयापैकी १५०० ओटे

त्याठिकाणी वाटले गेले. १५०० ओटयामध्ये लोकांनी आपआपल्या पध्दतीने बांधुन काहीनी पत्रे ठोकून छोटस १८० स्क्वे.फुटाचे घर लोकांनी थाटलं. लोकांची धुन-भांडयाच काम करायचं, गंवडयाच्या हाता खाली काम करायचे, हॉटेलमध्ये काम करायचे, लोकांची कपडे धुवायचे हे सगळे करून झोपडपट्टीतील नागरीक त्याठिकाणी वास्तव्य करत आले. राहीलेल्या १५०० गाळयावरती आपल्याच प्रशासनाने दुमजली गाळे बांधले. बी.जे.शिर्के यांना काम दिले. १२९ स्क्वे.फुटाचा गाळा त्यात संडास, बाथरुम, किचन त्या घरात एक खाट टाकली की संपला विषय. त्या झोपडयामध्ये कुटूंब राहत होतं त्या घरामध्ये कुटूंबासह मी आज पण राहतो. एकूण गाळे ३४६८ त्याच्यावर एकुण खर्च र.रु. १० कोटी ४ लाख ७९ हजार ३३५. ते गाळे बी.जे.शिर्केनी बांधलेले आहेत त्यावेळेला शहरातील झोपडपट्टया गावाच्या बाहेर न्यायच्या होत्या आणि त्याठिकाणी महारवाडा करायचा होता. वास्तविक खालच्या दर्जाच बोलण्याच कारण साहेब, तळतळ आहे, मन दुखतय. त्याठिकाणी झोपडपट्टी नेत असताना वेताळनगर, पिंपरीचं राहूलनगर आणि बाकी झोपडपट्टया न्यायच ठरलेले होतं. वेताळनगरने त्यावेळेस विरोध केला. गावडेसाहेब नगरसेवक होते त्यांनी विरोध केला. त्यांचा विरोध लक्षात घेवून आयुक्त साहेबांनी राज्यशासनास पत्र पाठविले. अशी भूमिका घेणे योग्य ठरणार नाही कारण घटनेची पायमल्ली केली जाते. आपण जर शहरातून झोपडपट्टया काढून एका साईडला टाकल्यातर त्या लोकांचा विरोध आहे म्हणून त्यावेळेला बांधलेले ३४६८ गाळे त्या गाळयामध्ये लोक घुसली, अतिक्रमण झाले. झोपडपट्टी कशामुळे होते हे मगाशी लोखंडे साहेबांनी सांगीतले आहे. झोपडपट्टी व्हायला कारण बिल्डर, ठेकेदार आहेत. कमी किमंतीत बाहेरच्या राज्यातून, बाहेरच्या गावातून नागरीक बोलवायचे कमी पगार दयाचा, त्यांच्या असणा-या जागेत झोपडया टाकून काम करुन घ्यायचे. त्यांच काम एक आणि दोन महिन्यात होत नाही बिल्डींग होण्यास कमीत कमी एक दोन वर्ष जातातच. त्यानंतर इलेक्शनचे दिवस आले की मतदार यादयामध्ये नाव नोंदणी होते, रेशन कार्ड होतं आणि ते कुठेतरी झोपडपट्टी बघतात आणि झोपडपट्टीच्या ठिकाणी जागा बघुन त्याठिकाणी झोपडी ऍक्वॉयर करुन त्याठिकाणी झोपडी बांधतात. शेवटी नाईलाजास्तव आपल्या प्रशासनाला त्यांना सुविधा दयाव्या लागतात. मग त्या भागातले नगरसेवक असतील ते नगरसेवक त्यांना सुविधा देतात. नगरसेवक ही झोपडपट्टी वाढवत नाहीतर हे बिल्डर वाढवितात. यासाठी कायदा व्हायला पाहिजे तो कायदा आपण करत नाही. प्रशासनाने याच्यावर आळा घातलातर झोपडपट्टया वाढणार नाहीत, गुन्हेगारी वाढणार नाही. परंतु आपण त्याठिकाणी त्यांना सुट देतो याचे कारण बिल्डर लोकांचे दलाल लोक जे असतात नां एखादया विषयासाठी दलाली करुन, पैसे टाकून त्यांना एनओसी मिळवून दयायच्या आणि आपले प्रशासन त्यानां खतपाणी घालणारं आहे. म्हणून या झोपडपट्ट्या वाढतात. तुमच्या माहितीसाठी सांगतो बी.जे. शिर्के यांच्या ताब्यात गाळे २५१०, मनपाच्या ताब्यात गाळे ९६६, वाटप ४१९. आयुक्त बंगल्याच्या ठिकाणी, कोर्टाच्या ठिकाणी झोपडपट्टी होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या पुतळयाच

पुनर्वसन करायचे होतं म्हणून त्याठिकाणच राहूलनगर. राहूलनगर येथील लोकांना २४ तासाची नोटीस दिली आणि त्यांना त्याठिकाणी शिफ्ट केलं. दळवीनगर ज्याठिकाणी शमीमताई पठाण यांच्या समोर जो ब्रीज केलेला आहे तो ब्रीज करत असताना त्या जागेवरती ज्या काही झोपडया होत्या त्यांचे पुनर्वसन करायच्या होत्या म्हणून त्याठिकाणी दुमजली गाळयामध्ये केले. त्या काळामध्ये ४१९ गाळे वाटप केले ५४० गाळे शिल्लक राहिले हे फक्त महापालिकेच्या ताब्यात होते. हे का सांगतो की आपल्या अधिका-यांनी केलेल्या चुका आहेत. त्या काळामध्ये बी.जे.शिर्केच्या यांच्या ताब्यात २५१० गाळे होते. हे सगळे करत असताना खर्च झाला १० कोटी ४ लाख ७९ हजार ३३५. त्यासाठी हुडकोकडून कर्ज घेतलं र.रु. ६ कोटी ७३ लाख १३ हजार, मनपाचा खर्च ३ कोटी ३१ लाख ६६ हजार ३३५, गाळयाचे क्षेत्रफळ १८५ चौ.फु. गाळयाची किमंत र.रु.३१५७७ परतफेडीचा कालावधी १४ वर्षे असेलतर हप्ता रु.२९०. मी ज्या गाळयामध्ये राहतो त्या गाळयाची टॅक्सपावती आहे. गाळा किती बाय कितीचा त्याचा यामध्ये उल्लेख केलेला आहे. से.२२ लोडबेअरींग १२९.८२ चौ.फु. संडास, बाथरुम, किचनसह. सांगायचे तात्पर्य म्हणजे त्यावेळेसचे टेंडर १८५ स्क्वे.फुटाचे होते झोपडपट्टीधारकांना दिलेले गाळे ११९ स्क्वे.फुटाचे किती मोठा भ्रष्टाचार आहे. आम्ही त्याठिकाणी राहतो. प्राधिकरणातील जागेपोटी १५,२०,६२५ रुपये आपण प्राधिकरणास दिलेले आहे. त्यावेळेला २५६ गाळे म्हणजे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे वसाहत, निगडी जकातनाक्याच्या पाठीमागे २५६ गाळे बांधले गेले. तेथील खर्च आलेला आहे १३,२५,२०० रुपये हा १९७७-७८ सालचा विषय आहे. आणि सन १९८५-८६ साली ३३३३ ओटा बांधकामाचा खर्च १ कोटी ६७ लाख ७७ हजार ७६९ रुपये. सन १९८८-८९ ला ५७६ गाळे बांधले. ज्याला आपण कर्मचारी वसाहत म्हणतो. आपल्या महापालिकेचे चतुर्थश्रेणीचे जे कामगार आहेत त्या कामगाराना त्याठिकाणी घर दिलेले आहेत त्याचा खर्च १८,८९,३७,१५२ रु. सन १९९० ते १९९३ ला ३४६८ गाळे बांधले, त्या गाळयाला खर्च आला १० कोटी ४ लाख ७९ हजार ३९५ रु. सार्वजनिक सुविधापोटी केलेला खर्च रु.रु.२,१०,६५,९३०. एकुण झोपडपट्टी पुनर्वसनासाठी झालेला खर्च १६,०१,७९,६१ रु. अशा पध्दतीचे पुनर्वसन केले गेले. त्याठिकाणी घरं बांधल्यानंतर राहूलनगर, दळवीनगर या झोपडपट्टया शिफ्ट केल्या गेल्या. त्याठिकाणी मधुकर पवळे नगरसेवक असताना त्याठिकाणच्या सुविधा या सगळया गोष्टी करत असताना १९९७ साली मंडल आयोगाची अंमलबजावणी झाली त्यावेळेला मा.मुख्यमंत्री शरद पवार साहेब होते आणि मा.पंतप्रधान व्ही.पी.सिग होते. त्यांनी नगरपालिकेमध्ये मागासवर्गीयाना ३५ टक्के आरक्षण दिले. त्या आरक्षणा मध्ये माझ्यासारखा नगरसेवक निवडून आलेला आहे त्या दिवसापासून आजपर्यंत मी त्या परिसरातील लोकांच्या अडीअडचणी सोडविण्याचे काम करतो. २००७ मध्ये निवडून आलो त्यावेळेला मधल्या काळामध्ये आपले आयुक्त दिलीप बंड होते त्यांनी घुसखोर बाहेर काढायचे म्हणाले, ही घुसखोरी होत होती त्यावेळेला तेथील नगरसेवक मधुकर पवळे यांनी सुध्दा त्यावेळेला महापौर असतांना सांगीतले

होते की त्याठिकाणची घुसखोरी काढा म्हणून परंतु आपल्या प्रशासनाने ते काढले नाही सा.सहारामध्ये आलेले होते ओटा स्किममधील ३ हजार घुसखोरांना बाहेर काढावे. त्यावेळेला काढले नाही. ते काढायचे म्हणलेतर माझ्यासारखा कार्यकर्ता नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर मा.अजीतदादा पवार यांच्याकडे गेलो, पवार साहेबांकडे गेलो. शेवटी योगायोग आम्हांला महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे याठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाचे अनावरण झाले त्यांच्या बाजूला महात्मा ज्योतीबा फुले यांचा पुतळा आहे त्या पुतळयाचे अनावरण होते, त्या उद्‌घाटनाच्यावेळेला मा.पवार साहेब, मा.रामदास आठवले, मा.छगन भुजबळ त्याठिकाणी आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयाच्या तिथं आम्ही आंदोलन करत होतो मा.पवार साहेबांनी आम्हांला बोलावलं, आम्ही गेलो. मा. पवार साहेबांना रिक्वेष्ट केली या भागातील गोरगरीब लोक कुठे जाणार ते पोट भरायला आलेली आहेत त्यांना याठिकाणाहून काढलं त्यांना राहण्यासाठी जागा नाही, आत्महात्या करावी लागेल या लोकांना वाचवा साहेब अशी विनंती केली, पवारसाहेबांनी त्यावेळेस जाहीर सभेमध्ये सांगीतले त्यावेळेस दिलीप बंड आयुक्त होते त्यांनी ऐकले. ज्यांचे घर जाईल त्याला एक घर मिळेल. घराची जी किमंत असेल ती तुम्हांला फेडावी लागेल, आम्ही म्हणलो फेडू साहेब, पण आम्हांला वाचवा. त्यानंतर आमच्यावरील अतिक्रमण कारवाई थांबली. २००७ ला मी परत निवडून आलो, योगायोगाने त्यावेळेस मी झोपडपट्टी समितीचा चेअरमन झालो. काँग्रेस पक्ष असेल राष्ट्रवादीची युती होती त्यावेळेला जे शासन होते त्यांनी जेएनएनयूआरएम अंतर्गत या शहरातील झोपडपट्टयांचे पुनर्वसन करावे, पाणीपुरवठा योजना, विवीध योजना कार्यान्वित व्हाव्यात म्हणून केंद्रशासनाने पैसे पाठविले. त्यामध्ये काही झोपडपट्टयांचे पुनर्वसन घेतलेले होते. त्यामध्ये से.२२ आणि अजंठानगर, विठ्ठलनगर, वेताळनगर, मिलिंदनगर, उदयोगनगर झोपडपट्टी पुनर्वसन या सगळया झोपडपट्टी पुनर्वसनाचे काम जेएनएनयूआरएम अंतर्गत करण्याचे धोरण आखले गेले. त्यावेळेला त्याठिकाणचे नगरसेवक या नात्याने प्रशासनाने सहकार्याचे काम केले. वास्तविक पाहता "राहिल त्याचे घर, कसेल त्याची जमिन" आज राज्यसरकार असो, केंद्रसरकार असो कोणीही असो तो येतो आणि जाहीर करतो. या लोकांना हाक्क मिळाला पाहिजे. परंतु खालच्या लोकांकडे आल्यानंतर त्यांनी कुठल्यातरी फाईल काढायच्या, काहीतरी कागदपत्र मागायचे, तुम्हांला घर पाहिजे असेलतर कागदपत्र आम्हाला दया म्हणायचं. झोपडपट्टीमध्ये असलेले लोक शिकलेले असतेतर झोपडपट्टीमध्ये रहीलेच नसते. त्यांना एवढी अक्कल असतीतर लोकांच्या घरात धुने-भांडी केले नसते, हॉटेलमध्ये भांडे कोणी घासली असती. प्राधिकरणामधील लोकांचे धुने-भांडे कोण करतयं याच झोपडपट्टीमधले लोक करतात. या सगळया गोष्टीत, रस्त्यावर भाजी विकणारा झोपडपट्टीमधीला आहे. हे सुशिक्षीत असतेतर झोपडपट्टीमध्ये राहीले नसते. आज त्यांचे कडे कागदपत्र नाहीत. १९९५ चा कायदा ग्राहय धरा. घरात लोकच राहतात, उंदिर, घुशी राहात नव्हत्या. त्याठिकाणी राहीलेले लोकच होते. कायदा आडवा आला, कायदयामध्ये

कागदपत्र दया ते कागदपत्र देत असताना अंध, अपंग, मुकबधीर अशी लोक राहतात. ते लोक भीक मागतात. छोटया मोठया खेळण्या बनवुन विकतात, रस्त्यावर भीक मागणारे लोक आहेत. पोटाची खळगी भरण्यासाठी काय काय धंदा करावा लागतो. शासन योजना आणते, त्या योजनेमध्ये आम्हांला राहण्यासाठी घर, खाण्यासाठी अन्न आणि कपडे. रोटी, कपडा, मकान यापुढे काय पाहिजे आम्हांला. कायदयामध्ये तरतुद केलेली आहे बजेटच्या ५ टक्के त्यांच्यासाठी ठेवावेत म्हणून हे असताना आपण खर्च करत नाहीत. बजेटचे व्याज सुध्दा खर्च करत नाहीत एवढी प्रशासनाची लाजीरवाणी गोष्ट आहे. लाज वाटते याठिकाणी बोलताना. त्या लोकांना घर मिळण्यासाठी कागदपत्र काय लागतात ते आम्ही गोळा करुन दिलेले आहेत त्यावेळेस त्यांना घरं मिळालेली आहेत. साहेब, मी माझ्या आईला देव मानतो. माझ्या तेथे जेवढी घरं दिली असतील एकाही घरातल्या एकाही बाईकडून किंवा एकाही माणसाकडून मी एक रुपया जरी घेतला असं कोणी म्हणलं असेलतर आख्ख घरदार सोडून मी गावाला निघून जाईल. एक रुपया सुध्दा घेतलेला नाही. याठिकाणी सभागृहात इज्जत ठेवायची म्हणून ठेवतो माणुस सगळयात इज्जतीला घाबरतो, इज्जत अतीशय महत्वाची आहे. आज सुध्दा तीन वर्षे झाले तेथील काम बंद आहेत त्या लोकांच्या अडीअडचणी आहेत. झोपडपट्टीत एखादयाचे लग्न आलेतर लग्नाला पैसे नसतात, त्यांच्या मुलांचे लग्न करुन दयावे लागते. परिस्थिती नसते, पाच हजार, दहा हजार रुपये आम्ही देतो. वायसीएममध्ये ४० टक्के माफ करतो आणि ६० टक्के बील घेतो. वायसीएमला गेल्यानंतर गोळया मिळत नाहीत, सिटी स्कॅन करायला, एक्स-रे करायला पैसे नसतात. आम्हांला घरात खाण्यास नसलेतरी आम्हांला त्याठिकाणी त्यांना दयावे लागते. त्यांचे कैवारी म्हणून आम्ही काम करतो. कित्येक वेळा आम्ही पैसे दिलेले आहेत. १८ वर्षात एक रुपया सुध्दा खाल्लेला असेलतर सांगावे. मा.महापौर साहेब, रेडझोनमुळे घर चाललेत तो कायदा कधी येणार, कधी कायदयाची अंमलबजावणी होणार, कधी उत्तर भेटणार. ज्यादिवशी होईल त्यादिवशी होईल तोपर्यंत आम्ही काय करायचं. त्याठिकाणी राहणारे लाखो लोक असतील त्यांनी काय करायचे हा गंभीर प्रश्न उपस्थित झालेला आहे. त्या परिसरामध्ये असलेले लोकांचे जीन हराम झालेले आहे. किरण मोटे यांनी विषय उपस्थित केलेला आहे. शहरामधील वाढीव बांधकामांचे कटआवूट लागलेले आहेत. मागच सरकार पडलं हे राजकारण याच्यामध्ये पण झालेले आहे. हा विषय आम्ही पोटतीडकीने सांगतो. मला लोकांनी निवडून दिलेले आहे. मी स्वत: त्याठिकाणचा रहिवाशी आहे. या रेडझोनच्या कारणामुळ मलाही घर मिळालेल नाही. ठिक आहे कायदा आहे, मी कायदयाचा आदर करतो. वाढीव बांधकामाचे विषय कोर्टात आहेत. झोपडपट्टी मधील लोक कोर्टात जाणार नाहीत. कोर्टात जाण्यासाठी पैसे लागतात, हा पैसा कुठून आणायचा. घर मिळण्यासाठी आमच्या आई-बहिणीनी मंगळसूत्र घाण ठेवलेले आहे. लोकांचे व्याजाने पैसे घेतलेले आहेत. आम्हांला माहिती होते का रेडझोन येणार आहे. एक वर्षापुर्वी मी रात्रीच्या १२ वाजता मिटींग घेतली आणि लोकांना सांगीतले ताबडतोब तुम्ही

सोसायटी करावी म्हणून, चेअरमन व्हावे, अध्यक्ष व्हावे, सोसायटीला नाव दयावे, माझ्या आई-बहिणीनो सोनं-नानं मोडा आणि सोसायटी लवकर करा आणि १० टक्के रक्कम भरा असे सांगीतले होते. मा.महापौर साहेब, १८० स्क्वे.फुटाचे घर दयायला पाहिजे होते, ते का दिलेले नाही. आज मी कित्येक वर्षे त्याठिकाणी राहतो. प्रशासनाने चुक केलेली आहे. लोकांनी मला निवडून दिलेले आहे म्हणून त्यांचे काम करणार आहे. त्यासाठी नगरसेवक पदावर काम करतो त्याचा मला आनंद आहे. झोपडपट्टी सुधारणाचा चेअरमन होतो, शहर सुधारणा समिती केली अधिकार त्याठिकाणी नाहीत, अधिकार नसतीलतर काय करणार तिथं. सगळे अधिकार प्रशासनाकडे आहेत, नगरसेवकांनी काय करायचे. लोकांना घर मिळाले नाहीतर मी आत्महात्या करेल. झोपडपट्टी मधील लोक घरी येवून रडतात, मी काय करु. सुलभाताईना माहिती आहे, पवारताई आहेत त्यांना माहिती आहे त्यांच्या सुध्दा अडचणी सुटल्या नाहीत. बिल्डींगची प्रतिकृती उभी केलेली आहे. जेएनएनयूआरएम मार्फत घरे केलेले आहेत हे घर करत असताना आपण  कन्सल्टन्सी नेमलेली आहे त्यांचे काम या सगळया गोष्टी बघायच्या होतं. त्यावेळेस प्रविणसिंह परदेशी होते, जेएनएनयूआरएमला झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण नेमलेले होते. प्राधिकरणामध्ये प्रविणसिंह परदेशी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम पाहिलेले आहे. निगडी से.नं.२२ ची त्यांनी पेपरला नोटीस सुध्दा दिलेली होती. कोणाच ऑब्जेक्शन असेलतर सांगा म्हणून, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा निर्मुलन विकास अधिनियम १९७१ चे कलम ३ अ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्राच्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे व अधिसूचना क्र. झोपडपट्टी पुनर्वसन योजना २००४/२१३/झोनिपू/ दि.३०/६/२००५ मधील ३ नुसार आयुक्त पुणे मनपा यांना उक्त प्राधिकरण मुख्य कार्यकारी अधिकार म्हणून प्राधिकृत केले आहे. या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारणाच्या अधिकारात येणा-या क्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना ही प्रसिध्द करण्यात आली आहे. व सदरील योजनाची नावनोंदणी ही निगडी से.नं. २२ येथील रजिष्टरवरती ३३७७४२.८० चौ.मी. क्षेत्राकरिता जागा मालक विकास पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे उक्त झोपडपट्टी पुनर्वसन योजना आवश्यक त्या सर्व कागदपत्र व प्रस्तावासह दि. ५/३/२००७ रोजी दिले आहे. ज्याअर्थी सदरचा परिसर झोपडपट्टीसदृष्य असल्यामुळे सक्षम प्राधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी दि.२६/१०/२००७ रोजीचे प्रमाणपत्र दिले आहे. त्यानुसार त्यांनी सदरच्या क्षेत्रातील रहिवासी भाग, पुनर्वसन क्षेत्र जाहीर करण्याबाबत कळविलेले आहे.  सबब  खाली नमुद केलेले क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करुन शासनाने अधिकृत भाग पत्रात प्रसिध्द करणे आवश्यक झाले आहे. सदरील पुनर्वसन क्षेत्राचा तपशील खालीलप्रमाणे- निगडी से.नं. २२  घोषीत क्षेत्र ३३७७४२.८० चौ.मी. योजनेचे क्षेत्र ३३७७४२.८० चौ.मी. घोषीत दिनांक राजपत्रातील प्रसिध्द योजनाची च:तुसिमा पुर्वेस तळवडे गावची हद्द व से.नं.२०, दक्षिणेस से.नं. २१, पश्चिमेस मुंबई-पुणे रस्त्याचा भाग व से.नं. २३,

उत्तरेस तळवडेगाव व देहू. एकुण योजनेचे क्षेत्र ३३७७४२.८० चौ.मी. एकूण झोपडपट्टीची संख्या ५०५८, जागेवर प्रत्यक्ष असलेल्या झोपडपट्टीची संख्या या सगळया गोष्टी याठिकाणी दिलेल्या आहेत. प्रविणसिंह परदेशी, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे. महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा अधिनियम १९७१ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारात वर नमुद केलेले सदरील क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र असून ते आदेशाने घोषीत करीत आहे. सदरील झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र माझ्या सही व शिक्क्यासह पारित करत आहे. उक्त अधिनियम कलम ३ सह २ प्रमाणे मी पारित केलेल्या उक्त आदेशान्वये बाधीत होणा-या कोणत्याही व्यक्तीस असा आदेश प्रसिध्द झालेपासून विशेष न्यायाधिशाकडे अपिल दाखल करता येईल आणि विशेष न्याय प्राधिकरणाचा निर्णय अंतिम असेल याची नोंद घ्यावी. पुणे- दि. २/११/२००७. खाली प्रविणसिंह परदेशी, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र या सगळया अधिकृत गोष्टी झाल्यानंतर त्याठिकाणी प्रोजेक्ट आला आणि काम चालू झाले. हे काम तीन ठिकाणी घेतले गेले त्यात तीन ठेकेदार. अशा तीन ठेकेदाराना तीन्ही ठिकाणचे काम दिले गेले. तीन्ही ठेकेदाराचे प्रत्येक ठिकाणी काम चालू होते. आज तीच घरे गळतात त्यांना २३ टक्के वाढीव दिलेले आहे आणि त्यांचा दर बघितलातर, घराची किमंत काढलीतर चौ.मी. मध्ये राजन पाटील सांगतील. या घराचे क्षेत्रफळ २७० कारपेट आहे. ३०३ बील्टप आहे. या जागेची एकूण किमंत मला मिळालीतर बरे होईल. ती किमंत मिळणे आवश्यक आहे. ही कामे केली गेली त्यामध्ये लिकेजेस फार आहेत. मी वेळोवेळी प्रशासनाला सांगीतलेले आहे. फोटो, पत्रव्यवहार केलेला आहे. ती घरे गळतात. अंध कुटूंब खालच्या घरात राहतात त्यांचे घर गळते. दरवाजाचे कडीकोयंडे बघितलेतर त्याची किमंत बाजारात बघितलीतर त्याची इन्क्वॉयरी लावली पाहिजे. या सगळया गोष्टीला कारणीभूत असेलतर तो कन्सलटंट. ओंकार असोसिएटस् आणि ओंकार क्रिएशन या लोकांच्या गलथान कारभारामुळे, आज २३ ते २४ कोटी रुपये त्यांना दिलेले आहेत. फक्त प्रोजेक्टसाठी बजेटच्या ४ टक्के रक्कम त्यांनी घेतलेली आहे. दोन बिल्डींगमध्ये अंतर किती असते, एक गाडी गेलीतर दुसरी गाडी जात नाही. फायरब्रिगेडची गाडी त्या बिल्डींगच्या आतमध्ये नेवून दाखवावी. आपल्याला जागा भेटली, करा बांधकाम असं झालेल आहे. ड्रेनेज लाईनचे बांधकाम विशाल कांबळे यांनी केले. ती ड्रेनेज लाईन सुध्दा सापसुरळीसारखी केलेली आहे त्याठिकाणी १२ नं. बिल्डींग आहे तेथे आतापण चला दलदल आहे. रुपीनगरचे पाणी तेथील एकाच ड्रेनेजला येते. सल्लागारांना आपण करोडो रुपये दिलेले आहेत. अशा लोकांना ब्लॅकलिस्ट केले पाहिजे, त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. “आंधळ दळतं आणि कुत्र पिठ खातं” आपल्या प्रशासनाचे अधिकारी तीकडे जातच नाहीत. टक्केवारीत सगळे वाटले गेलेत. मदन साळवे अधिकारी होते ते ऐकत नसायचे त्याच्यानंतर राजन पाटिल, सुधीर जोशी आले. सुधीर जोशी यांनी काय काय केले हे तुम्हांला माहिती आहे का. सुधीर जोशी झोनिपुचे अधिकारी होते त्यांनी सोसायटया

करत असताना जातीवाचक सोसायटया त्यांनी केल्या. या विषयाला १० टक्के देण्यास माझा विरोध होता. त्या माणसाने लालच दिली १० टक्केवर सहया घेतल्या. वास्तविक पाहता झोपडपट्टीधारकांनी १० हजार रुपये भरावे असं होतं. या प्रोजेक्टला उशिर लागला तो सोसायटी करण्यासाठी उशिर, पैसे काढायला उशिर, लोकांनी सोन-नानं गहाण ठेवलं आणि घराची किमंत काय लावली, फार वाईट परिस्थिती आहे. त्याठिकाणी घराच्या किमंती बद्दल मला आक्षेप घ्यायचा होता सुधीर जोशी यांनी ऐकले नाही. त्यांना रिक्वेष्ट केली होती. या शहरात एचआयव्हीग्रस्त बाधीत मुल असतील, आज आपण पेपरमध्ये वाचतो लहान मुलांना काम देवू नका, बालकामगारांना कामावर ठेवायचे नाही. आज घरातील लहान लहान मुलांनी काम केले नाहीतर घर चालत नाही, अशा लोकांना शिक्षण देता येत नाही. म्हणून मी म्हणालो महात्मा फुले यांच्या नावाखाली या शहरात अनाथ आश्रम कढावे. गोरगरीब कुटूंबातील आपत्य असतील, बाल मजुर कामगार असेल त्यासाठी या सभागृहामध्ये १ के खाली ठराव सुध्दा केलेला आहे. आख्खी फाईल तयार केलेली आहे. ती आख्खी फाईल सुधीर जोशी यांनी गायब केलेली आहे त्या माणसाचे पाय धुवून पाणी पिऊ का. आम्ही पोटतीडकीने बोलतो ती फाईल गायब केलेली आहे. या गोष्टी बोलायला गेलंतर लई आहेत. “नंगेसे तो खुदाभी डरता हैं.” रेडझोनचं कायदयानं काय होईल ते होईल. आज त्याठिकाणी राहणा-या लोकांचे आपण काय करणार. त्याठिकाणी २ हजार यार्डमध्ये असलेल्या लोकांना काही झालेतर माझी रिक्वेष्ट आहे त्याठिकाणी त्या लोकांचे काय करणार याची उत्तर दयावीत. पिंपरी चिंचवड चौकामधुन आम्हांला बाहेर हाकलले, आता आम्हांला परत शहरात घ्यावे. ज्या लोकांचे पुनर्वसन राहीलेल आहे त्यांच पुनर्वसन तुंम्ही करायला पाहिजे. कन्सलटन्सीचे एनओसी घेण्याचे काम होते त्यांनी एनओसी घेतली नाही त्यामुळे कामास अडचणी आलेल्या आहेत आणि काम बंद पडलेले आहे. काम बंद पडले म्हणून ओंकार असोसिएटस् आणि ओंकार क्रिएशन यांची इन्क्वॉयरी करुन त्यांना काळया यादीत टाकावे. आयुक्त साहेब, आपण म्हणाल आता कोर्टात केस आहे, निकाल लागेल त्यावेळेस त्यांच पुनर्वसन करु, आपण अशा पळवाटा काढताल. माझी विनंती आहे ज्यावेळेस २ हजार यार्ड घोषीत केलेले, त्या लोकांना आपण बाहेर कुठेतरी शिफ्ट करा. नाहीतर कायदयाच कसं आहे, बाबरी मस्जीदचा अजून निकाल लागलेला नाही. तरी रेडझोन मुळे त्याचा निकाल कधी लागेल हे सांगता येत नाही. आम्हांला दुसरीकडे शिफ्ट करा. केंद्रशासनाने साडेनऊटक्के व्याजाने पैसे मागीतलेले आहेत. माझी विनंती आहे की केंद्रशासनाने झोपडपट्टीचे राजकारण करुन ठेवलेले आहे. बंद पाईपलाईनच्या योजनेचे पैसे पडून आहेत. ते पैसे घेवून जा, झोपडपट्टीचे पैसे का नेतात. गोरगरीबांना धान्य मिळतं ते सुध्दा या लोकांनी बंद केलेले आहे. माझी हात जोडून सभागृहाला, मा.महापौर आपल्याला व पत्रकार आपल्याला सुध्दा विनंती आहे की जोपर्यंत झोपडपट्टी पुनवर्सन होत नाही तोपर्यंत पैसे रिटन देवू नये अशी मी विनंती करतो अन्यत: अंदोलन करण्यात येईल तोपर्यंत हा विषय तहकूब ठेवावा अशी विनंती करतो.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, पत्रकार बंधु. “ज्याचं जळतं त्यालाच कळतं” जेएनएनयूआरएमचे पैसे परत गेल्याचे सर्वात जास्त दुख आम्हांला आहे. हे जेएनएनयूआरएम, एसआरए आणि बीआरटीएस, मला वाटतं केंद्रशासनाचा जो निधी येत होता त्या निधीचा विनीयोग करण्याचे काम मला वाटते एकाच अधिका-यांकडे आहे. या अधिका-यांच्या कामाचे ऑडीट करा, चेक करा. एसआरएचे शुन्य काम आहे. बीआरटीएस रस्ता चार वर्षात एकही सुरु झालेले नाही आणि पुनर्वसनाचे हे असं, काय काम झाले. आऊटपुट काय आहे त्यांच्या कामाचं. सुविधा किती, आतापर्यंत किती निधी खर्च केला, कुठं केला आणि उशिर का लागला. आज आम्ही जे ओरडतो, आपल्याला दुर्दैवाने हा जो विषय आणावा लागला आहे त्याचं कारण एकमेव त्या अधिका-याला धरा साहेब. तुम्ही असे केले नाहीतर तुमचा काहीही उपयोग नाही. आयुक्त साहेब तुम्ही मिटींग घेता त्याचे मिनीटस असतात का? त्याचा पुर्नआढावा घेता का? कामं होत नाहीत, निगरगट्ट झालेले आहेत अधिकारी. मा.श्रीकर परदेशी साहेब होते त्यावेळेला काही जणांनी घाबरुन व्हीआरएस घेतले. त्यावेळेला सुध्दा या निरढावलेल्या अधिका-यांवर काहीही परिणाम झालेला नाही. आपणतर गोडीतही घेतात, कडकही वागतात, मिटींग घेता. असे असताना सुध्दा काम “जैसे थे" जिथे आहे तिथेच, प्रगती शुन्य. त्यांच्यावर काहीही फरक पडत नाही म्हणून ही परिस्थिती आलेली आहे. त्यामागे इतरही काही कारणं आहेत. एसआरएचे काम शुन्य आहे. माझ्या वॉर्डातील तो विषय आहे. विजयनगर झोपडपट्टी आहे त्या झोपडपट्टीमध्ये आपण गेलो होतो. त्या झोपडपट्टीला रोड नाही आपण तिथूनच ओळलो. एसआरएची खासगी मालकीची जागा आणि ती त्यांचेव्दारे विकसन करायचे आहे. साहेब, एकाही अधिका-यांना तुम्ही विचारा कारण ती झोपडपट्टी, कोणाच्या मालकाची आहे त्याची माहिती त्यांच्याकडे आहे काय? त्याठिकाणची त्यांचेकडे काही माहिती नसेल त्या झोपडपट्टीमध्ये काही धनाढय लोक गेले त्यानी त्या झोपडीमध्ये सोसायटया स्थापन केल्या. कदाचित त्या बोगस सोसायटया असतील किंवा

ख-याही असतील. त्या लोकांना पैसे दिले आणि त्यांच्याकडून त्या जागा विकत घेतल्या. सोसायटीमध्ये जेवढे लोक होते त्यांना पैसे मिळाले नाही. ज्यांनी पैसे घेतले ते शांत आहेत पण ज्यांना मिळाले नाहीत ते त्याच सोसायटीचे लोक आता विरोधात गेले. अशाप्रकारे या सोसायटया बनवून कायदयात बसवून काही धनदांडगे लोक हे त्या झोपडीचे मालक झालेले आहेत. यापेक्षा त्या झोपडपट्टीवाल्यांच दुर्दैव दुसरं नाही आयुक्त साहेब, आपण या महापालिकेचे सर्वसर्वा आहात. आम्ही मागणी केलीतर त्याची पुर्तता तुम्हीच करणार आहात. गरीब लोक राहतात, कोणाचही घर १०x१० पेक्षा मोठं नाही. एकाही घरातील बाई घरी बसत नाही ती सकाळी ६ वाजता बाहेर पडते व दुपारी ४ वाजता घरी येते. कोणीतरी दिलेलं, उष्टमाष्ट उरलेलं, शिळपाकं अन्न ती खाते आणि ४ वाजता घरी येते. साहेब, त्या झोपडपट्टीमध्ये तुम्ही सकाळपासून गेल्यानंतर ४ ते ५ वाजेपर्यंत घरी कोणीही सापडणार नाही.

अगदी मेनरोडवर अशाप्रकारची झोपडपट्टी आहे. आपल्याला जर लक्ष देता आलं आणि त्या मेहरबान साहेबांच्याकड काम असेलतर त्यांनी त्याबाबतीत काय केलं. अशा अनेक झोपडपट्टया आहेत त्याबाबतीत कधीतरी नजर वळवा. एसआरएच्या झोपडपट्टया खासगी मालकीचे ते म्हणतात पुर्वी होती काय असं कुठं काय काय झालय, माझ्या बाबतीतला मी एक तुम्हांला अनुभव सांगीतला आहे. मी एसआरए ऑफीसमध्ये जावून आले. माझा अर्ज सुध्दा दिलेला आहे. माझ्या वॉर्डमधील ही झोपडपट्टी आपल्या अंतर्गत पुनर्वसन करणार आहात तर त्यांनी सांगीतले त्याठिकाणी आम्ही काही करु शकत नाहीत कारण खासगी मालकीची आहे. कधी झाली खासगी मालकी, ती नंतर झाली. बरं झाल तो गुंडाळला एसआरए प्रकल्प. अजीबात त्या झोपडपट्टीच्या त्या ऑफीसमध्ये काहीही काम होत नव्हतं, नुसतच टिवल्या भवल्या करणारे अधिकारी मी पाहिलेले आहेत. मी जेवढे प्रयत्न करायचे तेवढे केलेले आहेत. शेवटी हात टेकावे लागलेले आहेत. एसआरएचा हा प्रोजेक्ट आपल्या साहेबांकडे आहे हे मला नंतर कळलं. आता प्रश्नोत्तरात सन्मा.नगरसदस्या अश्विनीताई चिंचवडे यांनी प्रश्न विचारले त्याला उत्तर दिलेले आहे. वि.क्र. ६ होताच. जवळ जवळ दोन-चार महिन्या पुर्वीपासून हा प्रश्न गाजतो आहे. जेएनएनयूआरएम अंतर्गत असलेला फंड केंद्रशासन परत मागते. हा प्रोजेक्ट बंद होतो तरी प्रश्नोत्तर आलेले आहेत, असु दयात. निवडणूका लढवायच्या असल्या की असे काही प्रश्नोत्तरे किंवा त्या माध्यमातून आपल्याला सभागृहात बोलावच लागतं. मला असे सांगायचे आहे की, पुनर्वसनाच्या बाबतीत आपलं प्रशासन कोणाच्या तरी दबावाखाली काम करतं. एकतर नगरसेवकांच्या किंवा त्यांच्या घरच्यांच्या, लोकमत वृत्तपत्राच मी अभिनंदन करते की त्यांनी ठळक अशी बातमी दिलेली आहे. या लोकांच्या अंडरप्रेशर आपले प्रशासन काम करते, त्यांना थोडं काहीतरी वाटलं पाहिजे. आपण एवढा मोठा पगार घेतो. ज्या पध्दतीने ज्या प्रमाणे आपण वेताळनगरचे पुर्नवसन करायला पाहिजे होते त्याप्रमाणे त्यांनी केलेले नाही. मा.गावडे साहेब, मा.तांबे साहेब आणि त्यांचे प्रमुख म्हणून मा.राजन पाटिल साहेब यांनी याबाबतीत मला खुलासा करायचा आहे. कोणाच्या अंडरप्रेशर त्यांनी ए,बी,सी,डी सगळच जर पुनर्वसन व्हायचं होतं तर त्यांनी मध्येच का डी चं, ई चं पुनर्वसन केलं, सलग का केले नाही तो प्रश्न चर्चेच्या वेळेस सन्मा. सदस्य का विचारत नाहीत. मोरयानगर झोपडपट्टी माझ्या वॉर्डात येते म्हणून काय राजकारण करायचं तेही गरीब आहेत. विशेष म्हणजे वेताळनगरमधुनच तो प्रोजेक्ट आहे. त्याला वेताळनगर असेच नाव आहे हे मागच्या नगरसेविका मा.आशा सुर्यवंशी यांना माहिती आहे. एकाच ठिकाणी राहणारे लोक रस्ता एकीकडून बिजलीनगरकडे, प्राधिकरणाकडे जातो, एकीकडून पुणे-बॉम्बे रोडला आकुर्डीला मिळतो आणि अशा या दोन रोडच्या मध्ये अत्यंत छोटी अशी साधारणत: २५० कुटूंब असलेली ही झोपडपट्टी आहे. वेताळनगरची परिस्थिती काय आहे ती सांगते. वेताळनगरच नाव मोरयानगर आहे त्या गल्लीच म्हणून ती बाजूला ठेवताय का? ती माझ्या वॉर्डात आहे म्हणून बाजूला ठेवताय का? म्हणजे अशाप्रकारे आमच्यावर अन्याय

करताय का? हे चुकीच आहे. या वेताळनगरमध्ये १३१३ एकूण लाभार्थी आहेत त्यापैकी १०३३ पात्र आहेत. वेताळनगर याचा अर्थ फक्त वेताळनगर नाही मोरयानगर त्यामध्ये इन्क्ल्यूड आहे. सर्वात अगोदर मोरयानगरचे पुनर्वसन व्हायचं होतं. आता सुध्दा सांगतात कि आदि वेताळनगरच करा म्हणून. मी अधिका-यांना सांगते कोणाच्या दबावाखाली जर तुम्ही काम केलंतर माझ्या इतकं वाईट नाही, आयुक्त साहेब, याची नोंद घ्या. लोकांना कशाला सांगायचे आम्ही की तुमचे हितचिंतक आहोत आताच त्यांनी विषय काढला म्हणून सांगते. दोन वर्षे झाले दोन इमारती तयार होत्या. खुप प्रेम मतदारावर आहे मला माहिती आहे. दोन इमारती तयार होत्या. वेताळनगरचे अपात्र एक-दोन लोक माझ्या कडे आले आणि म्हणाले बाई आमच्याकडे पेपर आहेत. मी म्हणाले योग्य असेल, पात्र असतीलतर पात्र करावे आणि पेपर कमी असतीलतर त्यांच्याकडून पेपर मागवून घ्या. आपल्या ड्रेनेजच्या अधिकारी तिथेच होत्या मी त्यांना बोलावून घेतलं. दोन इमारती पुर्ण आहेत त्या का देत नाहीत ते म्हणाले ड्रेनेजचे काम अपुर्ण आहे. १०० ते २०० मी.चे काम असेल, तेथून लोक हाटतच नाहीत ते आम्हांला परवानगी देत नाहीत असे म्हणाले. मी म्हणाले माझ्या बरोबर चला. १९७० सालापासून मी या जागेमधुन जा ये करते. माझा दररोजचा शाळेत जाण्याचा तो रस्ता आहे. २५ फुट रस्ता होता. त्या रस्त्यातून फोर व्हिलरही जायची. एकच खोली त्यांची होती त्यांनी वाडयाच्या वाडया तिथे वाढविलेल्या आहेत. मी त्याठिकाणी गेल्यानंतर सगळे ओळखीचेच लोक. मॅडमला मी घेवून गेले आणि त्यांना मी सांगीतले तुम्ही जर हालला नाहीतर मुळची झोपडपट्टीची जेवढी जागा आहे तेवढीच दयायला लावेल. तिथं रस्त्यात कोणी बाथरुम बांधलेल, त्याठिकाणी कोणी नुसतेच पत्रे लावलेले, कोणी लाकडी काहीतरी लावलेलं आणि उगीचच जागा बळकावली. मी त्यांना बोलले तिथले चार लोक ओळखीचेच आहेत त्याठिकाणी सात आठ लोक होते त्यांच्यामुळे दोन वर्षे ड्रेनेजचे काम राहिलेले आहे. त्यांना थोडस दरडावून, थोड प्रेमाने सांगीतल्यावर त्यांनी ते मान्य केलं. मी म्हणलं तुम्ही याठिकाणीच राहाल. त्या इमारती आहेत त्याच्या काचा फुटल्यात कोण भरुन देणार. साहेब, त्यांनी ते मान्य केलं व त्यांनी दुस-याच दिवशी लेखी दिलं. कनिष्ठ अभियंता वाघ मॅडम माझ्या बरोबर होत्या त्यानां हे माहित आहे. लगेच त्यांनी ड्रेनेज पुर्ण केलं. एनओसी घेतली आणि आज वाटप करण्याच्या लायक त्या दोन इमारती आहेत. जेवढ शक्य आहे तेवढ आपण लोकप्रतिनीधी म्हणून केलं पाहिजेत, लोक सात देतात. आता सन्मा.नगरसेवीकांनी सांगीतले की त्यांच्या घरात त्याच्यामुळे पाणी गेलं एवढं घर वाढविलेतर पाणी जणारच. दोन बिल्डींग, दोन वर्षे आडलेल्या होत्या. ड्रेनेजचे काम झाल्यामुळे त्या आज पुर्ण झालेल्या आहेत. सगळयांचा सहभाग घ्यायला पाहिजे तो होत नाही. लोकांनी अडवणूकीचे धोरण स्विकारलेतर आपल्या अधिका-यांना काही घेणंदेणं नाही. त्यांना आपल्याकडून पगार मिळतो. तुम्हांला निवडून यायचेतर तुम्ही लोकांचे प्रश्न सोडवा त्यांना काहीही देणंघेणं नाही कोणीही आत्मीयतेने त्या प्रश्नाचा पाठपुरावा करत नाही, ना त्या

इमारतीकडे जात. जेव्हा होईल तेव्हा होईल. दोन इमारती पुर्ण होण्याच्या अगोदर सोसायट्या केल्या असत्या, त्यांच्याकडून त्यांचा स्वहिस्सा घेतला असतातर आतापर्यंत झाले असते. अशाप्रकारची परिस्थिती आहे. मा.आयुक्त साहेब आपण चार महिन्यापुर्वी मिटींग घेतलेली होती, झोनिपूचे सर्व कर्मचारी, आजी, माजी सहा.आयुक्त, प्रशासन अधिकारी होते आणि त्या मिटींगमध्ये मी सुध्दा होते. चुकून मला बोलावल, त्यांच्या ध्यानीमनीही नाही, की मी पण झोपडपट्टीची नगरसेवीका आहे. त्याठिकाणी आपण सांगीतले की आपण झोपडपट्टीधारकांच्या घरी जावं, साहेब, मी तुम्ही करता त्या चांगल्या गोष्टीचे कौतूक करत असते. त्यांच्या घरी जा, त्यांना पुरावे सादर करण्यासाठी सांगा. एखादा कमी पुरावा असेलतर तो कसा सादर करायचा ते सांगा. स्वहिस्सा भरण्यासाठी तयार करावे, असेही तुम्ही सांगीतल की जाहीर प्रकटन दया व लोकांना १५ दिवसांची मुदत दया. मला वाटतं याला सहा महिने झाले असतील कदाचित. ए आणि बी विंग मध्ये जवळ जवळ मी सगळयांच्या घरी गेले त्यांना सांगीतले आपल्याला या बिल्डींगमध्ये शिफ्ट व्हायच आहे. दोनच असे गरीबी म्हणून, असहाय्य म्हणून ते लोक भरु शकत नव्हते. काही थोडे बोटावर मोजण्या इतके दोन-चार लोक. बाकीचे सर्वांची तयारी आहे परंतु प्रशासन त्या झोपडपट्टी पर्यंत त्यांच्या घरापर्यंत गेलेलं नाही. शेवटी तुम्ही नाशिक फाटयावर जशाप्रकारे समन्वयक ठेवलेला आहे तसा ठेवा म्हणाले. यांच्या पायाला मेंदी लावलेली असेलतर समन्वयकाला पाठवा. ते लोक तयार आहेत. पण मी तुम्हांला सांगते की मोरया नगर घ्यायचे नाही आगोदर आमचं घ्या असे जे सांगतात त्यांचा मी या सभेमध्ये निषेध करते. जे या सभागृहात नाहीत त्यांनी यामध्ये सहभाग घेवू नये. अधिका-यांवर अजीबात प्रेशर पाडायचे नाही. जे स्वहिस्सा भरतात त्यांना ताबडतोब घर दयायची व्यवस्था करावी. त्यांची सोसायटी करावी व लगेच त्यांना ताबा दयावा. अगोदर ए-बी विंग व्हायला हवी होती ती नका घेवू म्हणून सांगतात आणि दंडवते साहेबांना सांगावे याच्यानंतर अंडरप्रेशर रहायचे नाही. साहेब, तुम्ही दळवीनगरला आलां होतात आणि त्याठिकाणी लोकांनी तुमच्या समोर काय वर्तन केले हे मला माहिती आहे. मी ताबडतोब तिथून हाटवल लगेच आपण निघालोत. विधानसभेची निवडणूक पाच वर्षानी आहे. चार-दोन लोक गोळा करतात आणि देतात घोषणा. “ज्यांच जळतं त्यालाच कळतं.” त्याठिकाणी  रात्री १०, ११ नंतर थांबा म्हणाव मी तुमची पाठ थोपटेल. एखादयाच्या पत्राशेडमध्ये रहा एक दोन दिवस म्हणजे कळेल काय परिस्थिती आहे ती. किती तुमची बहादुरी आहे ती तिथं तुम्हांला कळेल. ज्यांना खुप प्रेम आहे त्यांनी आपली जागा मोफत दयावी. आता जे स्वहिस्सा भरण्यासाठी तयार आहेत त्या झोपडपट्टीधारकांना त्वरीत घर देण्यात यावे अशी मी विनंती करते. १३१३ एकूण लाभार्थी आहेत संपुर्ण वेताळनगरमध्ये, त्यापैकी १०३३ पात्र आहेत आणि त्यातले २८० अपात्र आहेत. साहेब, आपण ४४८ लोकांना ताबा दिलेला आहे व दोन इमारती तयार आहेत. २२४ लोक त्यामध्ये बसतील. आणि २६३ उरतात त्यामधले आमचे मोरयानगर जे आहे तो वेताळनगरचाच भाग

त्यातले २६३ झोपडपट्टीधारक आहेत पैकी १८२ पात्र आहेत. अजूनही कोणी जर त्यांचे पुरावे दिलेतर ते पात्र होवू शकतात. वर्षानुवर्ष चाललेले आहे लोकांनी पण आपली सोय करायला हवी होती. म्हणून मी सांगते हा जो भाग आहे तो दोन रस्त्याच्या मधील भाग आहे तो आपण रिकामा केल्याशिवाय, त्याठिकाणी बसस्टॉप उभारल्याशिवाय आपल्या चिंचवडच जे हे ठिगळ आहे ते कमी होणार नाही, पुनर्वसन सुरवात तरी तेथून करायला हवी होती शेवटतरी तिथून करा असं मी तुम्हांला सांगते. साहेब, आदि ती सुरवात होती ती सुरवात करा आणि नंतर उरलेल्या लोकांना दया. आयुक्त साहेब २४९ एवढे झोपडपट्टीधारक तिथे उरतात. मी मगा मा.गावडेसाहेबांशी बोलले, चर्चा केली त्यांनी सांगीतले की शासकीय नियमानुसार ज्यांचे घरे आहेत ते वगळलेतर आमचे ऑब्जेक्शन नाही. तुमच्या नियमात बसतील त्यांना घरे दयावीत परंतु लवकर पुनर्वसन करा हेच आमचं म्हणणं आहे. त्यापैकी दोन बिल्डींग अपुर्ण आहेत एक स्लॅब टाकून पुर्ण झालेली आहे ही तीसरी बिल्डींग आहे आणि एका बिल्डींगचे प्लिंथ, कॉलम उभे राहीलेले आहेत. या दोन बिल्डींगसाठी जेएनएनयूआरएम अंतर्गत ३८ कोटी आपण ठेवलेला निधी आहे तो निधी या बिल्डींगसाठी खर्च करणार आहेत का. आपण कसे पुर्ण करणार आहात. झोपडपट्टी निर्मुलन या नावाखाली काही निधी ठेवलेला आहे काय? त्याशिवाय दुसरा निधी माझ्या पाहण्यात आलेला नाही. परंतु त्या जागेमध्ये आपण प्लिंथ पुर्ण केलेले आहे, कॉलम उभा केलेले आहेत त्याठिकाणी निधी कमी लागणार आहे. आपल्याकडे सध्या निधी शिल्लक असलातरी केंद्रशासनाने कितीही पत्र पाठवू दयात तो निधी परत देवू नका अशी मी विनंती करते. मला वाटतं सन्मा.सभागृह त्याला मान्यता देईल. जे कोणी असं भासवत असतील की आम्ही राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नगरसेवक हा प्रोजेक्ट बंद करतोय हा कोणाचा गोडगैरसमज असेलतर तो त्यांनी दुर करावा कारण हा प्रोजेक्ट १९८९ मध्ये.. आता मला तो इतिहास सांगायचा नाही. आताच मा.तानाजी खाडे मनापासून बोलले. संपुर्ण सालासह सभावृत्तांत त्यांनी सांगीतलेले आहेत. १९८९ ला ठराव झाला त्याचवेळी कॉंग्रेसने पुनर्वसनाचा ठराव करुन सुरवात केली. त्यांच्या काळात सुरवात होत होत गेली. समजा हेच पुर्वीचेच सरकार असतेतर आणखी एक दोन वर्षानी निवडणूका झाल्या असत्या, सरकार बदललं नसतंतर कदाचित आपले प्रोजेक्ट पुर्ण झाले असते. राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रेसने या प्रोजेक्टला निधी मंजूर केलेला आहे. कोटयावधी रुपयाचे कामं झालेली आहेत. विठ्ठलनगरचा प्रोजेक्ट पुर्ण झालेला आहे त्याबद्दल धन्यवाद दयायला पाहिजे. मिलिंदनगरचा बराचसा प्रोजेक्ट पुर्ण झालेला आहे. वेताळनगरचे सुध्दा आपण मनात आणलेतर सर्व लाभार्थ्यांना घरे मिळतील आपण थोडस जास्त वेगाने काम केले पाहिजे, आपण मनावर घेतलं पाहिजे आपल्याकडे निधी उपलब्ध आहे. सेक्टर २२ ची स्टे ऑर्डर आहे त्यावर मी बोलू शकत नाही. परंतु मागील सरकारचे कौतूक करावेसे वाटते की त्यांनी केंद्रशासनाकडून निधी पाठविलेला आहे आणि गोरगरीबांना ही घरे मिळावीत म्हणून हे काम चालू ठेवलेले होते पण ते का बंद झालं. मार्च

२०१५ पर्यंतची मुदत दिली होती परंतु आता समजा आमचे सरकार असतेतर ही मुदत वाढवुन नक्कीच घेतली असती. परंतु हे सरकारनेच सुरु केलेले आहे. आपण राजकारणी आहोत आपण काही संत महात्मे नाहीत. मी याठिकाणी काही तारखा देते. एप्रिलला सरकार आले ३ मे २००० ला. मार्च १२ ला एक पत्र आलं. १० डिसेंबर २०१४ ला एक पत्र आलं. १५/२/१४ ला एक पत्र आलं, लगेच १७/२/१४ ला एक पत्र आलं. एक केंद्रशासनाचे, दुसरे म्हाडाचे असे सतत पत्र येत गेले तुम्ही प्रोजेक्ट बंद करावा म्हणून. २९/१/२०१५ ला एक पत्र आलं आणि शेवटचे ६/२/२०१५ ला म्हाडाचे एक पत्र आलं. याच्यामध्ये २७/११/२०१४ ला केंद्रशासनाची सँग्शनींग आणि मॉनिटरींग समिती बीएसयूपी बंद करा या संदर्भात मिटींग मधील केंद्रशासनाचे सचिव यांचा ठराव आहे त्या ठरावासह आपण याठिकाणी सगळं आम्हांला दिलेल आहे. वेळोवेळी त्यांनी पत्रव्यवहार केलेला आहे हा पत्रव्यवहार त्वरीत बंद करा अशा प्रकारे त्यांनी आपल्याला सतत धमक्या दिलेल्या आहेत. जेएनएनयूआरएमखाली गोरगरीबांना आपण जी घरं देत होतो त्यांच्या आश्रूंची जी फुल होत होती या प्रोजेक्टमुळे गोरगरीब विशेषत: पिंपरी चिंचवडमध्ये कॉंग्रेसच्या आणि राष्ट्रवादीच्या मागे होते. याचीच धास्ती या नव्या सरकारने घेतली त्यांनीच हा नंबर एकचा प्रोजेक्ट कसा बंद होईल व लोकांना कसं रस्त्यावर आणायचं, लोकांना कसं नाराज करायचं अशाप्रकारचे काम त्यांनी हा प्रोजेक्ट बंद करुन चालवलेले आहे. एवढेच नव्हेतर त्यांनी जे पैसे परत मागीतलेले आहेत त्याच्यावर पुर्वी ८ टक्के व्याजाचा रेट ठरलेला होता आता ९.५० टक्के व्याजाचा रेट त्यांनी घेतलेला आहे असं हे सावकारी काम त्यांनी चालवलेल आहे. गोरगरीबांना सबका सात, सबका विकास. गोरगरीबांना सोडून, फक्त आदाणी आणि अंबानी इनके सात आणि इनकां विकास. मला या सरकारचातर जाहीर निषेध करायला पाहिजे कारण त्यांनी हा प्रोजेक्ट बंद करायला लावलेला आहे त्यांनी मुदतवाढ दिलेली नाही. सर्वाना सर्वसामान्य जनतेला जर वाटत असेल की आम्ही बंद करतोय तर तसे नाही. आम्ही गोरगरीबांच्या बरोबर आहोत, आमच्या धोरणामध्ये आमच्या नितीमध्ये, आमच्या नियमामध्ये किंवा आमचे जे राजकीय धोरण आहे त्याच्यामध्ये गरीब सर्वात आदि आहेत. शासनाच्या धोरणामुळे आपण बंद करतोय परंतु आपला पण कर्मदरिद्रीपणा याला कारणीभूत आहे. वेळेत जर पुर्ण केला असतातर ही वेळ आली नसती, त्यांनी सतत आपल्याला अशा पत्रवजा धमक्या दिल्या नसत्या आणि आपण हा निधी परत दयायची वेळ आली नसती. मला खुप वाईट वाटतय त्यांच्या बरोबर गेली अनेक वर्षे मी राहाते. उदयोगनगर झोपडपट्टीचे पुनर्वसन यामध्येच होतं. ते पुनर्वसन होईल म्हणून मी परवाच माअजीतदादा यांच्या समोर तुम्हांला बोलले. साहेब, आपण बोलतोत, दादाला सांगून तुमच्यावर विशेष काही फरक पडेल असं वाटत नाही पण तरी बोलले. उदयोगनगर पुनर्वसन प्रकल्प सुरु करणार म्हणून २००७ ला मोठा गाजावाजा करुन भुमिपूजन केले. भुमिपूजन केल्यानंतर काहीतरी चांगली बातमी काहीतरी भविष्यात चांगलं घडेल असे वाटतं पण भुमिपूजन एवढं वाईट असतं, खडतर असतं, इतक

घाणेरड असतं हे त्या पत्राशेडवरुन कळलं. इथं आणून वेताळनगरचे लोक ठेवले. आमचे अगोदर पुर्ण करायच होत ते सोडलं आणि वेताळनगर सुरु केले. ठिक आहे, वेताळनगरचही ब-याच वर्षापासून जागेवरच पुनर्वसन करा म्हणून त्यांचा हाट्ट होता त्यामुळे तिथं ३३०० घरे बांधुन सुध्दा ती पुन्हा घुसखोरांनी काबीज केली. आमचे सोडले आणि आमच्या डोक्यावर वेताळनगरचे लोक आणुन ठेवले. एकदा गेले परत दुसरे आले दुस-यांदा गेले परत तीसरे आले. झोपडपट्टीवाल्यांना घरे मिळावेत अशी माझी पण इच्छा आहे परंतु साहेब, झोपडपट्टीवाले कोण? ज्यांना खरंच आवश्यकता आहे त्यांनाच मिळावे. चाळीत सुध्दा लोक राहतात. खुप घुशीने घर पोखरलेले आहे. चाळीतपण असेच लोक आहेत, आमच्या पांढरकरांच्या चाळी आगदी अशाच आहेत. फार वाईट परिस्थिती आहे तिथे पण लोक राहतात. पण झोपडपट्टीत घर नाही, लोक राहू देत नाहीत. ज्यांना आवश्यकता आहे त्यांना घरे मिळाले पाहिजेत. मा.पंतप्रधानांनी आवाहन केलेले आहे ज्यांना शक्य असेल त्यांनी घरगुती गॅसची सबसिडी घेवू नये तसे ज्यांना आवश्यकता नाही त्यांनी घरे घेवू नये. वेताळनगरमध्ये आपण ज्यांच्या नावावर घर दिलेले आहे ते तिथं किती राहतात? एकदा त्याचे स्टिंग ऑपरेशन करा म्हणजे कळेल. साध्या स्टॅम्पपेपरवर लिहून दिलेले आहे आणि घरं दुसयाची आहेत. ही प्रवृत्ती आपल्या अधिका-यांच्या निष्काळजीपणामुळे त्याठिकाणी घडलेली आहे. त्याठिकाणी पुनर्वसन चालू आहे. यांच येणे-जाणे का नाही. त्याठिकाणी यांनी लक्ष का दिलेले नाही. म्हणजे तिथे जे घुसखोर आलेले आहेत याला सुध्दा आपले अधिकारी जबाबदार आहेत. पत्राशेडमध्ये ८८ ते ९० एवढेच तिथे लाभार्थी आहेत. लोक पात्र आहेत ते सुध्दा त्याठिकाणी राहत नाहीत. ते सुध्दा दुसरीकडे राहतात. अगदी दहा ते वीस लोक स्वतः राहत असतील. या सभागृहामध्ये कितीवेळा पत्राशेडचे वर्णन तुमच्यासमोर केलेले आहे, तुम्ही स्वतः गेला होतात. चिंचवड रेल्वेस्टेशन मधुन येणारे, प्राधिकरणात जाणारे, चिंचवड गावात काही जाणारे, आमच्याकडून काही जाणारे हजारोनी लोक चिंचवड स्टेशनवरुन लोकलनी सुटले किंवा गाडीनी आले की त्याच रस्त्याने जातात. रस्ता मोठा झालेला आहे चांगला झालेला आहे, स्थापत्य विभागाला मी खुप खुप धन्यवाद देईल. त्याठिकाणी त्या रस्त्यावर या पत्राशेडमधील ड्रेनेजसाठी जाळया लावलेल्या आहेत. चारही बाजुने जाळया लावलेल्या आहेत. आतून एक जाळी, बाहेरुन एक जाळी, साईडने जाळी. त्यातले काही काही लोक इतके दरीद्रि आहेत की ते लोक जाळया काढून विकतात. ते मुद्दामहून करतात की काय याचीही चौकशी केली पाहिजे. प्लॅस्टिकच्या अर्धवट तुटलेल्या बकेट आहेत त्याचे मी तुम्हांला फोटो पाठविलेले आहेत. आपले सहा ते आठ ड्रेनेजचे लोक त्या टॅंकरसह व जे आपले जे.ई. डुंबरे साहेब आहेत त्यांचेसह ते लोक काम करत असतात परंतु आठ-आठ दिवस ते चोकअपच निघत नाही. ४०० ची लाईन आहे. ड्रेनेजची मोठी लाईन आहे तरीही ते साहित्य त्यातून निघत नाही. संपुर्ण रोड गच्च भरतो, सगळं मैलामिश्रीत पाणी त्याठिकाणी असतं. हे त्यांनी तिथं नीट वागायला नको का आणि त्याना घर दया म्हणणा-यांनी एकदातरी

त्या ड्रेनेजच्या आडलेल्या पाण्याला भेट दयावीनां. ज्यांना घर पाहिजेत, ज्यांची मनापासून इच्छा आहे ते असं वाकड वागणार नाहीत. प्रशासनाला ते एवढे वाईट काम करु देणार नाहीत. असे लोक गुंड लोक त्याठिकाणी राहतात. माझ खोटं असेलतर चिंचवड पोलीस स्टेशनमध्ये किती गुन्हे पत्राशेडमधील नमुद आहेत हे विचारा म्हणजे तुम्हांला कळेल किती त्याठिकाणी गुंडगीरी आहे. त्याठिकाणी एक शेड आहे, परवा कशाच्यातरी निमीत्ताने गेले, आपण लोखंडी खुर्च्या ठेवतो बागेत, त्या खुर्च्यांनी रस्त्यावरील ती खोली गच्च भरलेली आहे. आमच्या तेथील मुल मागे लागली म्हणाले आम्हांला बाकडे पाहिजेत. मी म्हणले ते तोडा आणि घेवून या साहेब, अशी परिस्थिती आहे. परवा दंडवते साहेबांकडे ते लोक भेटले ते त्यांचा स्वहिस्सा भरण्यासाठी तयार आहेत. साहेब, जरा प्रशासन हालवा. त्यांना स्वहिस्सा घ्यायला सांगा, त्यांना स्वत:ला ते बनवायला सांगा. एक महिन्याच्या आतमध्ये ते काम पुर्ण होईल. पण आपण हालत नाहीत. उदयोनगर बद्दलतर काय बोलायचे, आता सांगीतल १९८९ ला ठराव झाला आहे. १९९२-९३ पासून त्यांच्या सर्व सुविधा बंद केल्या, का बंद केल्या. गटर करायचे नाही, रस्ते करायचे नाही, टॉयलेट बांधायचे नाहीत. आता बांधलेले आहेत पण दहा हजार लोकसंख्येला वीस आहेत त्यातील काही बंद असतात फार भयानक परिस्थिती आहे. त्यांच्या सुविधा बंद का केल्या, पुनर्वसनामध्ये ही झोपडी आहे. साहेब, मी आल्यानंतर सांगीतलं उदया पुनर्वसन करा, आज मला सुधारणा करु दया. लोक मातीत बसायचे, वाईट परिस्थिती होती आता कुठे या दोन वर्षात ब्लॉक टाकलेले आहेत. अजुन गटारीच काम झालेलं नाही. माझ्या लोकांना तुम्ही सुध्दा लक्ष दिलेले नाही. राजन पाटिल यांना सांगायचं त्यांनी या झोपडपट्टीच, तुम्ही ही झोपडपट्टी पुनर्वसनातून वगळणार होता. तुम्हांला जेएनएनयूआरएमचे पैसे परत दयायचे होते तर या झोपडपट्टीसाठी तुम्ही जादा निधी उपलब्ध का करुन दिला नाही. अजीबात संवेदना राहीलेल्या नाहीत या अधिका-यामध्ये, गरीबांच्या बाबतीत त्यांना काहीही घेणंदेणं नाही. याची दखल साहेब तुम्ही घेतली पाहिजे. एकतर त्यांच पुनर्वसन तुम्ही कॉर्पोरेशनच्या पैशातून करा अन्यत: त्यांना सगळया सुविधा दया. तुम्ही सेंटर संघटनेला सर्व्हे करायला दिलेला आहे. माझी झोपडपट्टी त्यात नव्हती ती आता घेतली का नाही माहित नाही, कृपाकरुन ती घ्या. पंतप्रधानांच्या कार्यालयाकडून मोठमोठया जाहीराती झळकतात, आणि आमच्या महिला त्या नुसत्या जाहीरातीच बघतात. काहीतरी तुमच्याकडून तरी होवू दयात. एखादं आठवणीत राहण्यासारखं काम होईल. जसं चाळीच्या बाबतीत तुम्ही करणार आहात. माझ्या चाळीचा सुध्दा तुम्ही सर्व्हे केलेला नाही. एखादा वॉर्ड तुम्ही गाळला का? त्याच्यामध्ये माझ्या चाळी पण नाहीत आणि झोपडया पण नाहीत. विषय घेतलेला आहे म्हणून आम्ही प्रश्नोत्तरावर बोललो नाहीत, विषय आलेला आहे आणि तो जिव्हारी लागलेला आहे. पैसे परत दया म्हणुन केंद्रशासन तुमच्याकडे तगादा लावतयं तो विषय आपण घेतलेला आहे. साहेब, सेंटर संघटनेकडून जर पुनर्वसन व्हायचं नसेलच, ते जर तुमच फिक्स झालेल असेलतर माझ्या

झोपडपट्टीमध्ये त्या सेंटर संघटनेचा सर्व्हेसाठी लगेच उदया तुम्ही त्यांना तसे पत्र दयाव. त्याबाबतीत केंद्रशासनाच्या अनुदानातून काही अनुदान आलेतर त्यांना ती पण मदत करावी. बाकीच्या कामात आम्ही पण तुम्हांला मदत करु यात. पण याठिकाणी पुन्हा एकदा गोरगरीबांसाठी झोपडपट्टी पुनर्वसन ही योजना ज्या सरकारने बंद करुन पैसे परत मागविले आहेत त्या सरकारचा मी याठिकाणी धिक्कार करते आणि थांबते, जयहिन्द.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, या विषयाची गांभीर्यता पाहता या विषयावर सर्वानाच बोलण्याची फार इच्छा आहे. हा विषय आपण तहकूब करणार आहोत. पुढच्यावेळेस हा विषय येईल त्यावेळेस सर्वाना संधी दयावी आणि हा विषय तहकूब करावा अशी मी सूचना मांडतो.

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा विषय मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ६६२ विषय क्रमांक - ६

दिनांक - ६/४/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. स्थापत्य BSUP प्र/७१/२०१५, दिनांक - २४/०२/२०१५

२) मा.शहरसुधारणा समिती सभा ठराव. क्र.४६ दि.४/३/२०१५

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ७

दिनांक - ६/४/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/३/कावि/६१०/२०१४ दिनांक २६/१२/२०१४

२) मा. महापालिका सभा ठ.क्र.६५२ दि. २६/२/२०१५

पिंपरी चिंचवड शहरातील हवा प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड मधील तीन चाकी ऑटो रिक्षाना सी.एन.जी. किट बसविणे आवश्यक आहे. सध्या मनपा हद्दीमध्ये एकुण अंदाजे ५८०० ऑटो रिक्षा आहेत. पुणे मनपाच्या धर्तीवर सी.एन.जी. अनुदानासाठी रिक्षा पंचायत पुणे-पिंपरी चिंचवड व क्रांती रिक्षा सेना यांनी निवेदनाद्वारे मागणी केलेली असुन अशा

प्रकारे अनुदान दिल्याने सी.एन.जी. चा वापर वाढणार आहे व त्या अनुषंगाने शहरातील प्रदुषणाची पातळी कमी होण्यास मदत होणार आहे. त्यानुसार शहरातील रिक्षा पंचायत व क्रांती रिक्षा सेना यांनी निवेदनान्वये पुणे महानगरपालिकेने सीएनजी किट बसवुन घेणाऱ्या रिक्षांना दहा हजार रुपये अनुदान दिलेले असुन त्याच धर्तीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने अनुदान देणेत यावे अशा मागणीचे निवेदन मा.आयुक्त सो. यांना देणेत आलेले आहे. त्यानुसार मा.आयुक्त सो. व मा.महापौर पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेमध्ये झालेल्या चर्चेमध्ये प्रस्ताव सादर करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.

यापुर्वी मनपाच्या मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८३७ दि.२४/७/२०१२ अन्वये शहरातील प्रदुषण कमी करण्यासाठी येथील वाहने सर्वप्रथम रिक्षा एल.पी.जी. सी.एन.जी. सारख्या पर्यावरण मित्र इंधनावर करण्याचे निर्देश मा.सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या भुरेलाल समितीने दिले आहेत. त्यानुसार शहरातील सर्व जुन्या रिक्षा एल.पी.जी. व सी.एन.जी. करण्याचा आदेश राज्य शासनाने प्रादेशिक परिवाहन प्राधिकरणाने दिले आहे. त्यानुसार पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर पिंपरी चिंचवड शहरातील ज्या रिक्षाचालकांनी आपल्या जुन्या व नव्या रिक्षा सी.एन.जी. किट बसविली आहे अशा रिक्षांना प्रत्येकी र.रु.१२,०००/- एकदाच अनुदान शहराची पालक संस्था म्हणुन देण्याचा निर्णय पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थायी समिती घेत आहे. त्याकरिता आगामी अंदाजपत्रक सन २०१३-१४ मध्ये ५ कोटीची तरतुद करणे बाबत व सदरचे काम तातडीने करणे बाबत सुचना केलेल्या आहेत.

त्यानुसार सदरच्या कामासाठी पर्यावरण विभागाकडे सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पामध्ये "तिन चाकी रिक्षांसाठी पिं.चिं.मनपामार्फत सी.एन.जी. किटसाठी सहाय्य अनुदान देणे" या लेखाशिर्षाखाली पान क्र.१४६ अ.क्र.२५ वर र.रु.१,२०,००,०००/- ची तरतुद करणेत आलेली आहे. तरी, मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८३७ दि.२४/७/२०१२ अन्वये र.रु.१२,०००/- ऐवजी पुणे मनपाच्या धर्तीवर शहरातील सर्व पात्र रिक्षाचालकांना सी.एन.जी./एल.पी.जी.किट बसविणेकामी सहाय्य अनुदान म्हणुन एकत्रित र.रु.१०,०००/- चे सहाय्यक अनुदान देणेस व सदर अनुदान वाटपाबाबतची कागदपत्रे एकत्रित ठेवणे, त्यामध्ये रिक्षांचे आर.सी. पुस्तकाची झेरॉक्स, सी.एन.जी.किट बसविल्याची पावती, लायसन्स, परमीट, फीटनेस सर्टिफीकेट, पी.यु.सी. व मनपा हद्दीमध्ये १० वर्षाचा अधिवास, या कागदपत्रांची तसेच नविन आलेल्या प्रस्तावांची तपासणी आर.टी.ओ. कडे असलेल्या माहितीबरोबर जुळवुन पडताळणी करणे, प्रस्तावांच्या रकमेचे बिल मनपाच्या लेखा विभागाकडे सादर करणे, तसेच रिक्षाचालकास चेकचे वाटप करणे इ. सर्व बाबींचे कामे पर्यावरण विभागाकडील तरतुदीमधुन कार्यशाळा विभाग, व ट्रॅफीक सेल विभागाकडुन करुन घेवुन टप्या टप्याने शहरातील सर्व पात्र रिक्षांना सहाय्यक अनुदान देणेच्या धोरणास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड शहरातील हवा प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड मधील तीन चाकी ऑटो रिक्षाना सी.एन.जी.किट बसविणे आवश्यक आहे. त्यानुसार पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर पिंपरी चिंचवड शहरातील सर्व जुन्या रिक्षा एलपी.जी. व सी.एन.जी. बसविणेकरीता प्रत्येक रिक्षांना प्रत्येकी १२,०००/- अनुदान प्रतिवर्षी ६० लाख मर्यादेपर्यंत देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सन २०१४-१५ चे सुधारित व सन २०१५-१६ चे नविन अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक १०७३० दि.१८/०२/२०१५ अन्वये मान्य करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ९६ प्रमाणे अंतिमत: मा.महापालिका सभेपुढे शिफारस करुन सादर केले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात स्थापत्य, विदयुत, पाणीपुरवठा, जलनि:सारण, पर्यावरण व अन्य सर्व विभागांच्या भांडवली कामांचा समावेश करण्यात आलेले आहे. या कामांमध्ये जुन्या व नव्या कामांचा समावेश करण्यात आलेला आहे. सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकातील नवीन कामांच्या निविदा प्रसिध्द करणेसाठी सक्षम समित्यांची प्रशासकीय मान्यता घ्यावी लागते. प्रशासकीय मान्यता घेणेसाठी तपशीलवार अंदाजपत्रके तयार करुन तदनंतर सक्षम समितीपुढे मान्यतेकामी सादर करणे यासाठी मोठा कालावधी लागतो व त्यामुळे निवीदा प्रसिध्द करणेस व त्यानंतर कामाचा आदेश देण्यास बराच विलंब होतो व पर्यायाने सन्माननीय सदस्यांच्या प्रभागातील कामे करण्यासाठी होणारा विलंबामुळे तक्रारी वाढत जातात. अंदाजपत्रकातील तरतुदीचा पुरेपुर वापर व्हावा व होणा-या कामाचा फायदा नागरिकांना लवकरात लवकर व्हावा यासाठी प्रशासकीय मान्यता तातडीने मिळणे आवश्यक आहे. सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकातील (अंदाजपत्रक पुस्तक क्रमांक ३) सर्व विभागांची नवीन विकास कामे लवकरात लवकर सुरु व्हावीत व त्याचा लाभ नागरिकांना व्हावा यासाठी सदर कामांना एकत्रित प्रशासकीय मान्यता देण्यात यावी.

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, दोन्ही उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ६६३ विषय क्रमांक - ७

दिनांक - ६/४/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.पअक/३/कावि/६१०/२०१४ दिनांक २६/१२/२०१४
२) मा. महापालिका सभा ठ.क्र.६५२ दि. २६/२/२०१५

पिंपरी चिंचवड शहरातील हवा प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड मधील तीन चाकी ऑटो रिक्षाना सी.एन.जी. किट बसविणे आवश्यक आहे. सध्या मनपा हद्दीमध्ये एकुण अंदाजे ५८०० ऑटो रिक्षा आहेत. पुणे मनपाच्या धर्तीवर सी.एन.जी. अनुदानासाठी रिक्षा पंचायत पुणे-पिंपरी चिंचवड व क्रांती रिक्षा सेना यांनी निवेदनाद्वारे मागणी केलेली असुन अशा प्रकारे अनुदान दिल्याने सी.एन.जी. चा वापर वाढणार आहे व त्या अनुषंगाने शहरातील प्रदुषणाची पातळी कमी होण्यास मदत होणार आहे. त्यानुसार शहरातील रिक्षा पंचायत व क्रांती रिक्षा सेना यांनी निवेदनान्वये पुणे महानगरपालिकेने सीएनजी किट बसवुन घेणाऱ्या रिक्षांना दहा हजार रुपये अनुदान दिलेले असुन त्याच धर्तीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने अनुदान देणेत यावे अशा मागणीचे निवेदन मा.आयुक्त सो. यांना देणेत आलेले आहे. त्यानुसार मा.आयुक्त सो. व मा.महापौर पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेमध्ये झालेल्या चर्चेमध्ये प्रस्ताव सादर करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.

यापुर्वी मनपाच्या मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८३७ दि.२४/७/२०१२ अन्वये शहरातील प्रदुषण कमी करण्यासाठी येथील वाहने सर्वप्रथम रिक्षा एल.पी.जी. सी.एन.जी. सारख्या पर्यावरण मित्र इंधनावर करण्याचे निर्देश मा.सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या भुरेलाल समितीने दिले आहेत. त्यानुसार शहरातील सर्व जुन्या रिक्षा एल.पी.जी. व सी.एन.जी. करण्याचा आदेश राज्य शासनाने प्रादेशिक परिवाहन प्राधिकरणाने दिले आहे. त्यानुसार पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर पिंपरी चिंचवड शहरातील ज्या रिक्षाचालकांनी आपल्या जुन्या व नव्या रिक्षा सी.एन.जी. किट बसविली आहे अशा रिक्षांना प्रत्येकी र.रु.१२,०००/- एकदाच अनुदान शहराची पालक संस्था म्हणुन देण्याचा निर्णय पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थायी समिती घेत आहे. त्याकरिता आगामी अंदाजपत्रक सन २०१३-१४ मध्ये ५ कोटीची तरतुद करणे बाबत व सदरचे काम तातडीने करणे बाबत सुचना केलेल्या आहेत.

त्यानुसार सदरच्या कामासाठी पर्यावरण विभागाकडे सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पामध्ये “तिन चाकी रिक्षांसाठी पिं.चिं.मनपामार्फत सी.एन.जी. किटसाठी सहाय्य अनुदान देणे” या लेखाशिर्षाखाली पान क्र.१४६ अ.क्र.२५ वर र.रु.१,२०,००,०००/- ची तरतुद करणेत आलेली आहे. तरी, मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८३७ दि.२४/७/२०१२ अन्वये र.रु.१२,०००/- ऐवजी पुणे मनपाच्या धर्तीवर शहरातील सर्व पात्र रिक्षाचालकांना

सी.एन.जी./एल.पी.जी.किट बसविणेकामी सहाय्य अनुदान म्हणुन एकत्रित र.रु.१०,०००/- चे सहाय्यक अनुदान देणेस व सदर अनुदान वाटपाबाबतची कागदपत्रे एकत्रित ठेवणे, त्यामध्ये रिक्षांचे आर.सी. पुस्तकाची झेरॉक्स, सी.एन.जी.किट बसविल्याची पावती, लायसन्स, परमीट, फीटनेस सर्टिफीकेट, पी.यु.सी. व मनपा हद्दीमध्ये १० वर्षाचा अधिवास, या कागदपत्रांची तसेच नविन आलेल्या प्रस्तावांची तपासणी आर.टी.ओ. कडे असलेल्या माहितीबरोबर जुळवुन पडताळणी करणे, प्रस्तावांच्या रकमेंचे बिल मनपाच्या लेखा विभागाकडे सादर करणे, तसेच रिक्षाचालकास चेकचे वाटप करणे इ. सर्व बाबींचे कामे पर्यावरण विभागाकडील तरतुदीमधुन कार्यशाळा विभाग, व ट्रॅफीक सेल विभागाकडुन करुन घेवुन टप्या टप्याने शहरातील सर्व पात्र रिक्षांना सहाय्यक अनुदान देणेच्या धोरणास मान्यता देणेत यावी अशी मा.आयुक्त यांची मागणी असलीतरी पिंपरी चिंचवड शहरातील हवा प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड मधील तीन चाकी ऑटो रिक्षाना सी.एन.जी.किट बसविणे आवश्यक आहे. त्यानुसार पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर पिंपरी चिंचवड शहरातील सर्व जुन्या रिक्षा एलपी.जी. व सी.एन.जी. बसविणेकरीता प्रत्येक रिक्षांना प्रत्येकी १२,०००/- अनुदान प्रतिवर्षी ६० लाख मर्यादेपर्यंत देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सन २०१४-१५ चे सुधारित व सन २०१५-१६ चे नविन अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक १०७३० दि.१८/०२/२०१५ अन्वये मान्य करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ९६ प्रमाणे अंतिमत: मा.महापालिका सभेपुढे शिफारस करुन सादर केले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात स्थापत्य, विदयुत, पाणीपुरवठा, जलनि:सारण, पर्यावरण व अन्य सर्व विभागांच्या भांडवली कामांचा समावेश करण्यात आलेले आहे. या कामांमध्ये जुन्या व नव्या कामांचा समावेश करण्यात आलेला आहे. सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकातील नवीन कामांच्या निविदा प्रसिध्द करणेसाठी सक्षम समित्यांची प्रशासकीय मान्यता घ्यावी लागते. प्रशासकीय मान्यता घेणेसाठी तपशीलवार अंदाजपत्रके तयार करुन तदनंतर सक्षम समितीपुढे मान्यतेकामी सादर करणे यासाठी मोठा कालावधी लागतो व त्यामुळे निवीदा प्रसिध्द करणेस व त्यानंतर कामाचा आदेश देण्यास बराच विलंब होतो व पर्यायाने सन्माननीय सदस्यांच्या प्रभागातील कामे करण्यासाठी होणारा विलंबामुळे तक्रारी वाढत जातात. अंदाजपत्रकातील तरतुदीचा पुरेपुर वापर व्हावा व होणाऱ्या कामाचा फायदा नागरिकांना लवकरात लवकर व्हावा यासाठी प्रशासकीय मान्यता तातडीने मिळणे आवश्यक आहे. सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकातील (अंदाजपत्रक पुस्तक क्रमांक ३) सर्व विभागांची नवीन विकास कामे लवकरात लवकर सुरु व्हावीत व त्याचा लाभ नागरिकांना व्हावा यासाठी सदर कामांना एकत्रित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ८

दिनांक - ६/४/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.वैद्/३/कावि/११३/२०१५ दि.१६/०२/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होण्याचे उद्देशाने शहराचे कार्यक्षेत्रामध्ये वैद्यकीय व्यवसाय करणा-या व्यावसायीकांकडून परवाना शुल्क आकारणेस मा.महापालिका सभेमध्ये ठराव क्र. ४७२ दि.२०/०२/२०१४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार शहरातील वैद्यकीय व्यावसायिकांकडून परवाना शुल्क आकारण्यात येत आहे. तसेच त्यामध्ये मुदतीत शुल्क न भरल्यास दंडाचीही तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | खाटांची संख्या | दर (र.रु) | दंड |
|---|---|---|---|
| १ | १ ते १० | २,०००/- | १ एप्रिल ते ३० जून या कालावधीत रक्कम जमा न केल्यास प्रतिमहिना फी चे १०%तथापि कमाल १२०%वार्षिक दंड |
| २ | ११ ते ४९ | ५,०००/- | |
| ३ | ५० ते १०० | १२,०००/- | |
| ४ | १०१ ते ४९९ | १,००,०००/- | |
| ५ | ५०० च्या पुढे | २,००,०००/- | |
| ६ | क्लिनीक, डिस्पेन्सरी, लॅबॉरेटरी, कन्सल्टेशन, पशु दवाखाने, फिजिओथेरेपी व इतर वैद्यकीय सेवा पुरविणा-या संस्था | १,२००/- | |

त्यानुसार, दि.१६/०१/२०१५ पासून नोंदणी अथवा नुतनीकरणाकरिता येणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांकडून विलंब शुल्क आकारण्यात येत आहे. आजतागायत परवाना शुल्काचे रकमेपोटी एकूण र.रु.२,३६,६००/- व विलंब शुल्कापोटी र.रु.६२०/- इतक्या रकमेचा भरणा महानगरपालिकेच्या कोषागारामध्ये करण्यात आलेला आहे.

तथापि, मा.स्थायी समिती सभेमध्ये वकील, चार्टड अकाऊंटंट, आर्किटेक्ट या व्यावसायिकांप्रमाणे डॉक्टरांकडून परवाना शुल्क आकरण्यात येऊ नये याबाबत ठराव क्र. ९०५७ दि.५/११/२०१४ रोजी सदस्य ठराव पारित करण्यात आलेला आहे.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्येकार्यरत असलेल्या वैद्यकीय व्यावसायिकांकडून आकारण्यात येणारा परवाना शुल्क रद्द करणेबाबत तसेच आजतागायत आकारण्यात आलेला परवाना शुल्कापोटीची प्रत्यक्ष रक्कम संबंधित वैद्यकीय व्यावसायिकांना परत न करता ती रक्कम पुढील जैववैद्यकीय घनकच-याचे शुल्कामध्ये समायोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- महापालिकेच्या आजी व माजी कर्मचा-यांसाठी प्रस्तावित असलेली धन्वंतरी योजना दि.१/४/२०१५ पासून प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ६६४ विषय क्रमांक - ८
दिनांक - ६/४/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.वैद्य/३/कावि/११३/२०१५ दि.१६/०२/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होण्याचे उद्देशाने शहराचे कार्यक्षेत्रामध्ये वैद्यकीय व्यवसाय करणा-या व्यावसायीकांकडून परवाना शुल्क आकारणेस मा.महापालिका सभेमध्ये ठराव क्र. ४७२ दि.२०/०२/२०१४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार शहरातील वैद्यकीय व्यावसायिकांकडून परवाना शुल्क आकारण्यात येत आहे. तसेच त्यामध्ये मुदतीत शुल्क न भरल्यास दंडाचीही तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | खाटांची संख्या | दर (र.रु) | दंड |
|---|---|---|---|
| १ | १ ते १० | २,०००/- | १ एप्रिल ते ३० जून या कालावधीत रक्कम जमा न केल्यास प्रतिमहिना फी चे १०%तथापि कमाल १२०%वार्षिक दंड |
| २ | ११ ते ४९ | ५,०००/- | |
| ३ | ५० ते १०० | १२,०००/- | |
| ४ | १०१ ते ४९९ | १,००,०००/- | |
| ५ | ५०० च्या पुढे | २,००,०००/- | |
| ६ | क्लिनीक, डिस्पेन्सरी, लॅबॉरेटरी, कन्सल्टेशन, पशु दवाखाने, फिजिओथेरेपी व इतर वैद्यकीय सेवा पुरविणा-या संस्था | १,२००/- | |

त्यानुसार, दि.१६/०१/२०१५ पासून नोंदणी अथवा नुतनीकरणाकरिता येणा-या वैद्यकीय व्यावसायिकांकडून विलंब शुल्क आकारण्यात येत आहे. आजतागायत परवाना शुल्काचे रकमेपोटी एकूण र.रु.२,३६,६००/- व विलंब शुल्कापोटी र.रु.६२०/- इतक्या रकमेचा भरणा महानगरपालिकेच्या कोषागारामध्ये करण्यात आलेला आहे.

तथापि, मा.स्थायी समिती सभेमध्ये वकील, चार्टड अकाऊंटंट, आर्किटेक्ट या व्यावसायिकांप्रमाणे डॉक्टरांकडून परवाना शुल्क आकरण्यात येऊ नये याबाबत ठराव क्र. ९०५७ दि.५/११/२०१४ रोजी सदस्य ठराव पारित करण्यात आलेला आहे.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपलिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या वैद्यकीय व्यावसायिकांकडून आकारण्यात येणारा परवाना शुल्क रद्द करणेबाबत तसेच आजतागायत आकारण्यात आलेला परवाना शुल्कापोटीची प्रत्यक्ष रक्कम संबंधित वैद्यकीय व्यावसायिकांना परत न करता ती रक्कम पुढील जैववैद्यकीय घनकच-याचे शुल्कामध्ये समायोजित करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच महापालिकेच्या आजी व माजी कर्मचा-यांसाठी प्रस्तावित असलेली धन्वंतरी योजना दि.१/४/२०१५ पासून प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमत मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६६५ विषय क्रमांक - ९

दिनांक - ६/४/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/६८/२०१५ दिनांक ०९/०३/२०१५

भिमशक्तीनगर झोपडपट्टीचा भाग हा से.क्र. २० मध्ये येत असुन सदरचा भाग हा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या आरक्षित क्षेत्रात येत आहे. सदर भागातील नागरिक नागरी सुविधा मिळणेबाबत वारंवार मागणी करीत आहेत.

दि. ०७/११/२०१४ रोजीचे भिमशक्तीनगर येथील झोपडपट्टीमधील नागरिकांच्या समस्या संदर्भात मा. आयुक्त साहेब यांचेकडे चर्चा केली असता भिमशक्तीनगर येथे कायमस्वरूपी शौचालय बांधणेबाबत मा. आयुक्त सो यांनी सुचना दिलेल्या आहेत. सदरच्या ठिकाणी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडुन नाहरकत दाखला मिळालेनंतर सदर ठिकाणी मनपामार्फत शौचालय बांधणेचे काम हाती घेणेत येईल. तथापि भिमशक्तीनगर येथे शौचालय बांधणेच्या कामाचा सन २०१४-१५ चे मुळ अंदाजपत्रकात समावेश नसलेने त्याकरीता सदर

कामाचा समावेश मुळ अंदाजपत्रकात करावा लागणार आहे व तसेच त्याकरीता तरतुद ही वर्ग करावी लागणार आहे.

तरी वॉर्ड क्र. ४ कृष्णानगर येथील भिमशक्तीनगर झोपडपट्टीमध्ये जुना ८ सिट्सचा संडास ब्लॉक पाडुन नविन २६ सिट्सचा दुमजली संडास बांधणे या कामाचा सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकामध्ये समावेश करणे व सदर कामासाठी र.रू. ५.०० लाख तरतुद प्रभाग क्र ४२ मधील आंबेडकरनगर झोपडपट्टीमध्ये सांस्कृतिक केंद्र इमारत बांधणे (८७१/४७) कामामधुन वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १०

दिनांक - ६/४/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूजि/६/कावि/१००/२०१५ दि.१०/३/२०१५

आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय कार्यान्वित आहे. सदर कार्यालयास आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृहासाठी तातडीने म.न.पा हद्दीत इमारत उपलब्ध होणेकामी त्यांची मागणी होती. कामाची तातडी लक्षात घेता म.न.पा.चे अण्णासाहेब मगर स्टेडियम, पिंपरी- नेहरुनगर आवारातील क्रिडा प्रबोधिनी वसतिगृहाची इमारत आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृहासाठीदि.३/१/२०१५ रोजी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयास मा.महापालिका सभेचे मान्यतेस अधिन राहून भाडेतत्त्वावर उपलब्ध करुन देणेत आली आहे.

प्रस्तुतकामी नगररचना विभागाने ठरविलेला भाडेदर व म.न.पा.च्या अटी/शर्ती लागू राहणार आहे व तरी महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग यांचे अंतर्गत कार्यान्वित एकात्मिक आदिवास प्रकल्प कार्यालय यांना आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृहासाठी म.न.पा.चे अण्णासाहेब मगर स्टेडियम, पिंपरी नेहरुनगर आवारातील क्रिडा प्रबोधिनी वसतिगृहाची इमारत भाडेतत्त्वावर व म.न.पा.चे अटी/शर्तीनुसार उपलब्ध करुन दिले असलेने त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग यांचे अंतर्गत कार्यान्वित एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांना आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृहासाठी मन.पा.चे अण्णासाहेब मगर स्टेडियम, पिंपरी - नेहरुनगर आवारातील क्रीडा प्रबोधिनी वसतिगृहाची इमारत भाडेतत्वावर दि. ३/१/१५ रोजी उपलब्ध करुन दिली आहे. तथापि सदरची इमारत एकूण फक्त ६ (सहा) महिने कालावधीसाठीच सदर संस्थेस देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - ६६६ | विषय क्रमांक - १० |
| दिनांक - ६/४/२०१५ | विभाग - मा.आयुक्त |

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूजि/६/कावि/१००/२०१५ दि.१०/३/२०१५

आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय कार्यान्वित आहे. सदर कार्यालयास आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृहासाठी तातडीने मन.पा हद्दीत इमारत उपलब्ध होणेकामी त्यांची मागणी होती. कामाची तातडी लक्षात घेता म.न.पा.चे अण्णासाहेब मगर स्टेडियम, पिंपरी- नेहरुनगर आवारातील क्रिडा प्रबोधिनी वसतिगृहाची इमारत आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृहासाठीदि.३/१/२०१५ रोजी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयास मा.महापालिका सभेचे मान्यतेस अधिन राहून भाडेतत्त्वावर उपलब्ध करुन देणेत आली आहे.

प्रस्तुतकामी नगररचना विभागाने ठरविलेला भाडेदर व म.न.पा.च्या अटी/शर्ती लागू राहणार आहे व तरी महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग यांचे अंतर्गत कार्यान्वित एकात्मिक आदिवास प्रकल्प कार्यालय यांना आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृहासाठी म.न.पा.चे अण्णासाहेब मगर स्टेडियम, पिंपरी नेहरुनगर आवारातील क्रिडा प्रबोधिनी वसतिगृहाची इमारत भाडेतत्त्वावर व म.न.पा.चे अटी/शर्तीनुसार उपलब्ध करुन दिले असलेने त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. तसेच महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग यांचे अंतर्गत कार्यान्वित एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांना आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृहासाठी मन.पा.चे अण्णासाहेब मगर स्टेडियम, पिंपरी - नेहरुनगर आवारातील क्रीडा प्रबोधिनी वसतिगृहाची इमारत भाडेतत्वावर दि. ३/१/१५ रोजी उपलब्ध करुन

दिली आहे. तथापि सदरची इमारत एकूण फक्त ६ (सहा) महिने कालावधीसाठीच सदर संस्थेस देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ११

दिनांक – ६/४/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
क्र.प्रशासन/८/कावि/१३७/२०१५ दिनांक ११/०३/२०१५

डॉ.जगदाळे आनंदराव दत्ताजीराव, वैद्यकीय अधिक्षक (निवृत्त) यांचे कार्यकाळात यशवंतराव चव्हाण रुग्णालयासाठी एच.बी.ओ.टी मशिन खरेदीतील अनियमितता, रुग्णालयीन कर्मचा-यांच्या बदल्यां ज्येष्ठतेने न करणे, एन.एस.टी मशिन उपकरणे खरेदी नस्तीतील अनियमितता, सुपर स्पेशालिस्ट अल्ट्रा मॉड्युलर ओ.टी उभारणीची निविदा प्रक्रिया करतानाचे मूलभूत नियमांचे पालन न करता, सदर निविदा प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून आल्याने सेवेत असताना निवृत्तीच्या दिवशी दिनांक ३१/०१/२०१३ रोजी खातेनिहाय चौकशीचे आदेश पारित करण्यात आले असून सदर आदेशानुसारच सेवानिवृत्तीविषयक लाभ रोखून ठेवण्यात आलेले आहेत. दिनांक १५/०३/२०१३ रोजी चौकशीकामी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. प्रस्तुत प्रकरणी विधानसभा तारांकित प्रश्न क्र १०३१८१ उपस्थित झालेला असून विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र ३८८५६ च्या अनुषंगाने कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग यांनी दिनांक २५ मार्च २०१३ रोजी विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांना चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

डॉ.जगदाळे आनंदराव दत्ताजीराव, वैद्यकीय अधिक्षक (निवृत्त) यांचे प्रकरणी विभागीय चौकशीचा अहवाल दिनांक २७/१०/२०१४ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर विभागीय चौकशी अहवालानुसार खालील प्रमाणे निष्कर्ष प्राप्त झालेले आहेत.

<u>दोषारोप पत्र बाब १</u>

डॉ. जगदाळे यांनी मल्टीप्लेस मशीनचे खरेदी बाबत शिफारस करतांना मल्टीप्लेस मशीन हे Risk to patient and attendant असले बाबत नमूद असतांनाही, तसेच एका वेळी

मल्टीप्लेस मशीनसाठी ६ कर्मचारी एका शिफ्टमध्ये लागत असतांना व ३ शिफ्टमध्ये १८ होत असतांनाही व त्या मशीनची किंमत र.रु.२,७९,२४,७५०/- म्हणजेच मोनोप्लेस मशीनचे किमती पेक्षा ५.५ पट जास्त असतांनाही या बाबत अभिप्रायात नमूद केलेले नाही. त्यामुळे डॉ. जगदाळे यांनी वस्तुनिष्ठ अभिप्राय सादर केला नसल्याचे दिसून येते

मोनोप्लेस मल्टीप्लेस बाबत सविस्तर माहिती न घेता त्या मशीनची पाहणी न करता, प्रत्यक्ष डेमो न घेता, डॉ.जगदाळे यांनी शिफारस केल्याचे दिसून येते.

वायसीएम रुग्णालयामध्ये सदरच्या उपकरणाची तातडीने आवश्यकता असले बाबत कोणतेही ठोस कारण नमूद केलेले नाही.

डॉ. जगदाळे वैद्यकीय अधिक्षक यांनी सदर मशीनची वायसीएमएच रुग्णालयास गरज आहे असे शेरांकन मशीनची पाहणी न करता माहिती न घेता, डेमो न घेता, केलेली असल्याने त्या शेरांकनास / अभिप्रायास ते जबाबदार असल्याचे स्पष्ट होत आहे.

दि.३०/९/२०१२ व दि.५/११/२०१२ अखेर आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. जगदाळे यांनी मुदत वाढ दिलेली आहे. वास्तविक या कामी मा. आयुक्त यांची मान्यता घेऊन मुदतवाढ देणे आवश्यक होते.

मशीन प्रत्यक्ष कार्यान्वीत झालेले नसतांना दि.२०/११/२०१२ च्या आदेशान्वये मनाली एन्टरप्राईजेस यांना ५ टक्के अनामत वजा करुन उर्वरीत रकमेचा धनादेश अदा करण्यात आलेला आहे.

प्रशासनाचा अभिप्राय :

१. M/S Kasco उत्पादीत Multiplace HBOT Chamber/Machine खरेदीचे आदेश देण्यापूर्वी या HBOT च्या Technical Specifications चे कोणाही सक्षम अधिका-याकडून/एजन्सीकडून परिक्षण/निरिक्षण करुन अभिप्राय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे Specifications मधील प्रत्येक बाबीसंबंधी स्पष्टता / खातरजमा करुन घेणे राहून गेले आहे.

२. वाय.सी.एम.एच मधील बायोमेडिकल इंजिनिअर यांनी ज्या HBOT मशीनचे निरिक्षण व परिक्षण करुन अभिप्राय दिला होता ते अमेरीकेतील M/S Sechrist यांच्याकडून उत्पादित Monoplace (Single Seater) with ventilator मशीन होते. सदर मशीनची खरेदी झाली असती तर त्यात त्रृटी राहून जाण्याची शक्यता नव्हती

३. HBOT Machine/ System ही उपरोक्त M/S Sechrist यांचेकडील Monoplace पध्दतीची असावी असे प्रस्तावित होते. हा प्रस्ताव M/S Sechrist यांचेकडील Monoplace HBOT System च्या तांत्रिक माहितीपत्राच्या आधारे सादर करण्यात आला होता.

प्रत्यक्षात त्यासाठी कोणाचीही सुस्पष्ट व रितसर मागणी नसताना तशी मागणी असल्याचे प्रस्तावात खोटे नमूद करण्यात आले होते. डॉ. जगदाळे तत्कालीन वैद्यकीय अधिक्षक व डॉ. गायकवाड तत्कालीन उपअधिक्षक तसेच ज्येष्ठतम सर्जन डॉ. पानसे ह्यांनी मुंबईच्या जसलोक हॉस्पिटल भेटीनंतर दि. २९/०७/२०१० रोजी केलेल्या स्पष्ट व जोरदार शिफरशीनुसार मा.आयुक्त यांनी M/S Sechrist कंपनीचे Monoplace HBOT System खरेदी करण्यास मान्यता दिली होती. ह्यानंतर मा.आयुक्तांचे अपरोक्ष तत्कालीन आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.अय्यर, वैद्यकीय अधिक्षक डॉ.जगदाळे व डॉ.गायकवाड ह्यांनी अचानक व संगनमताने M/S Sechrist कंपनीचे Monoplace HBOT System ऐवजी M/S Kasco यांचेकडील Monoplace HBOT System खरेदी करण्याचा निर्णय घेतला व मा.आयुक्तांची स्वाक्षरी थेट निविदा प्रसिध्दीच्या प्रस्तावावर घेतली.

४. Multiplace HBOT System चे पुरवठादार M/S Manali Enterprises यांना HBOT System चा पुरवठा करण्यासाठी तत्कालीन आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. जगदाळे यांनी एकुण दोन वेळा ९५ दिवसांची (दि. ३०/०७/२०१२ ते ०५/११/२०१२ या कालावधीत) नियमबाह्यपणे व स्वतःच्या मर्जीने मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे Multiplace HBOT System वाय.सी.एम.एच मध्ये पोहचण्यास ९५ दिवस विलंब झाला व त्यामूळे मशीनचे Inspection करुन त्रृटींची पुर्तता करुन घेण्यास तेवढा वेळ कमी पडला.

५. रुग्णालयासाठी कोणतेही Machine/Equipments खरेदी करण्यापुर्वी त्यासाठी लागणारी जागा, विद्युत पुरवठा, पाणीपुरवठा, आवश्यक गॅसेसचा पुरवठा, आवश्यक कर्मचारी वर्ग व त्यांचे प्रशिक्षण, Machine / Equipments चे रक्षण इत्यादी बाबींचे नियोजन करुन त्यांची पुर्तता करुन घेणे आवश्यक असते. Multiplace HBOT Machine सारखे अवाढव्य, गुंतागुंतीचे अनेक घटक/कार्यप्रणाली असणारे, प्रचंड किमतीचे मशीन बाबत अशा पायाभूत बाबींची आधी पुर्तता करुन घेणे आवश्यक आहे. प्रकरणी पायाभूत बाबींच्या पुर्ततांच्या बहुतांशी निर्देशांकडे डॉ.जगदाळे यांनी पुर्णतः दुर्लक्ष केल्याचे दिसून येते

६. Multiplace HBOT System चे Installation व कार्यान्वयन पुर्ण झाले नसताना पुरवठादारास एकुण किंमतीच्या ५०% रक्कम म्हणजे रुपये १,३९,६२,३७५/- नियमबाह्यपणे अदा करण्यात आली आहे.

<u>दोषारोप पत्र बाब २</u>

वैद्यकीय विभागाने दिनांक ०५/०९/२०१२ चे बदल्यांबाबतचे परिपत्रकातील सुचनांचे पालन केले नसल्याचे व काही सेवाजेष्ठ कर्मचा-यांच्या बदल्या न करता कमी कालावधी कार्यरत असणा-या कनिष्ठ कर्मचा-यांच्या बदल्या केल्या बाबतचे प्राप्त तक्रारीत तथ्य आढळून आलेले आहे. म्हणजेच डॉ.जगदाळे यांनी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असतांना दि.५/९/२०१२ चे

परिपत्रकामध्ये दिलेल्या सुचनांचे पालन न करुन मा.आयुक्त यांची मान्यता न घेता अंतर्गत बदल्या केल्याचे स्पष्ट होत आहे.

प्रशासनाचा अभिप्राय :

दिनांक ०५/०९/२०१२ चे परिपत्रकातील सुचनांचे पालन न करता जेष्ठता डावलून डॉ.जगदाळे यांनी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असताना बदल्या केलेल्या आहेत. हे लक्षात आल्यानंतर प्रशासन विभागाने बदल्या न झालेल्या सेवाज्येष्ठ कर्मचा-यांच्या बदल्या केलेल्या आहेत.

<u>दोषारोप पत्र बाब ३</u>

नस्तीमधील कागदपत्रे काढून नविन कागदपत्रे त्यात समाविष्ट करणे ही बाब गंभीर स्वरुपाची आहे. अपचारी सेवक हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर त्यावेळी कार्यरत असल्याने, विभाग प्रमुख म्हणून त्यांनी त्यांची जबाबदारी प्रमाणिकपणे पारपाडणे आवश्यक होते. तथापि, त्यांनी विभाग प्रमुखाच्या जबाबदारीचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट झाले आहे.

प्रशासनाचा अभिप्राय :

नस्तीतील कागदपत्रे काढतांना व नविन कागदपत्रे समाविष्ट करताना डॉ.जगदाळे यांनी विभाग प्रमुख म्हणून जबाबदारीचे पालन केले नाही.

<u>दोषारोप पत्र बाब ४</u>

Super Specialty Ultra Modular O.T उभारणीची निविदा नोटीस प्रसिध्द केल्यानंतर मुख्य लेखा परीक्षक यांनी चौकशी करुन केलेल्या तपासणीत आढळून आलेल्या अनियमितता नमूद केलेली आहे. त्यामध्ये संदर्भिय कामास होणा-या खर्चास मा.महासभेची प्रशासकीय मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही, बांधकाम परवानगी विभागाची मंजूरी घेतल्याचे दिसून येत नाही. तसेच ओटी कॉम्प्लेक्सचे ड्राईंग तत्सम आर्किटेक्ट यांचेकडून तयार व प्रमाणित करुन घेतलेले नाहीत. तसेच कामाचे तयार केलेले प्लॅन व नमूद केलेल्या निविदा स्पेसीफीकेशन प्रमाणे स्थापत्य विषयक कामाचे तसेच विद्युत विषयक कामाचे खर्चाचे अंदाज पत्रक शहर अभियंता व विकास अभियंता यांचेकडून तयार करुन घेतलेले नाही. तसेच त्यास तांत्रिक मंजूरीही घेतलेली नाही, तसेच ओटी साठी लागणारे साहित्य व मशीनरीचे स्पेसीफीकेशन प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी किमान तीन संस्थांकडून दरपत्रकासोबत स्पेसीफीकेशन, ब्रोशर इ. मागविणे आवश्यक असतांना फक्त दोनच संस्थाकडून दरपत्रके मागविलेली आहेत. तसेच येणारे खर्चाचे तपशिलवार अंदाजपत्रक तयार करुन त्यास बायामेडिकल इंजिनियर यांची मान्यता घेणे आवश्यक असतांना ती घेतलेली नाही. निविदा

प्रक्रियेमध्ये मुख्य लेखा परीक्षक यांनी नमूद केलेल्या अनियमित बाबींमुळे व ऑस्टीन तसेच मेडिकल प्रॉडक्ट सर्व्हीसेस यांचेकडून ई-निविदे बाबत व त्यातील त्रृटी बाबत तक्रारी आल्याचे कागदपत्रावरुन स्पष्ट होत आहे व त्या तक्रारीच्या अनुषंगानेच निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आलेली असल्याने, आढळून आलेल्या अनियमिततेस डॉ.जगदाळे हे जबाबदार असल्याचे स्पष्ट होत आहे.

प्रशासनाचा अभिप्राय :

प्रकरणी होणा-या खर्चास महासभेची प्रशासकीय मान्यता नाही, बांधकाम परवानगी विभागाची मंजूरी नाही. तसेच ओटी कॉम्प्लेक्सचे ड्राईंग तत्सम आर्किटेक्ट यांचेकडून तयार व प्रमाणित करुन घेतलेले नाहीत. तसेच कामाचे तयार केलेले प्लॅन व नमूद केलेल्या निविदा स्पेसीफीकेशन प्रमाणे स्थापत्य विषयक कामाचे तसेच विद्युत विषयक कामाचे खर्चाचे अंदाजपत्रक शहर अभियंता व विकास अभियंता यांचेकडून तयार करुन घेतलेले नाही. तसेच त्यास तांत्रिक मंजूरीही घेतलेली नाही, तसेच ओटी साठी लागणारे साहित्य व मशीनरीचे स्पेसीफीकेशन प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी किमान तीन संस्थांकडून दरपत्रकासोबत स्पेसीफीकेशन, ब्रोशर इ. मागविणे आवश्यक असतांना फक्त दोनच संस्थाकडून दरपत्रके मागविलेली आहेत. तसेच येणारे खर्चाचे तपशिलवार अंदाजपत्रक तयार करुन त्यास बायामेडिकल इंजिनियर यांची मान्यता घेणे आवश्यक असतांना ती घेतलेली नाही. या अनियमिततेस डॉ.जगदाळे हे कारणीभूत असल्याचे चौकशीत स्पष्ट झाले असून निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आलेली असल्याने व तसे चौकशीत शाबीत झाले आहे. परंतु सदर प्रकरणी निविदा रद्द झाल्याने मनपाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही.

<u>दोषारोपपत्र बाब ५</u>

डॉ.जगदाळे यांनी वैद्यकीय अधिक्षक या पदावर कार्यरत असतांना एच.बी.ओ.टी मशिन खरेदीपोटी अदा करावयाच्या रकमेच्या संदर्भात जकातीची रक्कम भरली किंवा नाही याबाबत खात्री करुन नंतरच बीलाची अदायगी करणे विभाग प्रमुख म्हणून डॉ.जगदाळे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांची जबाबदारी होती. तथापि दंडासहित जकात वसूल केल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले नाही.

प्रशासनाचा अभिप्राय :

एच.बी.ओ.टी मशिन खरेदीपोटी अदा करावयाच्या रकमेच्या संदर्भात जकातीची रक्कम भरली किंवा नाही याबाबत खात्री करुन नंतरच बीलाची अदायगी करणे विभाग प्रमुख म्हणून डॉ.जगदाळे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांची जबाबदारी होती तथापी त्याचे पालन झाले

नसल्याची बाब चौकशी अहवालावरुन स्पष्ट होते. तथापि दंडासहित जकात वसूल केल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले नाही.

डॉ.जगदाळे आनंदराव, वैद्यकीय अधिक्षक यांच्या सेवानिवृत्तीच्या दिवशी दिनांक ३१/०१/२०१३ रोजी त्यांच्यावरील आरोप कळविण्यात येऊन त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. सदर कार्यवाहीकामी डॉ.जगदाळे यांनी आवश्यक ते सहकार्य केलेले आहे सदर कार्यवाही पुर्ण होऊन अहवाल प्राप्त झाला असून सदर अहवालावर डॉजगदाळे यांनी दि.१०/१२/२०१४ रोजी अभिवेदन सादर केलेले आहे. सदर अहवालानुसार सिध्द झालेल्या आरोपांसाठी योग्य शिक्षा करणे आवश्यक आहे.

डॉ.जगदाळे आनंदराव दत्ताजीराव, वैद्यकीय अधिक्षक हे दिनांक ३१/०१/२०१३ रोजी सेवानिवृत्त झालेले असून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील २७ (१) नुसार निवृत्तीवेतनधारक हा, त्याच्या सेवेच्या कालावधीत गंभिर गैरवर्तणूकीबद्दल किंवा निष्काळजीपणाबद्दल अपराधी असल्याचे कोणत्याही विभागीय किंवा न्यायिक कार्यवाहीमध्ये दिसून आले तर, महानगरपालिकेला लेखी आदेशाव्दारे निवृत्तीवेतन किंवा त्याचा कोणताही भाग कायमचा किंवा विशिष्ट कालावधीसाठी रोखून ठेवता येईल किंवा काढून घेता येईल आणि झालेल्या कोणत्याही आर्थिक नुकसानीची वसुलीदेखील अशा निवृत्तीवेतनातून पुर्णत किंवा अंशत: करण्याचा आदेश देता येईल. डॉ.जगदाळे आनंदराव दत्ताजीराव, वैद्यकीय अधिक्षक यांच्या केलेल्या विभागीय चौकशीस कार्योत्तर मान्यता मिळण्याकरीता व विभागीय चौकशी अहवालातील निष्कर्ष विचारात घेवून डॉ.जगदाळे आनंदराव दत्ताजीराव, वैद्यकीय अधिक्षक (निवृत्त) यांच्या निवृत्तीवेतनातील २०% भाग ५ वर्षापर्यंत रोखून ठेवण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.जितेंद्र ननावरे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.अरुण टाक -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ६६७ विषय क्रमांक - ११

दिनांक – ६/४/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
क्र.प्रशासन/८/कावि/१३७/२०१५ दिनांक ११/०३/२०१५

विषय क्रमांक ११ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १२

दिनांक – ६/४/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
क्र.प्रशासन/८/कावि/१३८/२०१५ दिनांक ११/०३/२०१५

डॉ.जगदाळे आनंदराव दत्ताजीराव, वैद्यकीय अधिक्षक (निवृत्त) यांचे कार्यकाळात यशवंतराव चव्हाण रुग्णालयासाठी एच.बी.ओ.टी मशिन खरेदीमध्ये व इतर प्रकरणी अनियमितता आढळून आल्याने सेवेत असताना निवृत्तीच्या दिवशी दिनांक ३१/०१/२०१३ रोजी खातेनिहाय चौकशीचे आदेश पारित करण्यात आले होते. प्रकरणी विभागीय चौकशीचा अहवाल दिनांक २७/१०/२०१४ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर विभागीय चौकशी अहवालानुसार डॉ.राजशेखर अय्यर, वैद्यकीय संचालक (सेवानिवृत्त) यांचेप्रकरणी खालील प्रमाणे निष्कर्ष प्राप्त झालेले आहेत.

१. मोनोप्लेस प्रस्तावात निविदा काढणेस मान्यता मा. आयुक्त यांनी दिलेली असतांनाही आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अय्यर यांनी डॉ. जगदाळे यांचा अभिप्राय प्राप्त झाले नंतर वरील वस्तूनिष्ठ माहिती घेऊन छाननी करून निर्णय घेणे आवश्यक असतांनाही ती न घेता व खात्री न करता निविदा प्रक्रिया राबवणेस मा. आयुक्त यांची मान्यता न घेता मल्टीप्लेस मशीन खरेदी करणे संबंधात निविदा प्रक्रियेस स्व: अधिकारात मान्यता दिलेली आहे.

२. दोन बेड व ४ सीट क्षमतेचे मल्टीप्लेस उपकरण र.रु.२,७९,२४,७५०/- इतक्या किमतीस महानगरपालिकेने खरेदी करणेपुर्वी राष्ट्रीय अथवा राज्य पातळीवरील सर्वात खप असलेल्या वर्तमान पत्रामध्ये निविदा जाहिर करणे आवश्यक होते. तथापि, सदरची निविदा नोटीस ही दि.१३/१२/२०११ रोजी दैनिक पुढारी, सामना व प्रभात या स्थानिक वर्तमान पत्रात विशेष निविदा नोटीस प्रसिध्द करण्यात आल्याने फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्या असल्याचे व अधिक महाग मशीन खरेदी करणेचे असल्याने निकोप स्पर्धा होणे आवश्यक होते व त्यासाठी फेर निविदा काढणे गरजेचे होते. तथापि, फेर निविदा काढल्या नसल्याचे दिसून येते.
३. डॉ. अय्यर, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यापदावर एप्रिल २०११ पासून मे २०१२ या कालावधीत कार्यरत होते. म्हणजेच सदरची निविदा नोटीस डॉ. अय्यर हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर कार्यरत असतांना प्रसिध्द करण्यात आल्याचे दिसून येते.
४. मशीन खरेदी संबंधात निविदा प्रक्रिया राबविणे पासून मशीन खरेदी करे पर्यंत संपुर्ण सहभाग डॉ. अय्यर यांचा असल्याचे कागदपत्रावरुन स्पष्ट होत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासाठी खरेदी करण्यात आलेल्या Multiplace HBOT System चे Inspection (तपासणी/परिक्षण), Installation (प्रस्थापना) व Commissioning (कार्यान्वयन) करणे तसेच अन्य काही अनुषंगिक बाबीसंबंधी अभिप्राय देणे ह्या प्रयोजनार्थ गठित करण्यात आलेल्या “तदर्थ समितीचा (HBOT Adhoc Committee)” अहवाल सादर करणेकामी मा.आयुक्त यांचेकडील आ.कक्ष/कावि/१८०/२०१३ दि. १५/०६/२०१३ अन्वये आदेश देण्यात आले असले बाबत तदर्थ समितीने सादर केलेल्या अहवालावरुन निदर्शनास येते. सदर समितीने आपला अहवाल दिनांक १३/०१/२०१४ रोजी सादर केलेला आहे. तदर्थ समितीच्या अहवालानुसार डॉ.राजशेखर अय्यर, वैद्यकीय संचालक (सेवानिवृत्त), यांची पुढील बाबतींत जबाबदारी निश्चत केलेली आहे.

१. M/S Kasco कडील HBOT Machine/Chamber खेरदीचा आदेश तत्कालीन आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.अय्यर यांनी कोणाचीही मागणी नसलेल्या अत्याश्यकता नसलेल्या व प्रचंड किंमतीच्या तसेच गुंतागुंतीच्या HBOT Machine च्या खरेदीचे आदेश त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिवशी दिनांक ३१/०५/२०१२ रोजी म्हणजेच सेवानिवृत्तीच्या दिवशी दिला आहे.
२. HBOT Machine/Chamber खरेदी नस्तीमध्ये डॉ.अय्यर यांनी प्रस्तावात अमेरीकन बनावटीचे (Sechrist) Monoplace HBOT Machine/Chamber घेण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरु करण्यास मा.आयुक्तांनी मान्यता दिली होती. त्याऐवजी स्थानिक बनावटीचे

(Kasco) Multiplace HBOT खरेदी करण्याची जी कलाटणी या प्रकरणास मिळाली आहे तिचे मुळ डॉ.अय्यर ह्यांच्या दिनांकरहीत शेरांकनात आहे.

३. खरेदीसाठी किमान ३ निविदांचा नियम असताना दोनच निविदा येऊनही निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात आली व M/S Kasco कडील Multiplace HBOT ची खरेदी करण्यात आली

खातेनिहाय चौकशी अहवाल व तदर्थ समितीच्या अहवालातील उपरोक्त निष्कर्ष पहाता सदर प्रकरणातील अनियमिततेकरिता जबाबदार डॉ.राजशेखर अय्यर, वैद्यकीय संचालक (सेवानिवृत्त) यांची विभागीय चौकशी होणे आवश्यक आहे. तरी डॉ.राजशेखर अय्यर, वैद्यकीय संचालक हे दिनांक ३१/०५/२०१२ रोजी सेवानिवृत्त झालेले असून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील २७ (१) (ब) नुसार कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापुर्वी विभागीय कार्यवाही चालू झाली नसेल तर शासनाच्या मंजूरीशिवाय ती चालू केली जाणार नाही अशी तरतुद आहे. त्यामुळे महापालिका अधिका-यांच्या बाबतीत सेवानिवृत्तीनंतर विभागीय कार्यवाही करण्यासाठी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. डॉ.राजशेखर अय्यर, वैद्यकीय संचालक (निवृत्त) यांच्या विरोधात महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम २७ मधील तरतुदी नुसार खातेनिहाय चौकशी सुरु करण्यास मा.महापालिका सभेची मान्यता घेण्याकरीता व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ८ मध्ये विनिर्दिष्ठीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार, प्रकरणात दोषारोपपत्र दाखल करणे, चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करणेबाबत व एकुण प्रकरणी विभागीय कार्यवाही प्रस्तावित करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.जितेंद्र ननावरे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.अरुण टाक -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ६६८ विषय क्रमांक - १२

दिनांक – ६/४/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
क्र.प्रशासन/८/कावि/१३८/२०१५ दिनांक ११/०३/२०१५

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १३

दिनांक – ६/४/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
क्र.प्रशासन/८/कावि/१३९/२०१५ दिनांक ११/०३/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासाठी खरेदी करण्यात आलेल्या Multiplace HBOT मशीन प्रकरणामध्ये डॉ.जगदाळे अनंदराव, वैद्यकीय अधिक्षक (सेवानिवृत्त) यांची खातेनिहाय चौकशी करण्यात आली आहे. Multiplace HBOT System चे Inspection (तपासणी/परिक्षण), Installation (प्रस्थापना) व Commissioning (कार्यान्वयन) करणे तसेच अन्य काही अनुषंगिक बाबीसंबंधी अभिप्राय देणे ह्या प्रयोजनार्थ गठित करण्यात आलेल्या “तदर्थ समितीचा (HBOT Adhoc Committee)” अहवाल सादर करणेकामी मा.आयुक्त यांचेकडील आ.कक्ष/कावि/१८०/२०१३ दि. १५/०६/२०१३ अन्वये आदेश देण्यात आले असले बाबत तदर्थ समितीने सादर केलेल्या अहवालावरुन निदर्शनास येते सदर समितीने आपला अहवाल दिनांक १३/०१/२०१४ रोजी सादर केलेला आहे. तदर्थ समितीच्या अहवालानुसार डॉ.गायकवाड शामराव बाजीराव, वैद्यकीय उपअधिक्षक (सेवानिवृत्त) यांची पुढील बाबतीत जबाबदारी निश्चत केलेली आहे.

“डॉ. जगदाळे हे दि. ३१/०१/२०१३ रोजी निवृत्त झाल्याने त्यांचा पदभार डॉ गायकवाड यांच्याकडे आला डॉ. गायकवाड हे दि. ३१/०५/२०१३ रोजी निवृत्त झाले त्यांचे चार महिन्यांचे सेवाकालात HBOT Machine/Chamber च्या कर्मचारी प्रशिक्षणासह अन्य सर्व पायाभूत बाबींची पुर्तता करवून HBOT Machine कार्यान्वीत करणे त्यांना शक्य होते. डॉ. जगदाळेंसह

डॉ. गायकवाड हे आरोग्य वैद्यकीय आधिकारी होण्यापूर्वी वैद्यकीय उपअधिक्षक असल्याने HBOT Machine बाबतच्या पायाभूत बाबींची पुर्तता करुन घेण्याबाबत ते अधिकच जबाबदार होते. परंतु त्यादृष्टीने त्यांनी पावले उचलेली नाहीत मशिन कार्यान्वीत होईपर्यंत पुरवठादारास रक्कम अदा न करण्याची खरेदी आदेशात जी अट होती ती पुर्णतः डावलून बायोमेडिकल इंजिनिअरचा दाखला नसताना डॉ. गायकवाड व डॉ. जगदाळे यांनी पुरवठादार M/S Manali Enterprises ह्यांना एकुण किंमतीच्या ५०% रक्कम म्हणजे रु १,३९,६२,३७५/- अदा करण्याचा निर्णय घेतलेला आहे."

तरी डॉ.गायकवाड शामराव बाजीराव, वैद्यकीय उपअधिक्षक हे दिनांक ३१/०५/२०१३ रोजी सेवानिवृत्त झालेले असून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील २७ (१) (ब) नुसार कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापुर्वी विभागीय कार्यवाही चालू झाली नसेल तर शासनाच्या मंजूरीशिवाय ती चालू केली जाणार नाही. अशी तरतुद आहे. त्यामुळे महापालिका अधिका-यांच्या बाबतीत सेवानिवृत्तीनंतर विभागीय कार्यवाही करण्यासाठी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. डॉ.गायकवाड शामराव बाजीराव, वैद्यकीय उपअधिक्षक (सेवानिवृत्त) यांच्या विरोधात महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम २७ मधील तरतुदी नुसार खातेनिहाय चौकशी सुरु करण्यास मा.महापालिका सभेची मान्यता घेण्याकरीता व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ८ मध्ये विनिर्दिष्ठीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार, प्रकरणात दोषारोपपत्र दाखल करणे, चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करणेबाबत व एकुण प्रकरणी विभागीय कार्यवाही प्रस्तावित करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.जितेंद्र ननावरे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.अरुण टाक -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता–

ठराव क्रमांक- ६६९ विषय क्रमांक - १३

दिनांक – ६/४/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
क्र.प्रशासन/८/कावि/१३९/२०१५ दिनांक ११/०३/२०१५

विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ६७० विषय क्रमांक - १४

दिनांक – ६/४/२०१५ विभाग – मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) दि.१९/११/२०१४, दि.३/१२/२०१४ व १०/२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.३/१२/२०१४ व दि.१०/१२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि.४/२/२०१५ व दि.९/२/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ६७१ विषय क्रमांक - १५

दिनांक – ६/४/२०१५ विभाग – मा.नगरसचिव

**मा.क्रिडा समिती**

दि.२१/१/२०१५ व दि.४/२/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.महापौर**- सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/१७८/१५
दिनांक - १/६/२०१५

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.